**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्री. राजेश गणपतराव परकाळे, : अपिलार्थी
मु. पो. चिचोंडी पाटील , तालुका जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यालयीन अधीक्षक,
जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर,
तालुका जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर, तालुका जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग अहमदनगर यांच्या कार्यालयाअंतर्गत सन २००८ ते २००९ या कालावधीतील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जिल्हा परिषद निवासस्थान दुरुस्तीवर व जिल्हा परिषद आवारातील इमारतीच्या दुरुस्तीवर करण्यात आलेल्या खर्चाची व कामाची देयके, मोजमाप पुस्तिका आणि निविदा दरपत्रक व खर्च अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २००० इतके त्यांना लागणार असल्याचे कळविले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्कळीत स्वरुपाची असल्याने माहिती देण्यासाठी १५ दिवसाचा जादा कालावधी वाढवून द्यावा अशी अपिलार्थीस विनंती केली. तथापि यानंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क चलनाद्वारे भरल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर न केल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. त्यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००९ रोजी सुनावणी ठेवली असता त्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित झाले नाहीत. परिणामी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न झ ाल्याने व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांनी न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही, असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद हा चुकीचा आहे. कारण या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना २००० रुपये इतका खर्च लागणार आहे एवढेच कळविले आहे. सदरचे शुल्क अपिलार्थीने कोणत्या पध्दतीने व कोठे भरावयाचे व त्याचा तपशील हे जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस या पत्रामध्ये कळविले नाही. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून विहित मुदत वाढवून घेण्याची विनंती करण्याची तरतूद या अधिनियमामध्ये नाही. अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा संपूर्ण तपशील त्यांना कळविणे भाग होते. परंतु या प्रकरणी अशा प्रकारच्या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिला नाही आणि त्याद्वारे अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक २९-०४-२००९ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ही बाब आयोगासमोर कबूल केली आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश गणपतराव परकाळे, मु. पो. चिचोंडी पाटील , तालुका जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर, तालुका जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर, तालुका जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्री. बुवाजी भागा खेमनार, : अपिलार्थी
मु. हिरेवाडी पो. साकूर, तालुका संगमनेर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बालविकास सेवा योजना, संगमनेर,
तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जि.प. अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित,

अंगणवाडी कार्यकर्ती  व मदतनीस भरती प्रक्रियेसंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक २७-०१-२००९ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात त्यांनी कोणतेही लेखी आदेश पारीत केल्याचे आयोगास आढळून आले नाही. मात्र यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांना ३०,००० /- रुपये इतक्या अनुदानाची आवश्यकता आहे व हे अनुदान त्यांना त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यात येईल. मात्र यानंतर अपिलार्थीने दिनांक २३-०७-२००९ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना ३०,००० /- रुपये इतका खर्च लागणार असल्याचे व इतके अनुदान त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आणि अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीपोटीच्या अनुदानाची मागणी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे केली असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपैकी त्यांना या अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६ ७ व ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी ती विसंगत आहे. या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण, खुलासे अपेक्षित करणा-या स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुरविण्यासंदर्भात कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एखाद्या त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल त्यांची स्पष्टीकरणे अथवा वैयक्तीक अभिप्राय मागणे आणि अर्जदाराच्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशा प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६, ७ व ४ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस, त्यांच्या कार्यालयातील सन २००५ ते २००८ या कालावधीतील संगमनेर तालुक्यात ज्या अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या नियुक्त्या केल्या आहेत त्यांच्या अर्जाच्या व अर्जासोबतच्या सहपत्राच्या प्रती, आणि संबंधितांच्या अंगणवाडी कोर्सच्या सर्टिफिकेटच्या प्रमाणित प्रती दिल्यास, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ च्या संदर्भातील माहिती प्राप्त होऊ शकते असे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरेसे अनुदान उपलब्ध झाल्यानंतर प्राप्त होऊ शकते. ही सर्व परिस्थिती पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन त्यांनी मागणी केलेल्या माहितीची तपासणी करावी. त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात, असे जन माहिती अधिकारी यांना सुचविण्यात येत आहे. जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस २००० रुपये इतक्या खर्चापर्यंतची माहिती ते तात्काळ देऊ शकतील असे आयोगास अवगत केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील, निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व त्यामधील अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी रुपये २००० च्या खर्चाच्या मर्यादेमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर हेतुपुरःस्पर टाळलेले नसल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कारवाई आदेशित करण्यात येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-पैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बुवाजी भागा खेमनार, मु. हिरेवाडी पो. साकूर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, संगमनेर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( बालकल्याण), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ८९/२००९ व ९०/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९ व ९०

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्री. ठोंबरे दत्तात्रय लक्ष्मण, : अपिलार्थी
रा. सराफ बाजार, ठोंबरे वाडा, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

अपील क्रमांक ८९/२००९

१ जन माहिती अधिकारी
तथा कामगार तलाठी, करंजी (बु.), तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

अपील क्रमांक ९०/२००९

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका
कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

# निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना तलाठी करंजी (बु) ता. कोपरगाव व निवासी नायब तहसीलदार कोपरगाव यांचेकडून त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपीले आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

या दोनही अपील अर्जांशी संबंधित प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने एकच माहिती दोन वेगवेगळया जन माहिती अधिका-यांकडे मागितल्याचे आढळून येत आहे. तसेच यासंदर्भात अपिलार्थीने दोनही प्रकरणी एकाच दिवशी प्रथम अपील केले असल्याने या दोनही अपील अर्जांवर एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः कामगार तलाठी, करंजी (बु.), तालुका कोपरगांव व निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव यांच्याकडे, प्रांतसाहेब, संगमनेर यांच्याकडील दिनांक १६-०९-२००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील व या प्रकरणी त्यांनी केलेल्या चौकशीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी काढलेल्या निष्कर्षाच्या कागदपत्रांच्या प्रतीची मागणी अपील क्र. ८९ व ९०/०९ शी संबंधित दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे त्यांच्या दिनांक ०१-४-२००९ व १३ -०३-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे केली होती.

अपिलार्थीच्या या दोनही अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव व तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव यांच्याकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जांवरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ८९/२००९ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. अपील क्रमांक ९०/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी निवासी नायब तहसीलदार, कोपरगांव श्री. राजेंद्र सखाराम नवले हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, प्रांत अधिकारी, संगमनेर यांनी अपिलार्थीच्या जमीन मालकीशी संबंधित प्रकरणाच्या संदर्भात दिनांक १६-०९-२००८ रोजी " पहिली नोंद रद्द करुन चौकशी करुन नंतर वारसांची नोंद करावी " असे आदेश दिले असून ही कार्यवाही आता पूर्ण केली गेली असून या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे दिनांक १६-१०-२००९ रोजी पाठविल्या आहेत. अपिलार्थीने ज्या प्रकरणाची माहिती मागितली आहे ती माहिती संबधित तलाठी यांच्याकडे उपलब्ध असते.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००९ रोजी म्हणजे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर आवश्यक ती माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. तसेच प्राप्त माहितीवर अभिप्राय देण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस आता जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असली तरी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००९ व दिनांक १३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जास अनुक्रमे कामगार तलाठी, करंजी (बु.), तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर व निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जाची केलेली उपेक्षा दुर्लक्षित करता येण्याजोगी नाही.

अपिलार्थीने दिनांक ०१-०४-२००९ व दिनांक १३-०३-२००९ रोजी माहितीसाठीचे रितसर अर्ज केले असताना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००९ रोजी म्हणजे अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय कालावधीपेक्षा पाच महिने इतक्या विलंबाने माहिती पुरविली आहे. हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी हे निश्चितपणे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८९/२००९ व ९०/२००९मान्य करण्यात येत आहेत.

२. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ठोंबरे दत्तात्रय लक्ष्मण, रा. सराफ बाजार, ठोंबरेवाडा, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी, करंजी (बु.), तालुका कोपरगांव, जिल्हा

अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१

निर्णय दिनांक २०-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भाऊसाहेब कल्याणराव जंजीरे,<br>मु. पो. पिंपळवाडी, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कर्जत,<br>तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कर्जत,<br>तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिरस्तेदार, कार्यालय उपविभागीय अधिकारी (महसूल), कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना तहसीलदार व उप विभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जाणीवपूर्वक दिली नाही व खोटी माहिती देऊन अन्याय केला आहे. त्यामुळे तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्यावर योग्य ती कार्यवाही आदेशित करावी व अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली त्याचा तपशील मिळावा अशी आयोगास त्यांनी या अर्जामध्ये शेवटी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांना उद्देशून केलेल्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या अर्जावर त्यांनी काय कार्यवाही केली याचा तपशील, कार्यवाही प्रलंबीत असण्याची कारणे व कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपविभागीय अधिकारी कार्यालय, कर्जत यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या अर्जाची प्रत तहसीलदार, कर्जत यांच्याकडे दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अपिलार्थीस तहसिलदार तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस, त्यांनी दिनांक १७-०४-२००८ रोजी प्रांत अधिकारी, कर्जत यांना उद्देशून केलेल्या अर्जावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील अपेक्षित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील " कारवाई प्रलंबीत असण्याची कारणे " ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने, अपिलार्थीस देय असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००८

रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील ही माहिती त्यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०८-०४-२००९ रोजीच्या निर्णयामध्ये या अर्जामधील संदर्भीत प्रकरणाचा ऊहापोह केला आहे. परंतु अपिलार्थीस त्याची माहिती देण्यासंदर्भात आदेश पारित केले नसल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्या प्रांत अधिकारी यांना उद्देशून केलेल्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या अर्जावर प्रांत अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही, म्हणजे अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल, यासंदर्भात त्यांनी वेगवेगळ्या संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, या विषयावर त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यामधील असलेल्या टिपण्याच्या प्रती, ही माहिती देय होते असे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित वरीलप्रमाणे स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ३ मधील वर स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भाऊसाहेब कल्याणराव जंजीरे, मु. पो. पिंपळवाडी, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, कार्यालय उपविभागीय अधिकारी (महसूल), कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२

निर्णय दिनांक २०-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सदाफुले राहूल मधुकर,<br>मु. पो. जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जामखेड,<br>तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,<br>जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी नकार दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे जामखेड येथील सिध्दार्थनगर दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत चालू असलेल्या कामाच्या आणि तक्रारी अर्जाच्या संदर्भात सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबधित काही माहिती एकूण ११ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अंतीम सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १७-०४-२००९ रोजी पारीत केले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०५-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील एकूण ११ मुद्दयापैकी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ९ अंशतः व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम व विसंगत स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. या मुद्याव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना ' अपूर्ण राहिलेल्या कामांची माहिती ' व ' चालू कामांची तपशीलवार माहिती ' ही माहिती मागितली आहे. मात्र माहिती म्हणजे निश्चित कोणत्या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस हवी आहे याचा त्यावरुन बोध होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती ही मोघम स्वरुपाची ठरत आहे. मुद्दा क्रमांक ९ अंशतः व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना भविष्यकाळातील - संबंधितांवर कोणती कारवाई करणार अशी अमूर्त स्वरुपातील माहिती मागितली आहे - अशी माहिती अमूर्त स्वरुपातील व भविष्यकाळातील असल्याने ती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जातील उर्वरित मुद्दयांवरील माहिती, माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरविणे भाग आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ९ मधील भविष्यकाळातील माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ व ९ मधील भविष्यकाळातील माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सदाफुले राहूल मधुकर, मु. पो. जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३

निर्णय दिनांक  २०-१०-२००९

१ सुंबे निलांबरी भाऊसाहेब, : अपिलार्थी
मु. पो. शिवाजीनगर (नालेगाव),
नगर-कल्याण रोड (नित्यसेवा क्लिनिक),
तालुका जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अहमदनगर होमिओपॅथिक शिक्षण संस्था व मेडिकल
कॉलेज, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य, अहमदनगर होमिओपॅथिक शिक्षण संस्था व मेडिकल कॉलेज, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली असता त्यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती अधिकार लागू नसल्याचे उत्तर दिले

व अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे प्राचार्य, अहमदनगर होमिओपॅथिक शिक्षण संस्था व मेडिकल कॉलेज, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेच्या संदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत या संस्थेकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे उत्तर देऊन त्यांच्या संस्थेस शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्याने माहिती अधिकार अधिनियम त्यांच्या संस्थेस लागू नसल्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांची शिक्षण संस्था ही कायमस्वरुपी विनाअनुदानित संस्था आहे. त्यामुळे त्यांच्या संस्थेला माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. त्यावर अपिलार्थीने या संस्थेस शासनाचे अनुदान उपलब्ध होत असल्याचे आयोगास अवगत केले. तथापि या संदर्भात कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केला नाही. अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जामध्ये देखील अपिलार्थीने संबंधित संस्थेने शासनाचा निधी घेतल्याचे नमूद केले आहे परंतु या संस्थेस शासनाची मदत होत असल्याचा पुरावा आयोगास आढळून येत नाही.

यासंदर्भात यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ, नागपूर या प्रकरणी रिट याचिका क्रमांक ५१३२/२००८च्या संदर्भात

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या आदेशात मा. उच्च न्यायालयाने विना अनुदानित संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याचा निर्वाळा दिला आहे. विचाराधीन अपील प्रकरणाशी संबंधित संस्था देखील अशीच विनाअनुदानित संस्था असल्याने ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मधील तरतुदीमध्ये स्पष्ट केलेल्या "सार्वजनिक प्राधिकरण" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरील असल्याचे सिध्द होत आहे, हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने निर्णय देण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन उरत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सुंबे निलांबरी भाऊसाहेब, मु. पो. शिवाजीनगर (नालेगाव), नगर-कल्याण रोड (नित्यसेवा क्लिनिक), तालुका जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ प्राचार्य, अहमदनगर होमिओपॅथिक शिक्षण संस्था व मेडिकल कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्री. इप्तेखार अकबर लेले, : अपिलार्थी

रा. बोधेगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

उप विभागीय अधिकारी विभागीय कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), नगर भाग

अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिरस्तेदार, कार्यालय उप विभागीय अधिकारी (महसूल), नगर भाग अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०६-२००९ रोजी सुनावणी घेऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १९-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सिलींग केस क्रमांक १०/६४ च्या संदर्भात सन १९७१ ते १९९८ या कालावधीशी संबंधित एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीमध्ये- तहसील कार्यालय शेवगाव यांच्या दि. १८-०७- ९२ च्या पत्रानुसार संचिका क्रमांक ०१ ते १०३, संचिका क्रमांक ०१ ते ३७ व संचिका क्रमांक ०१ ते ४६५ यांच्या साक्षांकीत झेरॉक्स प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून शासकीय फी भरुन घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना सशुल्क प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले . जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः ताब्यात आहे. अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो प्रतिसाद पुरेसा नाही. कारण या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित शुल्क, या शुल्काचा तपशील, सदर शुल्क कोठे आणि कशा पध्दतीने भरावे याचे काहीही मार्गदर्शन केलेले नाही, जे अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे करणे त्यांना अनिवार्य होते. तसेच अपिलार्थीने त्यांच्या

मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली असता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जाण्याचे सूचित करणे ही जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत आवश्यक त्या तपशीलासह अपिलार्थी यांना पुरविण्यात येणा-या माहितीचे शुल्क त्यांना तपशीलासह कळविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी असे न केल्यामुळे आता त्यांना अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना संपूर्ण माहिती साक्षांकीत स्वरुपात हवी असल्याचे म्हटले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना संपूर्ण माहिती प्रथमतः ती साक्षांकीत करुन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत साक्षांकीत स्वरुपात, नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना साक्षांकीत स्वरुपात, विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इप्तेखार अकबर लेले, रा. बोधेगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी (महसूल), नगर भाग अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), नगर भाग अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, : अपिलार्थी
रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे विनादिनांकाचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी दिनांक ०६-०३-२००९ रोजी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील त्यांना चालवावयाचे नाही, त्यामुळे ते निकाली काढण्यात यावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीसच त्यांनी आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील त्यांना चालवावयाचे नसल्यामुळे ते खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ९५/२००९, दिनांक ०६-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, : अपिलार्थी

रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, संनियंत्रण समिती,

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जावर माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजी गौतम एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव यांच्याबाबत केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, या समितीकडे दाखल झालेल्या अर्जांची संख्या व निर्णय दिलेल्या अर्जांची संख्या अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना उद्देशून केला होता. तथापि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे दिनांक १८-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदरच्या पत्राप्रमाणे उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे प्रथम अपील सादर केला किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने विभागीय आयुक्तांकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी त्यांच्या दि. २४-०३-०९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली व या प्रकरणी अपिलार्थीस प्रथम अपील उपजिल्हाधिकारी महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडे करण्याचे सूचित केले.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे सूचित केले होते.
तर तहसीलदार, सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे त्यांना सूचित केले आहे. अशा प्रकारे एकाच प्राधिकरणाव्दारे सामान्य नागरिकांस माहिती देण्यासंदर्भात दिशाभूल करणारी माहिती देऊन कसे वेठीस धरले जाते हे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीच्या

प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर सुनावणी होणे आयोगास आवश्यक वाटते. सबब विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी प्रथमत: या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी कोण याची निश्चिती करावी व अपिलार्थीचा दिनांक १८-०३-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे पाठवावा. विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, संनियंत्रण समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६३८

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्रीमती शेख नाहिन परवीन शब्बीर अहमद, : अपिलार्थी
व्दारा- शब्बीर सर,
वेस्टन कन्स्ट्रक्शन मागे, कादर पटेल चाळ, वार्ड नं. २,
श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अधिकारी, अध्यक्ष, वाल्मिकी आंबेडकर
आवास योजना, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), श्रीरामपूर,
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी : शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही आणि त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे श्रीरामपूर वार्ड नं. २, दांडेकर प्लॉट येथील वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुल व सदनिका वाटपासंदर्भात सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबधित काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे विचारली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांना उद्देशून केला होता. परंतु अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वेगळ्या प्राधिकरणाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांकडे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पाठविला. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस दिनांक १५-०९-२००८ पर्यंत आवश्यक ती माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सूचनेनुसार संबंधितांनी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणी वेळी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक 'ड', 'ई' व 'ऊ' शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे, देय होत नाही. या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येते. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक "अ", "ब" व "इ" शी संबंधित माहिती दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झाली आहे. मात्र खुद्द उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती अपिलार्थीस उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिलेली आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "क" व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रांत अधिकारी, श्रीरामपूर यांनी दिलेल्या चौकशी आदेशाची प्रत व यासंदर्भात झालेल्या चौकशीच्या कारवाईची सविस्तर माहिती, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि त्यांनी अद्यापपावेतो या मुद्दयावर अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे आजच्या सुनावणीत स्पष्ट झाले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "क" शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील घटनाक्रमाचे अवलोकन करता या संपूर्ण घटनाक्रमामध्ये खुद्द उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी वंचित ठेवले

गेल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली काही माहिती इतर प्राधिकरणांशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ३०-०४-२००८ रोजीचा अर्ज संबंधित प्राधिकरणा-कडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठविणे त्यांना आवश्यक होते. जन अपिलीय अधिकारी यांनी मूळात अपिलार्थीच्या दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार ३० दिवसाच्या आत निर्णय घेणे त्यांना भाग होते. तथापि अंदाजे अडीच महिन्याच्या विलंबाने अपिलाचा निर्णय दिला आहे. या सर्वांचा परिणाम हा अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने अपूर्ण माहिती प्राप्त होण्यामध्ये झालेला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००८ रोजी माहिती पुरवली परंतु यामध्ये खुद्द जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित माहितीचा समावेश नाही. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याचे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. तथापि वरील वस्तुस्थिती पाहता मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने व अपूर्ण माहिती मिळाल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या संबंधित कर्मचा-यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाची माहिती अद्यापपावेतो न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " क " शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती शेख नाहिन परवीन शब्बीर अहमद, व्दारा- शब्बीर सर, वेस्टन कन्स्ट्रक्शन मागे, कादर पटेल चाळ, वार्ड नं. २, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८१०

निर्णय दिनांक २०-१०-२००९

१ श्री. रंजन अमृत साळवी, : अपिलार्थी
मु. पो. टिळकनगर, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, डिंभे प्रकल्प विभाग, घोडेगांव-भिमाशंकर रोड, निघोटवाडी, तालुका मंचर, जिल्हा पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे - ११

त्रयस्थ पक्ष : इंजि. सुधीर देसाई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल अधिनियमातील कलम २० च्या पोट कलम (१) प्रमाणे कार्यवाही करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. सुधीर देसाई, कार्यकारी अभियंता यांनी नोकरीस

लागल्यापासून वेळोवेळी केलेल्या कामाचा तपशील, त्यांच्या कार्यकालाचा तपशील, त्यांनी शासनास सादर केलेली मालमत्ता विवरणपत्रे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाविरुध्द त्यांच्याकडे ०१-०१-२००६ ते ०१-०४-२००७ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या प्रती, सी.पी.सी. ८० नुसार आलेल्या नोटिसा, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेले अर्ज, अपील व अपिलावर झालेले निर्णय आणि वेगवेगळ्या क्षेत्रात झालेल्या खर्चाची विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाची माहिती वगळता काही माहिती पुरविली. अपिलार्थीस सदर त्रयस्थ पक्षाची माहिती नाकारण्याचे कारण, म्हणजे त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांना त्यांची वैयक्तीक माहिती अपिलार्थीस उपलब्ध न करुन देण्याच्या सूचना दिल्या होत्या, हे होय. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०९-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली आहे. त्या त्रयस्थपक्षाच्या नावाचे म्हणजे श्री. सुधीर देसाई या नावाचे कोणीही कार्यकारी अभियंता त्यांच्याकडे कार्यरत नाहीत तरीही नामसाधर्म्यामुळे त्यांनी सुधीर चौधरी नावाच्या त्यांच्या कार्यकारी अभियंत्यांकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड

करण्याविषयी विचारले असता, श्री. चौधरी यांनी माहिती उघड करण्याबाबत नकार दिल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारली. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा कोणताही वैध पुरावा जोडला नव्हता तसेच या संदर्भात त्यांनी तहसीलदार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे विचारणा केली असता या दोघांच्याकडून त्यांच्या कार्यालयातर्फे अपिलार्थीस दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिले गेले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना अवगत केले गेले होते त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे तो त्रयस्थ पक्ष मूळात अस्तित्वात नाही तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही वैध पुरावा सादर केलेला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांना कार्यकारी अभियंता यांच्या-कडून प्राप्त झालेल्या माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले होते आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेण्याची त्यांची तयारी असल्याचे कबुल केले होते. परंतु नंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी नकार दिला. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे आणि त्यांनी आयोगाकडे केलेल्या कागदपत्रांच्या मजकुरातील घटनासंदर्भाचे खंडण व स्पष्टीकरण करण्यासाठी आजही सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रंजन अमृत साळवी, मु. पो. टिळकनगर, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, डिंभे प्रकल्प विभाग, घोडेगांव-भिमाशंकर रोड, निघोटवाडी, तालुका मंचर, जिल्हा पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे - ११ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५४
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

१. श्री. लक्ष्मण गणपती शेटे, : अपिलार्थी
रा.किल्ले धारुर, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, किल्ले धारुर, जि.बीड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ०५.१०.२००७ रोजी नगरपरिषदेकडे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार अर्ज देऊन, नगरपरिषदेने दिनांक ०७.०१.१९८८ रोजी त्यांच्या जप्त केलेल्या मालासंदर्भात माहिती मागविली असता, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याबद्दल त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१२.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही नगरपरिषदेने त्यांना पूर्ण माहिती न देता कोणत्याही अधिका-याची सही नसलेला पंचनामा साक्षांकित करुन अपिलार्थीस पाठविला आहे. या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"दि.०७.०१.१९८८ रोजी धारुर नगर परिषदेने माझा माल अतिक्रमणाच्या नावाखाली आणलेला आहे. दि. १२.०४.१९९१ रोजी मला १०% माल दिलेला आहे. उर्वरित ९०% मालाची सविस्तर माहिती देण्यात यावी. ही नम्र विनंती."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या जप्त केलेल्या मालासंदर्भातील स्थिती व यासंदर्भात त्यांनी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यासंदर्भातील आदेशावर आपले अभिप्राय व्यक्त करुन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.११.२००७ रोजी प्रथम अपील केले व अपिलार्थीचा जप्त केलेल्या मालाची माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०१.१९८८ रोजी जप्त केलेला माल दि. ०४.१२.१९९१ रोजी कोर्ट कमिशनर व पंच्यांच्या उपस्थितीत अपिलार्थी यांना दिलेला आहे. अपिलार्थीने त्यावेळी त्यांना उपयोगी असलेला माल उचलून नेला आहे व त्यांनी उचलून न नेलेला माल हा नाशवंत असल्यामुळे तो आता नष्ट पावलेला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने

त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपातील असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, "उर्वरित ९०% मालाची सविस्तर माहिती देण्यात यावी." असे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनंती केल्याचे दिसून येते. मालाची सविस्तर माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे हे अपिलार्थीने येथे स्पष्ट केले नाही. तसेच त्यांच्या या मुद्यावरील अभिप्राय व्यक्त करण्यासाठी आज ते आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३१.१२.२००७ रोजीच्या निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांचा जप्त केलेला माल नाश पावला आहे, असे कळविणे याप्रकरणी संयुक्तिक राहिले असते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या जप्त केलेल्या उर्वरित मालाची सद्यस्थिती कळली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या जप्त केलेल्या मालाची दि. ०५.१०.२००७ रोजीची सद्यस्थिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य कळवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जप्त केलेल्या मालाची दि. ०५.१०.२००७ रोजीच्या मालाची सद्यस्थिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांकः २१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण गणपती शेटे, रा. मु.पो. किल्लेधारुर, मेन रोड, ता. धारुर, जि.बीड, पिन कोड - ४३११२४

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५५
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजाभाऊ उत्तमराव पवार,<br>मु.पो. करंजकल्ला, ता. कळंब,<br>जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>यशवंतराव चव्हाण प्राथमिक विद्यामंदिर,<br>कळंब, जि.बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>संत गोरोबा काका शिक्षण प्रसारक मंडळ,<br>पिंपळगाव (डोळा), पो.भाटशिरपुरा,<br>ता.कळंब, जि.उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण प्राथमिक विद्यामंदिर, कळंब यांना रजिस्टर्ड पोस्टाने दि. २४.०१.२००८ रोजी (पावती क्र. ००६४) अर्ज पाठविला असता त्यांनी अर्ज स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी श्री. सुरेश निवृत्ती टेकाळे, अध्यक्ष, श्री संत गोरोबा काका शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपळगाव डोळा,पो. भाटशिरपुरा, ता.कळंब, यांना दि. ३०.०५.२००८ रोजी पोस्टाने प्रथम अपील पाठविले असता त्यांनी देखील पत्र घेण्यास नकार दिल्यामुळे ते आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व

आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांनी आयोगास विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण प्राथमिक विद्यालय यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करावी. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या व शाळेतील शिक्षकांच्या संदर्भात एकूण ३५ मुद्यावर विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. तथापि हा अर्ज न स्वीकारल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या अध्यक्षांकडे दि. ०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, सदरचा अर्ज स्वीकारण्याचे त्यांनी नाकारले, त्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाी सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे आढळून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले व हे अपील अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे म्हणजेच संबंधित संस्थेच्या अध्यक्षांकडे केलेले आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, खाजगी शाळांच्या संदर्भात, शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकःसंकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असून त्यांनी त्यांचे दि. ०५.०३.२००८ रोजीचे प्रथम अपील अर्ज प्रथमतः शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार व योग्य त्या सहपत्रांसह सादर करावे.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचे या विषयावरील दि. ०५.०३.२००८ रोजीच्या

प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यासाठी, या प्रकरणी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.)जि.प,उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांच्या दि.०५.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्ज, त्यांच्याकडे प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: २१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजाभाऊ उत्तमराव पवार, रा. मु.पो. करंजकल्ला, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण प्राथमिक विद्यामंदिर, कळंब, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अध्यक्ष, संत गोरोबा काका शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपळगाव (डोळा), पो.भाटशिरपुरा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५६
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती प्रभावती विनायक भोसले,<br>रा. कळंब, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>संजय गांधी माध्यमिक आश्रमशाळा,<br>सुरळवाडी, ता.गंगाखेड,जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, कार्यालय<br>परभणी. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा माहितीसाठीचा अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असता, तो त्यांनी घेण्यास इन्कार केला. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले तथापि त्यावर योग्य ती कार्यवाही न झाल्याने त्यांना माहिती मिळाली नाही आणि त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, संजय गांधी माध्यमिक आश्रम शाळा, सुरळवाडी ता. गंगाखेड, जि. परभणी यांच्या शाळेसंदर्भात एकूण ७ मुद्यांवर, शाळा स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने मूळ माहितीसाठीचा अर्ज करेपर्यंतची माहिती मागविली होती. अपिलार्थीने हा अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असता,

सदर टपाल जन माहिती अधिकारी यांनी स्वीकृत न केल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०७.२००८ रोजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र त्यांच्याकडील दि. ३१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस नियमानुसार माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १३.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणारे शुल्क रु. १३८०/- इतके परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अकाऊंट नं. १५३ मध्ये मुख्याध्यापक यांच्या नावे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी या अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्र. मुख्याध्यापक, संजय गांधी माध्यमिक आश्रम शाळा सुरळवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी व त्यांची संस्था यांच्यामध्ये न्यायालयामध्ये वाद चालू असल्यामुळे अपिलार्थीचे टपाल त्यांनी स्वीकारले नाही व अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्जच, अपिलार्थी व सदर संस्थेमध्ये चालू असलेल्या न्यायालयीन दाव्याचे कारण दर्शवून स्वीकारलेला नाही, ही जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा चुकीची आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असून जन माहिती अधिकारी यांची शाळा, हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे कोणत्याही

परिस्थितीत अपिलार्थीचे कोणतेही टपाल न स्वीकारण्याची जन माहिती अधिकारी यांची भूमिका माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अगदी विरुध्द टोकाची व विसंगत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचविल्यानंतर देखील सुमारे दीड महिन्यानी त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे कळविले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक भारतीय नागरिकास त्यांनी कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितल्यास, त्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जावर अधिनियमातील कलम ७ प्रमाणे तीस दिवसांच्या आत कार्यवाही करणे, हे त्यांना बंधनकारक आहे. तथापि या प्रकरणी अशाप्रकारची कार्यवाही संबंधित मुख्याध्यापक यांनी केली नसल्याने व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार, आता जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती प्रभावती विनायक भोसले, रा. कल्पना नगर, तांदळवाडी रोड, मु. पो. ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा संजय गांधी माध्यमिक आश्रमशाळा, सुरळवाडी, ता.गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, कार्यालय परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५७
निर्णय दिनांक: २१-१०-२००९

१. श्री. स्वामी दत्तात्रय शरणय्या, : अपिलार्थी
रा.लोहारा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
ग्राम पंचायत कार्यालय, लोहारा बू.
जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, लोहारा बू.
जि. उस्मानाबाद.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे दि.१८.०९.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि.२०.०९.२००८ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याचे कबूल केले आहे आणि त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अनावधानाने अपील केल्याचे कबूल करुन विचाराधीन अपील खारीज करण्याची विनंती आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील खारीज करण्याची केलेली विनंती आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १५५७/०८, दि. २३.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. स्वामी दत्तात्रय शरणय्या, मु.पो. ता.लोहारा (बू.),जि.उस्मानाबाद-४१३ ६०८.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत,लोहारा बु. ता. लोहारा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५८
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

१. श्री. दशरथ एन. सुरडकर, : अपिलार्थी
रा. सिल्लोड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी,
जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग,सिल्लोड,
जि.औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग सिल्लोड,
जि. औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्रासोबत अर्ज सादर केला असूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून त्रास दिल्याने त्यांनी दि. ०६.०८.२००८ रोजी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांना जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग सिल्लोड यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे पत्र दिले परंतु

माहिती अधिकाऱ्याला माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्यास कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या विनादिनांकाच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाने शासकीय अधिकाऱ्याच्या दौऱ्यासाठी भाडे तत्त्वावर लावलेल्या चार चाकी वाहनाची माहिती मागविली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०१.०७.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - चार चाकी वाहने कोणत्या वर्षापासून भाडेतत्वावर लावली, त्या गाडयाचे प्रकार व भाडेतत्त्वावर लावण्यात आलेल्या चार चाकी वाहनाचे लॉगबुकच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००५ ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत असा दर्शविला आहे. या अर्जामध्ये अर्जदार दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०७.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या छायाप्रतीची साक्षांकित प्रत मागविली. तथापि यानंतर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार विनादिनांकाचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्यकडे दिनांक ०६.०८.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०९.२००८ रोजीच्या उप अभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग, सिल्लोड यांच्याकडे त्यांच्या दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्रांची छायाप्रत सादर करण्याचे व उपअभियंता जि.प.पा.पु.उपविभाग सिल्लोड यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांना देऊन संबंधितांना तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. परंतु या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अर्जासोबत त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत जोडली होती. तथापि हे प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी परत जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते पाठविले होते. तसेच त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी विनंती करुनही अपिलार्थीने त्यांचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राची प्रत न दिल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलाथी यांनी त्यांच्या दारिद्रयरेषेखालील असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत सादर केल्यास ते अपिलार्थीस ही माहिती त्वरित देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत सादर केली होती, तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ही प्रत त्यांना प्राप्त झालेली नाही. यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक त्या प्रमाणपत्रासह उपस्थित राहावे लागेल. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीकडून त्यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राची वैध प्रत त्यांना प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे

अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, कार्यालयीन दिवशी पूर्व नियोजित वेळी स्वतः जन माहिती अधिकाऱ्यांकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैध प्रमाणपत्र त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत वैधता तपासून तदनंतर पंधरा दिवसांपर्यंत त्यांना व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरित करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दशरथ एन. सुरडकर, रा. रमानगर, नर्सरीजवळ, टिळकनगरच्या बाजुला जैनोद्दीन कॉलनी सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५९
निर्णय दिनांक: २१-१०-२००९

१. श्री. बापूसाहेब ज्ञानोबा गायकवाड, : अपिलार्थी
रा. सरमकुंडी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग,भूम,
जि. उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. १६.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी वेळोवेळी सुनावणी घेऊनही निर्णय न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, भूम जि. उस्मानाबाद यांच्याकडे मौ. सरमकुंडी, ता.वाशी येथील ग्रामीण पाणी पुरवठयासंदर्भात सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विहिरीच्या कामाच्या, पाईप लाईनच्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती, या योजनेकरिता उचललेले पेमेंट व काम पूर्ण करण्याचा

कालावधी तसेच काम पूर्ण झाल्यास पाणी लागले का, पाणी लागले असेल तर हे पाणी गावाला पुरेल इतके आहे का ? पाणी लागले नसेल तर पाईपलाईन का केली व जलस्वराज्य योजनेतील बॉडीची नावे व पत्ते - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागिली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित उपअभियंता यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा दि. ०६.०५.२००८ रोजीचा अर्ज उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दि. ३०.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविला. यानंतर त्यांनी या पाणी पुरवठा समितीचे सचिव व अध्यक्षांना त्यांच्याकडील दि. ०७.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०७.२००८ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील दाखल केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. १५.०९.२००८ रोजी म्हणजेच अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर निर्णय दिला आहे. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे संबंधित अध्यक्ष/सचिव, पाणीपुरवठा समिती यांना सूचित केले. या आदेशानुसार संबंधित समितीच्या अध्यक्ष व सचिवांनी दि ०९.०९.२००८ रोजी माहिती पुरविल्याचे त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक २३.०९.२००८ रोजीच्या पत्रावरुन दिसून येते. मात्र अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सदर माहिती मिळण्यापूर्वी दि. १२.०९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित योजनेचे अध्यक्ष व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

ग्रामीण पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. ०९.०९.२००८ रोजी पोस्टाद्वारे पाठविल्याचे आयोगास अवगत केले. मात्र ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने ज्या योजनेसंदर्भात माहिती मागितली आहे व जरी शासनाच्या या योजनेची अंमलबजावणी करतांना शासनाचे भरीव अर्थसहाय्य होत असले तरीही ही योजना संबंधित गावाच्या ग्रामस्थांनी प्रत्येक गावात पाणीपुरवठा समिती स्थापन करुन कार्यान्वित करावयाची आहे. या योजनेची अंमलबजावणी ही शासनाच्या इतर विकास कामाच्या अंमलबजावणीपेक्षा पूर्णत: वेगळया पध्दतीने करावयाची आहे. ही योजना शासनाकडून आर्थिक सहाय्य प्राप्त करुन घेऊन आणि लोकवर्गणी गोळा करुन घेऊन ग्रामस्थांनी त्यांच्याच मार्फत स्वत: पार पाडावयाची आहे. या योजनेशी संबंधित अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही मौ.सरमकुंडी गावाच्या पाणीपुरवठयाशी संबंधित आहे. या समितीचे अध्यक्ष, सदस्य व सचिव हे सर्व ग्रामस्थ म्हणजे खाजगी व्यक्ती आहेत. त्यांना अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे संबोधता येणार नाही, त्यामुळे यासंदर्भात त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही. अपिलार्थीने ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे - उपअभियंता पाणीपुरवठा यांच्याकडे - ही माहिती मागितली आहे, त्या प्राधिकरणाचा या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अत्यल्प सहभाग आहे (केवळ तांत्रिक नियंत्रण ), सदर सार्वजनिक प्राधिकरण हे या योजनेवर दैनंदिन नियंत्रण ठेवत नाही व त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली कोणतीही माहिती कशाही प्रकारे उपलब्ध असू शकत नाही. अशा प्रकरणी माहिती उघड करण्यासाठी वापराव्या लागणाऱ्या पध्दती संदर्भात आयोगाने शासनाच्या पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांना वेळोवेळी सूचना केलेल्या आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांना फक्त विहिरीच्या कामाचे व पाईप लाईनच्या कामाचे अंदाजपत्रकाच्या प्रती व या योजनेवर झालेला खर्च आणि लागलेला कालावधी आणि जलस्वराज समितीतील सदस्यांची नावे व पत्ते एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये इस्टीमेटप्रमाणे काम झाले आहे काय? पाणी लागले नसेल तर पाईपलाईन का केली ? गावाला पुरेल इतके पाणी आहे काय? या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. कारण ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारणे व खुलासे अपेक्षित करणाऱ्या माहितीचा समावेश नसल्याने अशी माहिती मागणे अपिलार्थीस देय होत नाही. त्यामुळे आता अपिलार्थीस शासकीय प्राधिकरणाच्या प्रतिनिधीमार्फत ही माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल, हे पाहता उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद पाणीपुरवठा यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः, दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कृ.मा.प....५ ˆ वठा यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बापूसाहेब ज्ञानोबा गायकवाड, रा.मु.पो. सरमकुंडी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग,भूम, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १५६०/०८ व १५६१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६० व १५६१
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

१. श्री. स्वप्नील दशरथ सपकाळ, : अपिलार्थी
रा. वारेवडगाव, ता.भूम, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, भूम, जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी,
पंचायत समिती, भूम, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०९.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सदर दोनही अपील अर्ज अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे केले असल्याचे दिसून येत आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन देण्याची व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर आवश्यक ती दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या दोन प्रकरणांपैकी अपील क्र. १५६०/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. वारेवडगाव ता. भूम येथील पाणी पुरवठा योजना व दलित वस्ती सुधार योजनेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौ. वारेवडगाव येथील पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनसाठी

पंचायत समिती भूमकडून प्राप्त झालेल्या निधीची रक्कम, काम पूर्ण झाल्याचा दिनांक, कामाची मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रक, दलित वस्ती सुधार योजनेसाठी सिमेंटरोडचे किती मीटर काम झाले, त्या कामाच्या खर्चाची रक्कम - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या अपील क्र. १५६१/०८ च्या संदर्भातील अपिलार्थीने त्यांच्या दि.०७.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०७.२००७ ते दि. ३१.०५.२००८ या कालावधीमध्ये मौ. वारेवडगाव येथील झालेल्या मासिक सभा आणि ग्रामसभा यांच्या प्रोसिडींग बुकाची व हजेरी पत्र व नोटिसच्या प्रतींची मागणी केली होती.

अपील क्र. १५६०/०८च्या संदर्भात अपिलार्थीच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, "आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४७२/- अधिक ग्राम पंचायत कर रु. ३७९१/- अशी एकूण रु. ४,२६३/- इतके शुल्क शासकीय कोषागारात भरण्याचे" सूचित केले. अपिलार्थीच्या, दि. ०७.०६.२००८ रोजीचा माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अपील क्र.१५६०/०८ च्या संदर्भात दि. ०१.०७.२००८ रोजी व अपील क्र. १५६१/०८ च्या संदर्भात दि. १४.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपील क्र. १५६०/०८ च्या संदर्भात दि. ११.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपील क्र. १५६१/०८ च्या संदर्भात दि. १३.०८.२००८ रोजी आदेश देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय यांच्याकडून आदेश होऊनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या व दि. ०७.०६.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देय होत आहे. अपिलार्थीच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना, त्यांनी या शुल्कामध्ये ग्रामपंचायतीचा कर समाविष्ट केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती पुरविण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क व ग्रामपंचायतीचा कर यांचा एकमेकांशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद देण्याच्या ऐवजी माहितीपोटी अवास्तव शुल्क कळवून माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचेच या ठिकाणी उघड होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०७.२००८ रोजी लिहिलेल्या पत्रामध्ये अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे आवश्यक असलेल्या शुल्काचा तपशीलही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेला नाही व प्रथम प्रतिसाद विहित मुदतीत दिला नाही या दोनही कारणामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस लिहिलेले दि. १८.०७.२००८ रोजीचे पत्र अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या अपील क्र. १५६१/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना विचाराधीन दोनही प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत दोनही अपिलाच्या संदर्भातील मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी.

उपरोक्त दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला नाही व दिलेला प्रतिसाद हा अनावश्यक फी आकारणी करुन व विलंबाने दिलेला आहे आणि एका प्रकरणात तर प्रतिसादही दिलेला नाही, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती भूमचे संबंधित माहिती अधिकारी हे अधिनियमातील २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची दोनही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. १५६०/०८ व १५६१/०८ मान्य करण्यात येत आहे.
२. अपील क्र. १५६०/०८ व १५६१/०८ या दोन प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांना दोनही अपिलाच्या संदर्भातील मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.	श्री. स्वप्नील दशरथ सपकाळ, रा. मु. पो. वारेवडगाव, ता.भूम, जि. उस्मानाबाद

२.	जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा पंचायत समिती, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६२
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग, पैठण,
पैठण.

२. जन अपिलीय अधिकारी,
कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय दिला नाही आणि त्यांना दि. १५.०७.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती न पुरविल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.१२.२००७ ते दि. २७.०३.२००८ या कालावधीमध्ये पैठण तालुक्यात १०% लोकवर्गणीनुसार नळ योजनेच्या चालू कामासंदर्भात ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - १० % लोकवर्गणीद्वारे नळ योजना मंजूर झालेल्या पैठण तालुक्यातील गावाची योजनानिहाय यादी, प्राप्त निधी, अनुदानाचा स्त्रोत,तांत्रिक सल्लागाराची नेमणूक केल्याचा दिनांक व तांत्रिक सल्लागारांची यादी, नेमणूक करण्यापूर्वी योजनेचे किती रकमेचे काम पूर्ण झाले होते. तांत्रिक सल्लागार व उपअभियंता यांनी प्रत्येक कामावर केव्हा पैसा दिला याची तारीख, केलेल्या कामाची मोजमापे, नोंदविलेल्या तारखा, तांत्रिक तपासणीचा अभिप्राय आणि योजनेच्या समितीच्या खात्यावर पैसे काढताना उपअभियंता यांनी दिलेल्या पत्राच्या झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होता

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. ३१.०३.२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नसल्यामुळे त्यांनी ही माहिती ज्या ग्राम पंचायत पाणी पुरवठा समितीकडे उपलब्ध असते, त्या ११ ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा समितीकडे दि. ०९.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडे सादर करण्याचे कळविले व त्याच्या प्रती अपिलार्थीस दिल्या. तथापि अपिलार्थीस प्रत्यक्ष माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०२.०७.२००८ रोजी निर्णय देऊन दि. १५.०७.२००८ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दि. १५.०७.२००८ रोजी तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीशी त्यांचा संपर्क न होऊ शकल्यामुळे दि. १७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, ही त्यांना विचारले असता त्यांनी असे स्पष्ट केले की, पैठण तालुक्यामध्ये टाकळी पैठण या गावातही अशाप्रकारची योजना राबविली गेली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये या योजनेशी संबंधित माहितीचा समावेश नाही.

उपअभियंता यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ११.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्यात येत असल्याचे कळविले तसेच त्यानंतर दि. १५.०७.२००८ रोजी विभागीय कार्यालयामध्ये समक्ष उपलब्ध करुन ठेवली होती. परंतु संबंधित अर्जदार हे त्या दिवशी कार्यालयात न आल्यामुळे त्यांना ही माहिती पोस्टाद्वारे दि. १७.०७.२००८ रोजी पुरविली. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांना वेगवेगळया ग्रामपातळीवरुन संकलीत करावयाची असल्यामुळे व या समितीमध्ये संबंधित पदाधिकारी हे संबंधित गावाचे नागरिक असल्यामुळे त्यांना ही माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेण्यास विलंब लागला. अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये टाकळी पैठण येथील योजनेविषयीची माहिती समाविष्ट नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात उपअभियंता यांना आयोगाने विचारणा केली असता, ही माहिती अपिलार्थीस ते सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवतील, असे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने ज्या योजनेसंदर्भात माहिती मागितली आहे, ती योजना जरी शासनाच्या विभागामार्फत राबविण्यात येत असली व या योजनेची अंमलबजावणी करतांना जरी शासनाचे भरीव अर्थसहाय्य होत असले तरीही ही योजना संबंधित गावाच्या ग्रामस्थांनी प्रत्येक गावात पाणीपुरवठा समिती स्थापन करुन या समितीव्दारे कार्यान्वित करावयाची आहे. या योजनेची अंमलबजावणी ही शासनाच्या इतर विकास कामाच्या अंमलबजावणीपेक्षा पूर्णतः वेगळया पध्दतीने करावयाची आहे. ही योजना शासनाकडून आर्थिक सहाय्य प्राप्त करुन घेऊन आणि लोकवर्गणी गोळा करुन घेऊन ग्रामस्थांनी नियुक्त केलेल्या

समिती मार्फत पार पाडावयाची आहे. या समितीचे सर्व सदस्य खाजगी व्यक्ति आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे या योजनेशी संबंधित मागणी केलेली माहिती ही ग्रामपातळीवर प्रत्येक गावाच्या पाणीपुरवठयाशी संबंधित आहे. या समितीचे अध्यक्ष, सदस्य व सचिव हे सर्व ग्रामस्थ म्हणजे खाजगी व्यक्ती आहेत. या समितीस अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे संबोधता येणार नाही, त्यामुळे यासंदर्भात त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही. अपिलार्थीने ज्या अधिकाऱ्याकडे ही माहिती प्रथमतः मागितली आहे, त्या अधिकाऱ्याचा या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अत्यल्प सहभाग आहे (केवळ तांत्रिक नियंत्रण), सदर सार्वजनिक प्राधिकरण हे या योजनेवर दैनंदिन नियंत्रण ठेवत नाही व त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली कोणतीही माहिती कशाही प्रकारे उपलब्ध असू शकत नाही. अशा प्रकरणी माहिती उघड करण्यासाठी वापराव्या लागणाऱ्या पध्दती संदर्भात आयोगाने शासनाच्या पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांना वेळोवेळी आपल्या वेगवेगळया आदेशाव्दारे सूचना केलेल्या आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांच्या संदर्भात टाकळी पैठण या गावाची माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,जि.प.औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, संबंधित उपअभियंता हे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांच्या संदर्भातील मौ.टाकळी पैठण या गावाशी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवतील याची दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित उपअभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांच्या संदर्भातील मौ. टाकळी पैठण या गावाशी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,जि.प.औरंगाबाद यांनी, संबंधित उपअभियंता वरील क्र. (२) प्रमाणे अपिलार्थीस माहिती पुरवतील याची दक्षता घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, रा. राजेसंभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५,२६, जळगांव रोड, पोस्ट हर्सुल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग, पैठण, पैठण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६३
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

१. श्री. उत्तमराव मारोतराव बोड्डावार, : अपिलार्थी
रा. तरोडा (खु.), ता.जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ,
नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी आदेश देऊनही सहायक जन माहिती अधिकारी श्री. व्यवहारे यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व अपुरी माहिती दिली. तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जासोबत अपिलार्थीने एक स्वतंत्र अर्ज आयोगास सादर केला असून यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या कार्यालयातील हेड क्लार्क श्री. एम.के. व्यवहारे यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. उच्च पदस्थ अधिकाऱ्याने कायद्याचा आदर राखून त्यांच्या कार्यालयातील हेड क्लार्क मात्र माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे संबंधित हेड क्लार्क श्री.

एम.के.व्यवहारे यांना शास्ती लावावी आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना निःशुल्क देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील आस्थापनाविषयक बाबीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितली होती.

"सोबत जोडलेल्या शासन पत्रानुसार मंडळाअंतर्गत प्रत्यक्ष नेमणुकीच्या पदाव्यतिरिक्त अन्य पदाचे काम (लेखा लिपीक / अस्थापना लिपीक / इत्यादी स्वरुपाची कामे) सोपाविण्यात आलेल्या रु.अ.अ. वरील कर्मचा-यांची यादी, नाव, हुद्दा, व कार्यालयाचा पत्ता, सोपविण्यात आलेल्या कामाचे स्वरुप, तसेच पदस्थापना व कार्यभार देण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशाच्या प्रतीसह सविस्तर माहिती द्यावी."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कार्यालयीन आदेश शोधण्याचे काम त्यांच्याकडे चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे हे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगास ज्ञात होण्यास मार्ग नाही. मात्र या प्रकरणा संदर्भात अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाी सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

वरील परिच्छेदात नमुद केलेली वस्तुस्थिती व आयोगाकडील आज रोजी सुनावणीस सर्व संबंधितांची असलेली अनुपस्थिती पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३१.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.३१.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला नि-र्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उत्तमराव मारोतराव बोड्डावार, रा. "मातेश्वरी", संकेतनगर, मालेगांव रोड, तरोडा (खु), मु.पो. तरोडा (खु.), ता. जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६४
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

१. श्री. मल्लीनाथ महादेव मुळे, : अपिलार्थी
रा. उमरगा, जि. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासक,
आष्टा शिक्षण संस्था तथा अधीक्षक, सहायक
धर्मादाय आयुक्त कार्यालय, सोलापूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा,
सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक विहित वेळेमध्ये माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश इन्कारले, त्यामुळे त्यांच्यावर सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई होऊन जन माहिती अधिकारी यांना रु. २५,०००/- इतक्या शास्ती रक्कम बसविणे हे न्याय्य होईल.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची प्रशासक, आष्टा शिक्षण संस्था या पदावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी केलेल्या नेमणूकीच्या संदर्भात एकूण ११ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील सादर करताना त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १६ मुद्यांद्वारे माहिती मागविल्याचे नमूद केले आहे. तथापि आयोगाकडे त्यांच्या प्रथम अर्जाची प्रत

सादर करताना त्यामध्ये फक्त ११ मुद्यांचा समावेश असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने ही माहिती समक्ष मागितली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि. १०.०३.२००८ प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दि. ०९.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर करुन अपिलार्थीस १० दिवसांच्या आत त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि हे आदेश निर्गमित होऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाी सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६, ७, ८, ९, १० व ११ या मुद्यावरील माहिती ही, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येबाहेरची असल्यामुळे, देय होत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतची स्पष्टीकरणे व कारणे अपेक्षिली असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची कारणे, स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे त्यांना अनुज्ञेय नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ५ याच मुद्यावरील माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडून देय होत आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन विशेषतः जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०९.०४.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यांनी देखील या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये कसूर केल्याचा निष्कर्ष काढला असल्याचे दिसून येत आहे. आयोगही उपलब्ध कागदपत्रांवरुन याच निष्कर्षाप्रत आला आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिल्याप्रमाणे मुद्दा क्र. १ ते ५ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांपर्यंत व्यक्तिशः व विनामूल्य देण्यासाठी उपलब्ध करुन ठेवावी. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून या मुदतीत पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कसूर केल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईस पात्र असल्याचे दिसून येत आहे. सबब धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ५ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांपर्यंत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मल्लीनाथ महादेव मुळे, रा. बालाजी नगर, लोहारेकर हॉस्पीटलजवळ उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, आष्टा शिक्षण संस्था तथा अधीक्षक सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त भवन, तिसरा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८०७
निर्णय दिनांकः २१-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बाबूराव नागप्पा पडसलगे,<br>रा.नांदगाव, ता.तुळजापूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.०२.०२.२००७ रोजी सादर केलेले व औरंगाबाद येथील कार्यालयात दि. २५.०९.२००८ रोजी सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देता ती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमधील निर्णय झाल्यानंतर मिळाली. माहिती देण्यासाठी विलंब झाला, हे मान्य असूनही त्यांच्यावर विलंबाबाबत कोणतीही शास्ती अथवा प्रशासकीय कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असून, या माहितीमध्ये त्यांनी मागणी केलेल्या विहिरीचा पंचनामा व शिफारसपत्राच्या प्रतींचा समावेश नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.०४.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विहिरीच्या अधिग्रहणासंदर्भात केलेला पंचनामा ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०१.२००७ रोजी निर्णय देऊन गट विकास अधिकारी यांनी तहसीलदार, तुळजापूर यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीस माहितीची प्रमाणित प्रत देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.०१.२००७ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीमध्ये विहिरीच्या अधिग्रहणासंदर्भात केलेल्या पंचनाम्याची व शिफारस पत्राच्या प्रती उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणी सुनावणी आज दिनांक २१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दि. १०.०१.२००७ रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती पुरविली आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मालकीच्या विहिरीच्या अधिग्रहणाबाबत पंचायत समिती, तुळजापूर यांनी तहसीलदार, तुळजापूर यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. तथापि ती विहिर शासकीय मालकीची असल्याचे आढळून आले आहे. तहसीलदार यांनी या विहिरीचा मूळात पंचनामा केला आहे किंवा कसे, हे त्यांना आता सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मूळात त्यांच्याकडे संपूर्ण स्वरुपात उपलब्ध नाही.

अपिलार्थीच्या मालकीच्या विहिरीच्या अधिग्रहणाबाबत ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. परंतु ग्राम पंचायत व पंचायत समितीच्या शिफारशीने तहसीलदारास अशाप्रकारचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तहसीलदार कार्यालयामार्फत अशा प्रस्तावाची पहाणी करुन त्याचा पंचनामा केला जातो. अशाप्रकारची कार्यप्रणाली सध्या या प्राधिकरणाकडे प्रचलीत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये तहसीलदाराने नेमक्या कोणत्या तारखेस पंचनामा केला आहे, याचा उल्लेख नाही. तरीही अपिलार्थीस माहिती देणे सुलभ व्हावे म्हणून गट विकास अधिकारी व तहसीलदार यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी तहसीलदार, तुळजापूर यांच्याशी संपर्क साधून विहिरीच्या अधिग्रहणाच्या पंचनाम्याची सद्यस्थिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य व व्यक्तिशः देण्यासाठी तीस दिवसापर्यंत उपलब्ध करुन ठेवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात "व्यक्तिशः" माहिती मागितल्याने त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गट विकास अधिकारी यांच्याकडे पूर्णतः उपलब्ध नव्हती त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठविणे भाग होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही या प्रकरणी केल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या त्यांच्या विहिरीच्या अधिग्रहणाच्या संदर्भात तहसीलदार यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत अथवा त्याच्या सद्यस्थितीची संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः देण्यासाठी तीस दिवसापर्यंत उपलब्ध करुन ठेवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबूराव नागप्पा पडसलगे, रा.मु.पो.नांदगाव, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७
निर्णय दिनांक २१/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. एकनाथ हरीभाऊ गायकवाड,<br>रा.प्रणव विहार, १०२, बागडे मळा, बालिकाश्रम रोड, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव,<br>अहमदनगर जिल्हा कृषी विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, अहमदनगर | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २१.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, अहमदनगर जिल्हा कृषी विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर यांचेकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४.०४.२००९ रोजी आपले आदेश पारीत करुन, जन माहिती अधिकारी यांना केंद्रीय माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात उचित कार्यवाही करण्याचे सुचित केले. तथापि

माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर वीस रुपये किमतीचे विहित शुल्कापोटीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविलेले नाहीत. तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्र ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ९७/०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एकनाथ हरीभाऊ गायकवाड, प्रणव विहार, १०२, बागडे मळा, बालिकाश्रम रोड, अहमदनगर.
२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, अहमदनगर जिल्हा कृषी विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९५
निर्णय दिनांक २१/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, तरोडा बु., जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २२.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब

लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१०
निर्णय दिनांक २१/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २४.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०५.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २ महिने १८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही

बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३१
निर्णय दिनांक २१/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०९.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३ महिने ३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले

नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्यालय, देवगीरी विश्रामगृह, नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बांधकाम भवन, औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२२
निर्णय दिनांक २२/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शिंदे रामभाऊ जयवंत,<br>व्दारा-तालुका कृषी अधिकारी, अहमदनगर,महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन / सचिव,<br>अहमदनगर जिल्हा कृषी कर्मचारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १६.०१.२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २१.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक २६.०९.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन / सचिव, अहमदनगर जिल्हा कृषी कर्मचारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १३.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी दि. ०८.१२.२००६ रोजी आपले आदेश पारीत करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती

देण्याचे सुचित केले. यानंतर मुदतीत माहिती न मिळाल्याचे व चुकीची माहिती देण्यात आल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्र ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २८२२/०७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिंदे रामभाऊ जयवंत, व्दारा-तालुका कृषी अधिकारी, अहमदनगर, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन / सचिव, अहमदनगर जिल्हा कृषी कर्मचारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३१

निर्णय दिनांक २२-१०-२००९

१ श्री. शेख लतीफ पिता शेख निजामोद्दीन फुलारी (अतार), : अपिलार्थी
मोमीनपुरा, बीड, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्कीजवळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्कीजवळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ३१-०३-२००८ रोजी माहिती अधिका-याकडे अर्ज पाठवून माहिती मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आणि या अपिलाचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०६-२००८ रोजी पारीत करुन तो त्यांना दिनांक २३-०६-२००८ रोजी प्राप्त झाला. या निकालामध्ये जन माहिती अधिकारी यांना दहा दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सालारजंग बशीरगंज या दर्ग्याच्या जागेच्या भाडेपट्टयासंदर्भात सन २००४ ते दि. ३१-०३-२००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे स्पष्ट केले व तसेच यासंदर्भात त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी वैयक्तीक व लेखी पत्राव्दारे अनेक वेळा संपर्क साधूनही व महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेशित करुनही अद्यापपर्यंत त्यांना त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सालारजंग बशीरगंज या बीड शहरातील दर्गाच्या भाडे-पट्टयासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे

अवलोकन करता या अर्जातील  मुद्दा क्रमांक २ व  ४ व्दारे अपिलार्थीने मागितलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे " सदरील प्लॉटची भाडेचिठ्ठी का करुन दिली जात नाही, हे दिसून येत नाही " असा मुद्दा त्यांच्या अर्जामध्ये मांडला आहे. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीस  निश्चित कोणती माहिती हवी आहे हे कळून येत नाही. मात्र अप्रत्यक्षरित्या अपिलार्थीने दर्गाच्या प्लॉटची भाडेचिठ्ठी का करुन देण्यात येत नाही याची कारणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विचारल्याचे या मुद्दयावरुन प्रतीत होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतची कारणे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे  अनुज्ञेय नाही. अशा प्रकारची माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची  आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे " प्लॉटची भाडेचिठ्ठी माझ्या नावे केव्हा करुन मिळेल, मला त्यासाठी काय काय करावे लागेल" ही माहिती विचारली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, प्लॉटची भाडेचिठ्ठी अपिलार्थीच्या नावावर केव्हा करुन मिळेल ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती भविष्यकाळातील आहे आणि ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही उपलब्ध असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. मात्र याच मुद्दयातील " मला यासाठी काय काय करावे लागेल " या मुद्यावरील माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्दा क्रमांक १, ३, ४ अंशतः व ५ व्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता ती माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देणे हे जन माहिती अधिकारी यांना अशक्य होते किंवा ही माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री त्यांना मोठ्या प्रमाणावर वळवावी लागणार होती अशातली कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही आणि याहीपेक्षा महत्वाचे असे की, अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत केलेल्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती

अधिकारी यांनी मूळात अधिनियमातील कलम ७ अन्वये कसलाही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०६-२००८ रोजी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, असे सर्वजण एकत्रितपणे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी जबाबदार असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा असे आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ४ मधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेला अंशतः भाग वगळून, उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती- तील मुद्दा क्रमांक २ व ४ मधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेला अंशतः भाग वगळून, उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख लतीफ पिता शेख निजामोद्दीन फुलारी (अतार), मोमीनपुरा, बीड, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्कीजवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्कीजवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३२

निर्णय दिनांक २२-१०-२००९

१ श्री. राजेश सांडुजी हिवराळे, : अपिलार्थी
घर क्र. २६१, मिलींदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय आदिवासी
विकास, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय आदिवासी
विकास, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : सहायक आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विनिर्दिष्ट कालावधीमध्ये पूर्ण माहिती कळविली नाही. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती दुष्ट उद्देशपूर्वक असत्य कळविली आहे असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी त्यांच्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या अर्जानुसार माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सदरील लेखी परीक्षेत चुकीची उत्तरे काढून गुण दिले, या प्रश्नांचे गुण अपिलार्थीस दिले का ? आणि ते गुण देताना आलेल्या अडचणी लेखी पुराव्यानिशी, शासन निर्णय दिनांक १८-१०-१९९७ व दिनांक २५-०१-१९९१ नुसार श्री. दिलीप आढावे व श्रीमती वंदना पवार यांची निवड खुल्या प्रवर्गातून का केली नाही व अपिलार्थीच्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या अर्जावर काय कार्यवाही झाली, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस, निवड समितीचे तत्कालीन अध्यक्ष यांच्याकडून अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात अभिप्राय मागितले आहेत, त्यांच्याकडून अभिप्राय प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०६-२००८ रोजी पत्र देऊन अपिलार्थीचा अपील अर्ज विहित मुदतीच्या आत प्राप्त झाला असल्याने त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले व तसेच अपिलार्थी यांना मुदतीत माहिती दिली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठी-चा प्रथम अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित तत्कालीन निवड समितीचे अध्यक्ष श्री. खाडे यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक २६-०४-२००८ रोजीचा अर्ज पाठवून दिला. तथापि तत्कालीन निवड समितीचे अध्यक्ष श्री. खाडे यांनी अपिलार्थीच्या अर्जावर त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे स्पष्टीकरण दिले व या स्पष्टीकरणाची प्रत अपिलार्थीस दिनांक ११-०६-२००९ रोजी दिली आहे. ही प्रत अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने ज्या तीन मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे त्यातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने श्री. दिलीप आढावे व श्रीमती वंदना पवार यांची निवड खुल्या प्रवर्गातून का केली नाही अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण हवे असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरण सदृश माहिती मागविणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीबाहेरचे आहे. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात दिनांक २९-०४-२००८ रोजी विचारलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अंतिमतः आता दिनांक ११-०६-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या अर्जावर संबंधित समितीच्या अध्यक्षाचे अभिप्राय मागविण्याची आवश्यकता नव्हती. अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देणे जास्त संयुक्तीक झाले असते. परंतु त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या अर्जावर समितीच्या अध्यक्षाचे अभिप्राय मागविले आणि त्यांनी ते दिनांक २३-०५-२००९ रोजी म्हणजे जवळजवळ

एक वर्षाहून जास्त कालावधीनंतर दिल्याने त्याचा परिणाम अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती विलंबाने प्राप्त होण्यात झाला. तसेच अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेले उत्तर हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. त्यामुळे यापुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी अर्जदार आणि जन माहिती अधिकारी यांना एकत्रितपणे बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून त्यावर आपले लेखी आदेश अधिनियमातील विहित मुदतीत पारीत करावेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. या मुद्दयासंदर्भात देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अध्यक्षाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०६-२००९ रोजी पुरविली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या अर्जामध्ये अपिलार्थीस प्रश्नाचे गुण वाढवून देण्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही मुद्दयावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार केली नव्हती. या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०४-२००८ च्या पत्रावर कोणती कार्यवाही केली, ही माहिती त्यांना आवश्यक आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या तक्रार अर्जाच्या संदर्भात वेगवेगळ्या प्राधिकरणाशी दिनांक २९-०४-२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व त्या तक्रार अर्जाशी संबंधित त्यांच्या अभिलेख्यावर असलेल्या टिपण्यांच्या प्रती ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या माहिती संदर्भात अपिलार्थीस जरी काही आक्षेप असतील तर त्यांनी या आक्षेपांची पुर्तता सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी हे प्रकरण ज्या पध्दतीने हाताळले आहे ती पध्दत पाहता या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सिध्द होत आहे, त्यामुळे

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग, नाशिक यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश सांडुजी हिवराळे, घर क्र. २६१, मिलींदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३३

निर्णय दिनांक २२-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. गित्ते राधाकिशन ज्ञानेश्वर,<br>मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,<br>बीड | : प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयेगाकडे दिनांक २३-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

या अपील अर्जाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २२-०९-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे

मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०४-२००८ रोजी प्राप्त झाली असल्याचे व प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील ते मागे घेत असल्याचे देखील या पत्रामध्ये नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १५३३/२००८, दिनांक २३-०७-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१०-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गित्ते राधाकिशन ज्ञानेश्वर, मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३४

निर्णय दिनांक २२-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तुकाराम धनाजी त्रिभुवन,<br>प्लॉट क्रमांक १३, लिटील फ्लॉवर शाळेजवळ,<br>औरंगाबाद - ४३१ ००२ | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>भूमि अभिलेख आणि भूमापन कार्यालय,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये तातडीने शेत मोजणीसाठी आलेल्या अर्जांची संख्या, अर्जदारांची नांवे, तातडीच्या

मोजणीसाठी भरलेल्या फीस पावतीच्या सत्यप्रती, पूर्ण झालेल्या प्रकरणांची संख्या, प्रलंबीत राहिलेल्या प्रकरणांची संख्या, कार्यवाही प्रलंबीत राहण्याची कारणे, शेत जमीन मोजणीसाठी संवर्ग अथवा प्रवर्ग किंवा मागासवर्गीय अशी प्रतवारी लावली आहे काय किंवा कोणती प्रतवारी मोजणीसाठी कार्यालय अवलंबते - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन २००५-२००८ या कालावधीशी संबंधीत व रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहेत. अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबत पुराव्यादाखल स्वस्त धान्य दुकानाच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडली होती. तथापि अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याचा बोध होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या स्वस्त धान्य दुकानाची मूळ शिधापत्रिका ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे हे ठरविण्यासाठी घेऊन येण्याचे व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसतील तर अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीचे १५०० रुपये इतके शुल्क भरुन त्यांच्या कार्यालयातून दिनांक २३-०६-२००८ पर्यंत माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस नियमानुसार दिनांक ०९-०९-२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दिनांक २५-०८-२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपिलार्थीस पाठविली आहे व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यासंदर्भात पोस्टाची पोच पावती देखील आयोगास सादर केली आहे. यावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती पुरविली गेली आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा वैध पुरावा मागितला असता तो अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत सादर न केल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब लागल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. तसेच प्राप्त माहितीवर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थीस आयोगासमोर उपस्थित नाहीत अथवा त्यांनी तसे कोणत्याही माध्यमाव्दारे आयोगास कळविले नाही, हे पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम धनाजी त्रिभुवन, प्लॉट क्रमांक १३, लिटील फ्लॉवर शाळेजवळ, औरंगाबाद - ४३१ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३५

निर्णय दिनांक २२-१०-२००९

१ श्री. धुमाळ शहाजी अर्जून, : अपिलार्थी
पशूधन पर्यवेक्षक, पशूसर्वचिकित्सालय, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पशूधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती,
तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यनिर्वाह निधी खाते क्रमांक एजीव्हीएमएच-६९०३ या खात्यात फेब्रुवारी २००२ ते मार्च २००६ या कालावधीतील जमा व भरणा रकमेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये त्यांच्या वेतनातून कपात

झालेली भविष्यनिर्वाह निधी मासिक वर्गणी  व परतावा रक्कम किती, रक्कम कोठे जमा झाली, कशी जमा झाली, जमा झाली नसल्यास जन माहिती अधिकारी यांनी केलेले कार्यवाही - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, फेब्रुवारी २००२ ते मार्च २००६ या कालावधीपैकी जानेवारी २००६ ते मार्च २००६ या कालावधीतील त्यांच्या भनिष्यनिर्वाह निधीच्या रकमा उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या लेखा विभागात जमा आहेत व फेब्रुवारी २००२ ते डिसेंबर २००५ या कालावधीतील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे  कळविले.  या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असेही नमूद केले आहे की, तत्कालीन कर्मचारी श्री. आर. एच. पवार यांनी लेखा विभागाचे अभिलेखे न ठेवल्यामुळे आणि लेखा विभागाचा पदभार न दिल्यामुळे त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा  इतर संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून शोध घेण्यात येत आहे.  जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न  झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.  त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०८-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीतील वजा केलेल्या रकमेचा तपशील पुरविला.  तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचा जिल्हा परिषद, उस्मानाबाद मध्ये अपहार झाल्याचे आयोगास अवगत केले.  त्यांना त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीतील  कपात केलेल्या रकमेचा तपशील  आणि या

प्रकरणी जबाबदार असलेल्या व्यक्तीवर केलेल्या कार्यवाहीचा तपशील आवश्यक असल्याचे त्यांनी  आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०६-२००८ रोजी व तदनंतर दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याकडे उपलब्ध माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती प्रथमतः दिनांक ०९-०६-२००८ व तदनंतर दिनांक ०७-०८-२००८ रोजी पुरविली आहे.  परंतु अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांच्या भविष्यनिर्वाह निधी रकमा योग्य ठिकाणी जमा झाल्या नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित मुद्दयावर अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही.  यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, जिल्हा पशू संवर्धन विभागामधील कर्मचारी श्री. आर. एच. पवार यांनी या प्रकरणी भविष्यनिर्वाह निधीचा अपहार केला असून यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे तक्रार केलेली आहे व सध्या श्री. आर. एच. पवार यांच्यावर विभागीय चौकशी चालू आहे.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जानेवारी २००३ ते फेब्रुवारी २००५ या कालावधीची माहिती  जन माहिती अधिकारी  यांच्याकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांचे, अपिलार्थीस माहिती न देण्याचे हे समर्थन मान्य करता येण्याजोगे नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या भविष्य निर्वाह निधीसंदर्भात माहिती मागितली आहे आणि ही माहिती उपलब्ध नसल्याचा अत्यंत बेजबाबदार प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस दिला आहे. भविष्य निर्वाह निधीच्या संदर्भातील माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी, माहितीचे गांभीर्य हे मुद्दे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे त्यांना आता आदेशित करण्यात येत आहे. या कालावधीत त्यांना अपिलार्थीस ही माहिती आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे देता आली नाही तर याच कालावधीमध्ये त्यांनी ही माहिती जतन करुन ठेवण्याची ज्या कर्मचाऱ्यावर जबाबदारी होती अथवा सध्या आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांवर

त्यांनी फौजदारी स्वरुपाची (याच कालावधीमध्ये त्यांनी) कार्यवाही करावी असेही त्यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे व तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाच्यासंदर्भात इतर प्राधिकरणाकडे माहिती अधिकाऱ्याने केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धुमाळ शहाजी अर्जून, पशूधन पर्यवेक्षक, पशूसर्वचिकित्सालय, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा पशूधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३६

निर्णय दिनांक २२-१०-२००९

१ श्री. धनंजय सौदागर तट, : अपिलार्थी

मु. बेगडा, पो. सुर्डी, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेगडा, पो. सुर्डी,

तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत),

पंचायत समिती, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही, जादा शुल्क आकारुनही त्यांनी अपूर्ण माहिती दिली आणि जन अपिलीय अधिकारी यांनी संदिग्ध निर्णय दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित, वेगवेगळ्या कालावधीतील काही माहिती एकूण नऊ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक २४-०९-२००५ ते २१-०५-२००८ या कालावधीतील ग्रामसभेच्या व मासिक सभेच्या इतिवृत्तांताच्या नकला आणि या कालावधीमध्ये ग्रामपंचायत सदस्यांना मासिक मिटींगसाठी काढलेल्या नोटीसच्या नकला, या कालावधीतील किर्द बुकाच्या नकला, ग्रामपंचायत खाते नं. १ व २ च्या बँक पासबुकाच्या नकला, या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीने जवाहर योजनेअंतर्गत केलेली कामे व त्यावर झालेला खर्च, या कालावधीतील जन्म मृत्युच्या नोंदणीच्या नकला, या कालावधीमध्ये ग्रामपंचायतकडे भरणा झालेल्या पावतीच्या नकला, जवाहर योजनेअंतर्गत झालेल्या कामाच्या खर्चाच्या पंचायत समितीने केलेल्या मोजमाप पुस्तकाच्या नकला, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता कमिटीने अपिलार्थीने प्रथम अर्ज करेपर्यंत कोणती कामे केली व त्यावर किती खर्च झाला - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २८-०६-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात या शुल्काचा भरणा केला. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहिती दिनांक ०५-०८-२००८ पर्यंत पुरविण्याचे व मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात २ दिवसात माहिती पुरविण्याच्या सूचना जन माहिती अधिकारी यांना दिल्या. तथापि या मुद्दयांवरही जन माहिती अधिकारी यांनी तदनंतर अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही तसेच दिलेली माहिती अपूर्ण आहे. हा मुद्दा स्पष्ट करतांना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०१-०१-२००७ ते २१-०५-२००८ या कालावधीतील ग्रामपंचायत सदस्यांना बजावलेल्या नोटीसच्या नकला प्राप्त झालेल्या नाहीत, ग्रामपंचायतीचे महाराष्ट्र बँकेत खाते असतांना महाराष्ट्र बँकेच्या खाते पुस्तकाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित कोणतीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. तसेच त्यांना मुद्दा क्रमांक ९ ची माहितीही प्राप्त झाली नाही. त्यांना आतापर्यंत ३०० पृष्ठांची माहिती प्राप्त झाली असून त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी १२०० रुपये इतके शुल्क स्वीकारले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर मार्च २००९ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी शाम कदम नावाचे जन माहिती अधिकारी कार्यरत होते. ते सध्या उस्मानाबाद तालुक्यात मौजे गावठी येथे कार्यरत आहेत. अपिलार्थीस अद्याप प्राप्त न झालेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस ते १५ दिवसाच्या आत विनामूल्य देऊ शकतील असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरीही त्यांनी त्यांच्या दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीच्या १२०० रुपये शुल्काचा तपशील त्यांना दिलेला नाही,

जो अपिलार्थीस त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे त्यांना अनिवार्य होते. अपिलार्थीने दिनांक २८-०६-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०६-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविणे क्रमप्राप्त असतांना देखील त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ११-०७-२००८ रोजी पुरविली आहे. पुरविलेली माहिती ही अपूर्ण आहे. अपिलार्थीस नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती प्राप्त नाही याचा सविस्तर खुलासा त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये आणि त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेला आहे. अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील अद्यापपर्यंत न दिलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. याच बरोबर जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याबद्दल आता अपिलार्थीस त्यांच्याकडून दिनांक २८-०६-२००८ रोजी स्वीकारलेले शुल्क रुपये १२०० इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क १५ दिवसात परत करण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अवाजवी शुल्क आकारल्याचे सकृतदर्शनी आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीकडून शुल्क प्राप्त करुन घेऊनही विलंबाने माहिती देणारे संबंधित जन माहिती अधिकारी श्री. शाम कदम (सध्या गावठी तालुका उस्मानाबाद येथे कार्यरत) यांनी व तसेच सध्याचे कार्यरत जन माहिती अधिकारी श्री. घंटे तानाजी नरसिंग यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे या प्रकरणी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. शाम कदम (सध्या मौजे गावठी, तालुका उस्मानाबाद येथे कार्यरत) व तसेच सध्याचे कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी श्री. घंटे तानाजी नरसिंग यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. शाम कदम (सध्या मौजे गावठी, तालुका उस्मानाबाद येथे कार्यरत) व सध्याचे कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी श्री. घंटे तानाजी नरसिंग यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीकडून माहिती देण्यापोटी दिनांक २८-०६-२००८ रोजी स्वीकारलेले शुल्क रुपये

१२००, इतके अपिलार्थीस परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनंजय सौदागर तट, मु. बेगडा, पो. सुर्डी, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेगडा, पो. सुर्डी,

तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (पं), पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३७
निर्णय दिनांक: २२-१०-२००९

१. श्री. संजय मधुकर केवडकर, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष/सचिव,
ग्रामीण पाणी पुरवठा योजना,ग्राम पंचायत,गंधोरा,
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा
उपविभाग,तुळजापूर, जि.उस्मानाबाद.
विद्यमान जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत गंधोरा,
ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन सुध्दा त्यांना माहिती देण्यात आली नाही. त्यांना संबंधितांनी माहिती देण्यासाठी जाणूनबुजून टाळाटाळ केली आणि विहित मुदत संपून गेली तरी संबंधितांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये कथित जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा, ग्रामपंचायत कार्यालय गंधोरा

यांच्याकडे गावातील भारत निर्माण योजनेअंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या झालेल्या कामासंदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे सन २००६ ते दि. २८.०६.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि कथित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीत अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, तुळजापूर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर उपविभागीय अभियंता जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग,तुळजापूर यांनी दि. २९.०८.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणालाही आदेशित न करता संबंधित माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई होणे उचित राहील असे आपले अभिप्राय व्यक्त केले. उपअभियंता यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, अपिलार्थीने अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, ग्रामपंचायत,गंधोरा,ता.तुळजापूर यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला व त्यासंदर्भातील प्रथम अपील अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद,ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, तुळजापूर यांच्याकडे केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, त्यांनी ज्या योजनांच्या संदर्भात माहिती मागितली आहे, त्या योजनांशी संबंधित सर्व कागदपत्रे ही ग्रामीण पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणाऱ्या पाणीपुरवठा समितीकडे उपलब्ध असतात. ही समिती संबंधित गावातील लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची मिळून बनलेली असते. अशाप्रकारच्या समितीवर कोणीही जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेलेले नाहीत, तसेच अशाप्रकारच्या माहितीच्या अर्जासंदर्भात प्रथम अपील कोणाकडे करावयाचे याचा देखील निर्णय, अपिलार्थीने प्रथम अर्ज करतेवेळी जिल्हा परिषद, उस्मानाबादकडून पारित केला गेला नव्हता.

त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यावरील अपील अर्ज हे दोनही या प्रकरणी अवैध ठरत आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या आदेश क्र.जिपउ/जलस्व/आस्था/३६०/०९, दि.०१.०६.२००९ अन्वये अशाप्रकारच्या योजनेच्या संदर्भात ग्रामीण स्तरावरील माहिती देण्यासाठी संबंधित गावाच्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना माहिती अधिकारी म्हणून व संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहे, हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आता हीच माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार गंधोरा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज करुन मिळवावी. जर संबंधित ग्रामसेवक यांनी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही तर, ते गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे प्रथम व तद्नंतर आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती न मिळाल्यामुळे संबंधित समितीवर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने मूळात ज्या समितीकडे माहिती मागितली आहे, ती समिती अधिनियमातील कलम २(ज) मधील तरतुदीनुसार कोणत्याही अर्थाने सार्वजनिक प्राधिकरण म्हणून संबोधली जाऊ शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांची अशाप्रकारची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या अपील अर्जावरील सर्व मुद्दे निकाली निघत असल्याने त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय मधुकर केवाडकर,रा. शुक्रवारपेठ,तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. अध्यक्ष/सचिव,ग्रामीण पाणी पुरवठा योजना,ग्राम पंचायत,गंधोरा जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत,गंधोरा जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३८
निर्णय दिनांकः २२-१०-२००९

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, : अपिलार्थी
   रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
   उपअभियंता,
   जिल्हा परिषद, पाणी पुरवठा उपविभाग,पैठण,
   जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
   कार्यकारी अभियंता,
   पाणीपुरवठा विभाग,जिल्हा परिषद,
   औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत निकाल दिला नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न दिल्याबद्दल व जन अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत निर्णय न दिल्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर आयोगाने कारवाई आदेशित करण्याची अपिलार्थीने या अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे आणि तसेच आपल्या मूळ माहितीची मागणी या अर्जाद्वारे कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. टाकळी पैठण, ता.पैठण पाणीपुरवठा योजनेमधील पाईपलाईनच्या कामाची दि. ०१.१२.२००७ ते २३.०१.२००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जायकवाडी धरणाच्या बुडित क्षेत्रापासून ते टाकळी पैठण गावापर्यंत पाणीपुरवठा योजनेनुसार पाईपलाईनचे ३ कि.मी. चे काम कोणी व केव्हा पूर्ण केले? या कामास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी विहित प्राधिकरणाने केव्हा दिली?, उपअभियंता, पाणीपुरवठा पैठण यांनी या कामास भेटी दिल्याच्या तारखा, पंचायत समिती, गट विकास अधिकारी, पैठण यांच्या मार्फत जानेवारी अखेर पंचनामा केला, हे खरे आहे काय? त्या पंचनाम्याची प्रत व यासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, कामाच्या मंजूरीचे आदेश, अंदाजपत्रकाच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, मुद्दा क्र. १ बाबत ग्रामपंचायतीने कोणत्याही प्रकारचा ठराव दिलेला नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती देता येणार नसल्याचे कळविले व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस दिली. तसेच या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सदर योजना मंजूर नसल्याचे कळविले. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस टाकळी पैठण पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावाच्या प्रती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्याकडील दि. २२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे आयोगास स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने ज्या पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती मागविली आहे, ती माहिती संबंधित गावाच्या पाणीपुरवठा समितीकडेच उपलब्ध असते. यावर अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, या योजनेवर सर्व तांत्रिक स्वरुपाचे नियंत्रण उपअभियंता यांचे असल्याने, ही माहिती उपअभियंता यांच्याकडे उपलब्ध असावयास हवी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या योजनेच्या संदर्भातील माहिती मागितली आहे त्या माहितीशी संबंधित योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याचे काम हे संबंधित गावातील ग्रामीण पाणी पुरवठा समितीचे असते. या समितीतील सर्व सदस्य हे गावातील जनतेने निवडून दिलेल्या व्यक्ती असतात, ते कोणत्याही प्रकारे शासनाचे सेवक नसतात. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, अशा प्राधिकरणाकडे उपलब्ध असते की, ते प्राधिकरण हे अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून घोषित केले जाऊ शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीस अशाप्रकारच्या पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भातील माहिती पाणी पुरवठा योजनेच्या उपविभागीय अभियंता यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. मूळात अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीसंदर्भात हा अर्ज संबंधित गावातील पंचायत समितीकडे अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांच्याकडे केला असता तर कदाचित अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यास काही मदत होऊ शकली असती, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती मर्यादित स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे अपिलार्थीने हे काम कोणी व केव्हा केले, अशी माहिती उपअभियंता यांच्याकडे विचारली आहे. या योजनेमधील तांत्रिक समन्वय अधिकारी म्हणून उपअभियंता यांच्याकडे ही माहिती उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. तसेच त्यांच्या कार्यालयाने या योजनेस तांत्रिक मंजूरी दिली असल्यास त्या तांत्रिक मंजूरीचे आदेश देखील उपअभियंता यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असणे संभवत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दि. २२.०२.२००८ रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीने उपअभियंता यांना या योजनेमध्ये दिलेल्या भेटीचे दिनांक व त्यासंदभातील आदेशाच्या प्रती मागितल्या आहेत, त्यादेखील उपअभियंता, पाणी पुरवठा उपविभाग,पैठण यांच्याकडे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ च्या संदर्भातील माहिती ही उपअभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध असूनही उपअभियंता यांनी अपिलार्थीस दि. २२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ही निश्चितपणे दिशाभूल करणारी आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ शी संबंधित अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस देय असलेली माहिती देखील न देता, संबंधित उपअभियंता यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित उपअभियंता यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, असे नमूद करण्यात येत आहे की, या प्रकरणी आयोगाकडे सुनावणीसाठी उपस्थित असलेले जन माहिती व अपीलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींना या योजनेसंदर्भात कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, इत:पर राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीस त्यांच्या कार्यालयातील प्रतिनिधींना पाठवितांना त्या कर्मचारी/अधिकारी यांना संबंधित प्रकरणाची किमान माहिती व ज्ञान आहे आणि आयोगाकडील सुनावणीस उपस्थित

राहण्यासाठी ते पुरेसे कार्यक्षम आहेत, याची खात्री करुन नंतरच अशा कर्मचारी/अधिकाऱ्यांना आयोगाकडे सुनावणीसाठी पाठवावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,२ व ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे,राजेसंभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५,२६, जळगाव रोड, पोस्ट हर्सुल, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३९
निर्णय दिनांकः २२-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अमरराजे कदम परमेश्वर,<br>रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने द्वितीय अपील करेपर्यंत देखील त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील केले आहे आणि आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००१ ते २००८ या कालावधीतील तुळजापूर तालुक्यामध्ये झालेल्या कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ज्या गावात ही योजना मंजूर झाली आहे, त्या गावाची

नोंद, कामाची सद्यस्थिती, झालेला खर्च, जन माहिती अधिकारी यांनी या कामावर दिलेल्या भेटीचा पहाणी अहवाल, यासंदर्भात शाखा अभियंता व देखरेख अधिकारी यांना काढलेल्या नोटीसच्या प्रती, आवक-जावक रजिस्टरची प्रत, तुळजापूर तालुका या गावामध्ये जन माहिती अधिकारी यांनी केलेले दौरे, त्यांचे शासकीय वितरणाच्या सन २००८ मधील झालेल्या दौऱ्याचे अंतर/कि.मी. - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४५०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुवसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४५०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्या अपिलावर निर्णय होण्यापूर्वीच त्यांनी दि. २९.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे पोचपावती देखील त्यांच्याकडे उपलब्ध आहे. सदर माहिती अपिलार्थीस

दि. ०४.१०.२००८ रोजी प्राप्त झाल्याची नोंद देखील त्यांच्याकडे आहे व ती नोंद त्यांनी आयोगास अवलोकनार्थ सादर केली. या शिवाय त्यांनी अपिलार्थीशी त्यांच्या कार्यालयातील सहायक माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी दूरध्वनीद्वारे दि.०७.१०.२००८ व १६.१०.२००८ रोजी त्यांना पूर्ण माहिती मिळाली आहे का? अशी विचारणा केली असता अपिलार्थीने त्यांच्याकडे, त्यांना पूर्ण माहिती मिळाली आहे व त्यांची कोणतीही तक्रार नाही, अशा अर्थाचे पत्र देखील जन माहिती अधिकारी यांनी अधीक्षक अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.१०.२००८ रोजी पाठविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०९.२००८ रोजी म्हणजेच आयोगाकडे द्वितीय अपील करण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच सादर केले आहे. यामुळे हे अपील अपरिपक्व होत आहे. याही पेक्षा महत्त्वाचे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे आणि प्राप्त माहितीने समाधान झाल्याचे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सहायक माहिती अधिकाऱ्याकडे तोंडी कबूल केले आहे व तशा अर्थाचे पत्र देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयास पाठविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर, ‘राजगड’, जिल्हा म.न.से. कार्यालय, नळदूर्ग रोड, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४०
निर्णय दिनांकः २२-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अमरराजे कदम परमेश्वर,<br>रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा,<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत सुनावणी घेतली नाही आणि संबंधितानी त्यांच्याशी चुकीचा पत्रव्यवहार केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०/- त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०९.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली. अपिलार्थीस ही माहिती दि. २९.०९.२००८ रोजी मिळाल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. या पुराव्यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध झाल्याचे दिसून येत आहे. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भातील माहिती दि. २९.०९.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. अर्जदारास ही माहिती त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्ज सादर केल्यानंतर प्राप्त झालेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीस

पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे आयोगाच्या निदर्शनास आलेले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर,रा. परमेश्वर वाडा, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा,जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १५४१/०८ व १५४२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४१ व १५४२
निर्णय दिनांक: २२-१०-२००९

१. श्री. सलाउद्दीन मैनोद्दीन शेख, : अपिलार्थी
रा. कळंब, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कळंब, जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (नगर पालिका प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

विद्यमान जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
नगर परिषद, कळंब, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०७.२००८ रोजी नोंदविलेली एकाच प्राधिकरणाशी संबंधित असलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्रमांक १५४१/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना काहीही माहिती दिली नाही. तसेच अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात पुरविलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांनी महानगरपालिका अधिनियम १९६५ च्या कलम ११५(२) च्या नियमावलीची प्रत दिली आहे.

त्यामध्ये मालकीहक्कामध्ये बदल करण्याचे जन माहिती अधिकारी यांना अधिकार असल्याचे कोठेही दिसून येत नाही. त्यामुळे या मुद्यांवर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी व चुकीची माहिती प्राप्त झाली आहे, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. ४ द्वारे अय्याज शौकत अली यांचे नाव लावण्यासाठी या नस्तीची संपूर्ण नक्कल व त्यांच्या पी.आर.कार्डाचे जागेच्या साईजसह नक्कल मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी कर निरीक्षक यांनी नवीन निर्गम रजिस्टरमध्ये फेरबदल केले आहे, असे कळविले. या मुद्यावरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आह. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अशाप्रकारे दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी, अशी त्यांनी या अर्जामध्ये आयोगास विनंती केली असून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१३.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कसबे कळंब येथील पुनर्वसन जमीन स.नं.१०४/ब मधील भूखंड क्र.७ बाबत एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस एकूण ३ मुद्यांची माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या नंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १७.०५.२००८ रोजी काही माहिती पुरविली परंतु ती दिशाभूल करणारी वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य उपलब्ध व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ते त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्यास तयार असल्याचे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरीही हा प्रतिसाद अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्याच्या दृष्टीने पुरेसा सकारात्मक असल्याचे आयोगास आढळून येत नाही. मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ४ मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांनी अपिलार्थीस फक्त तीन मुद्यांवर माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या या तीन मुद्यांपैकी दोन मुद्यांद्वारे अपिलार्थीने त्यांच्याकडे असलेल्या संचिकेच्या सत्यप्रतींची मागणी केली असता, त्या संचिकेच्या सत्यप्रती त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये रिव्हीजन रजिस्टरला मालकी हक्कात बदल करण्याचे अधिकार ज्या नियमान्वये जन महिती अधिकारी यांना आहेत, त्या नियमाची प्रत मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महानगर पालिका अधिनियम १९६५ च्या कलम ११५(२) ची झेरॉक्स प्रत पाठविली आहे. परंतु या कलमाद्वारे मालकी हक्कात बदल करण्याचे अधिकार जन माहिती अधिकारी यांना असल्याचे कोठेही नमूद केलेले नाही. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे सिध्द होत

आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे परत अशाप्रकारची दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस आता मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी ज्या संचिकेच्या छायांकित प्रती मागितल्या आहेत, त्या संचिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये शोधून त्यांच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. जर या संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाल्या नाहीत तर या संचिका जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी फौजदारी स्वरुपाची कारवाई याच कालावधीमध्ये करावी, तसेच नगरपालिका क्षेत्रामध्ये मालकीहक्कामध्ये बदल करण्यास करण्यास ते निश्चितपणे कोणती कार्यपध्दती अवलंबितात व त्या कार्यपध्दतीचा उल्लेख महानगर पालिका अधिनियम १९६५ मध्ये केलेला आहे. त्याचे सविस्तर विवेचन करणारी टिपणी त्यांनी अपिलार्थीस याच मुदतीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नि:संशयपणे सिध्द झाले असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगर पालिका प्रशासन, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेली माहिती देण्याच्या दृष्टीने वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, नगरपालिका क्षेत्रामध्ये मालकीहक्कामध्ये बदल करण्यास

करण्यास ते निश्चितपणे कोणती कार्यपध्दती अवलंबितात व त्या कार्यपध्दतीचा उल्लेख महानगर पालिका अधिनियम १९६५ मध्ये केलेला आहे, त्याचे सविस्तर विवेचन करणारी टिपणी त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संचालक, नगर पालिका प्रशासन, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्रमांक १५४१/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांनी मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: दि. १३.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे आजोबा कै. शेख महंमद यासीन अहेमद यांच्या अर्जाची नक्कल, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून काढलेल्या जाहीर प्रगटन, स्थळपंचनाम्याची नक्कल, टिपणीचा उतारा आणि मंजूरीच्या आदेशाची नक्कल अशाप्रकारची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने ही माहिती कसबे कळंब ता.कळंब येथे पुनर्वसन जमीन स.नं. १०४ / ब मधील भूखंड क्र. ७ च्या संदर्भात मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दि. ०८.०५.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविली. तथापि

प्राप्त माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्याचे कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेल्या विनंतीप्रमाणे युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, मूळात अपिलार्थीस दि. १३.०२.२००८ रोजीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास दि. १३.०२.२००८ रोजीच प्राप्त झाला होता, तथापि सदर विभाग सांभाळणारे कनिष्ठ लिपीक, श्री. कय्युम यासीन मन्यार या कर्मचाऱ्याने अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज विनाकार्यवाही त्यांच्याकडे तसाच ठेवून दिला. ज्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जामध्ये सुनावणी ठेवल्याचे पत्र त्यांना प्राप्त झाले, त्यावेळी त्यांना प्रथमतः अपिलार्थीने अशाप्रकारच्या माहितीची मागणी त्यांच्याकडे केल्याचे त्यांना माहीत झाले. यानंतर लगेचच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०८.०५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती विलंबाने प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या प्रत्येक मुद्यावर त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे नमूद केलेले आहे. यावरुन सदर माहिती त्यांच्याकडे जर उपलब्ध नव्हती तर त्यांनी एवढी साधी माहिती देण्यासाठी अशाप्रकारचा कालापव्यय करणे हे निश्चितपणे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव असल्याचे द्योतक आहे, असे आयोगास वाटते.जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाद्वारे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांचे सहायक कर्मचारी यांनी विनाकार्यवाही तसाच ठेवला गेल्याचे स्पष्ट होत

आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या या प्रकरणाशी संबंधित कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतुद आहे. हे पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी नगर परिषद, कळंबमधील कनिष्ठ लिपीक श्री. कय्युम यासीन मन्यार, नामांतर विभाग हे कर्मचारी जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांना जन माहिती अधिकारी यांच्या संबंधित सहायकावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब,जि.उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. कय्युम यासीन मन्यार, नामांतर विभाग यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सलाउद्दीन मैनोद्दीन शेख, ढोकी रोड, प्लॉट नं.७, कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८
निर्णय दिनांक २२/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.दत्तात्रय पुंजाजी शेळके,<br>मु.पो.वाकडी, ता.राहाता, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>विसर्जन अधिकारी,<br>म्हाळसाकांत ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था<br>मर्यादित, वाकडी, ता.राहाता, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, अहमदनगर | : | |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सहायक निबंधक
सहकारी संस्था, राहाता,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २२.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे विसर्जन अधिकारी, म्हाळसाकांत ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, वाकडी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून सहायक निबंधक, सहकारी संस्था, राहाता यांची नेमणूक झाली असल्याने जिल्हा उपनिबंधकांनी त्यांच्या दि. १३.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सदरचा प्रथम अपील अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था,

राहाता, जि.अहमदनगर यांचेकडे वर्ग केला. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, राहाता, जि.अहमदनगर यांनी दि. २३.०३.२००९ रोजी निर्णय दिला. त्यानुसार अपिलार्थी यांनी ज्या पतसंस्थेकडे माहितीची मागणी केली होती त्या पतसंस्थेची नोंदणी दि. ३०.१०.२००६ रोजीच्या आदेशान्वये रद्द झालेली आहे, असे अपिलार्थीस कळविले. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे व्दितीय अपिल राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. तसेच सदर संस्थेची नोंदणी आता रद्द झाली असल्याने व यानंतर अपिलार्थीने दि. ०९.०१.२००९ रोजी माहिती मागितली असल्याने त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना आता मिळू शकणार नाही, हे उघड आहे.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. ९८/०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय पुंजाजी शेळके, मु.पो.वाकडी, ता.राहाता, जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा विसर्जन अधिकारी, म्हाळसाकांत ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, वाकडी, ता.राहाता, जि.अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, राहाता, जि.अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३२
निर्णय दिनांक २२/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०९.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३ महिने ३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले

नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, देवगीरी विश्रामगृह, नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, बांधकाम भवन, औरंगाबाद.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३३
निर्णय दिनांक २२/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, हदगाव तालुका
सामाजिक वनीकरण कार्यालय, हदगांव, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण कार्यालय, नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ११.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक २०.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १५.०९.२००८ पर्यंत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, हदगांव तालुका सामाजिक वनीकरण कार्यालय, हदगाव, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण कार्यालय, नांदेड.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३४
निर्णय दिनांक २२/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुदखेड, जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुदखेड, जि.नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १५.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही.

ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुदखेड, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुदखेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२३
निर्णय दिनांक २२/१०/२००९

१ श्री.मनोज मारुतीराव कर्डिले, : अपिलार्थी
रा. ५६२८, शेरकर गल्ली, सर्जेपुरा, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्यवस्थापक,
सुविधा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.१०.२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २२.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक २१.०८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, सुविधा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २८.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अहमदनगर यांनी दि. २०.१०.२००७ रोजी निर्णय देऊन, सदर पतसंस्थेस कोणतेही शासकीय अर्थसहाय्य नसल्यामुळे सदर संस्था माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाने व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१०.२००७ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २८२३/०७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २२-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मनोज मारुतीराव कर्डिले, रा. ५६२८, शेरकर गल्ली, सर्जेपुरा, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, सुविधा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सर्जेपुरा, अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६४५

निर्णय दिनांक २३-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. शेषेराव शिंदे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिमायतनगर यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी प्रथम अपील सादर केले. परंतु जन

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे हिमायतनगर तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. शेषेराव शिंदे यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या नियतनासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाचे रॉकेल विक्री रजिस्टर, स्टॉक रजिस्टर, त्यांना देण्यात आलेल्या रॉकेल नियतनाची सत्यप्रत, तसेच त्यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधारक व हॉकर्स यांची नांवे व परवाने क्रमांक तसेच किरकोळ परवानेधारक व हॉकर्स यांचे स्टॉक रजिस्टर, बिलबुक तसेच पावत्याच्या सत्यप्रती आणि किरकोळ परवानेधारक व हॉकर्स यांच्या डाय-यांच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते दि. ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित अशी मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला किंवा कसे हे आयोगास संबंधित कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जा-सोबत फक्त त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्जाच्या प्रती जोडल्या आहेत. परंतु माहितीसाठीचा अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी याच्याकडे प्रत्यक्षतः सादर केला आहे किंवा कसे

आणि अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले आहे किंवा कसे हे आयोगास, यासंदर्भातील कोणत्याही पूरक कागदपत्राअभावी, कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थी हे स्वतः वारंवार माहिती मागविणारे अशा प्रकारचे आहेत. अशा प्रकारच्या इतर अपील प्रकरणामध्ये अपिलार्थीचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज मूळात प्राप्त झाले नसल्याचे आयोगास वेळोवेळी आढळून आलेले आहे. तसेच अपिलार्थी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी आयोगासमोर आयोगाने त्यांना दिनांक ३०-०९-२००९ रोजी लेखी सूचना पाठवूनही उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६४६

निर्णय दिनांक २३-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
शिक्षण संचालकाचे कार्यालय (प्राथमिक),
शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती बिल्डींग,
पुणे रेल्वेस्टेशन जवळ, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण संचालक (प्राथमिक),
शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती बिल्डींग,
पुणे रेल्वेस्टेशन जवळ, पुणे

त्रयस्थ पक्ष : सचिव सना उर्दू प्राथमिक शाळा तरोडा बु. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०३-२००८ रोजी रजिस्टर पोस्टाने अर्ज पाठवून दिला असता मुदतीच्या आत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडे दिनांक २८-

०४-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड येथील सना उर्दू प्राथमिक शाळेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. तथपि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांनी निर्णय दिला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज पोष्टाने सादर केल्यापृष्ठ्यर्थ आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला नाही. अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज संबंधितांकडे प्राप्त झाला किंवा कसे हे आयोगास सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही आयोगासमोर अशा प्रकारचा पुरावा व्यक्तिशः सादर करण्यासाठी उपस्थित नाहीत हे पाहता आवश्यक त्या कागदपत्राच्या अभावी, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१.	अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, शिक्षण संचालकाचे कार्यालय (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती बिल्डींग, पुणे रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती बिल्डींग, पुणे रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६४७

निर्णय दिनांक २३-१०-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी

रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : सना उर्दू प्राथमिक शाळा, तरोडा बु., नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १५-१२-२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज दाखल केला असता मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु यासंदर्भात त्यांनी आपला निर्णय प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड येथील सना उर्दू प्राथमिक शाळेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून केलेला दिनांक १५-१२-२००७ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला आहे. हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आवक जावक लिपिकाने कार्यालयाच्या शिक्क्यासह अपिलार्थीच्या मूळ अर्जावरील दिलेल्या पोचसहीवरुन आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २१-०१-२००८ रोजी केलेला प्रथम अपील अर्ज त्यांनाही प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नसल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यां-ना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६४८

निर्णय दिनांक २३-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. पिराजी जयराम पाटील
२. श्री. विनोद किशनराव नलगुलवार

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली यांच्याकडे दिनांक २२-०१-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे प्रथम अपील सादर केले. परंतु जन

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातून दिनांक ११-०७-१९९० रोजी त्रयस्थ पक्ष श्री. पिराजी जयराम पाटील यांना दिलेल्या "लिंगडेर" या जातीच्या प्रमाणपत्रासंदर्भात व दिनांक ०६-१०-१९८९ रोजी त्रयस्थ पक्ष श्री. विनोद किशनराव नलगुलवार यांना मन्नेरवारलू जातीचे प्रमाणपत्र दिल्याबद्दल संबंधित त्रयस्थ पक्षांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ संचिकेच्या सत्यप्रती व तसेच सदरील जातीचे प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून देण्यात आले किंवा नाही अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांचा प्रथम माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज याच्या प्रती सादर केलेल्या आहेत. परंतु सदर अर्ज त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे पोष्टाने सादर केल्यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही त्यामुळे सदर प्रथम

अर्ज व प्रथम अपील अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे प्राप्त झाले किंवा नाही हे आयोगास आवश्यक त्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. तसेच यासंदर्भात आयोगाकडे पुरावा सादर करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर सुनावणीच्या वेळी उपस्थितही नाहीत, हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांच्या व योग्य त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६४९

निर्णय दिनांक २३-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड,
तालुका जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड,
तालुका जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे म्हाळजा तालुका जिल्हा नांदेड येथील सर्व्हे नंबर ५/अ, ५/ब, ५/क व ५/ड वर अनधिकृतपणे कब्जा घेतल्या प्रकरणी प्रथम अर्ज दाखल केला असता विहित मुदतीत अपेक्षित माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक ०२-०५-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे मौजे म्हाळजा येथील जमिनीच्या संदर्भात अनधिकृत कब्जाबाबत सन २००५ ते २००६ या कालावधीशी संबंधित काही माहिती टपालाव्दारे मागितली होती. तथापि विहित कालावधीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. या कारणास्तव अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचा दिनांक २८-०३-२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व दिनांक ०२-०५-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला आहे. संबंधितांच्या कार्यालयाच्या आवक जावक लिपिकाने त्यांच्या कार्यालयाचा शिक्का व सही असलेली दिलेली प्रत अपिलार्थीने आयोगास त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत दाखल केली आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज संबंधितांना प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप, तसेच आवश्यक त्या कागदपत्रा-च्या अनुपलब्धतेमुळे आणि सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच

तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन याच कालावधीत आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड, तालुका नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, तालुका नांदेड,

जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२१

निर्णय दिनांक २३-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, उपरोक्त प्रकरणी त्यांनी माहिती अधिकारी बिलोली नगरपरिषद यांच्याकडे दिनांक २०-०३-२००७ रोजी रितसर अर्ज पोस्टाने पाठवून दिला असता त्यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बिलोली यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील दाखल करुन देऊन

सुध्दा माहिती देण्यास जाणुनबुजून विलंब आणि टाळाटाळ होत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यांच्याकडे अपिलार्थीचा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला दिनांक ०७-०६-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज ज्यावेळी प्राप्त झाला त्यावेळी त्यांना अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची कल्पना आली. अपिलार्थीचा प्रथम अपील त्यांना प्रत्यक्षतः दिनांक ११-०६-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची कल्पना आल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे व तसेच माहिती तयार असल्याचे कळविले. तथापि अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेतली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे व ती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही किंवा त्यांना तो प्राप्त झाला नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत कोणताही पुरावा सादर केला नाही. अपिलार्थीकडे जर याबाबत कोणता पुरावा उपलब्ध असेल तर तो आयोगाकडे सादर करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व ते ती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना कोणत्या माध्यमाव्दारे अपेक्षित आहे किंवा अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहे किंवा कसे हे अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास व जन माहिती अधिकारी यांना कळण्यास मार्ग नाही. या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांना आवश्यक असलेली महिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी.

वरील सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्या-योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६५०
निर्णय दिनांकः २३-१०-२००९

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, देगलूर महाविद्यालय,देगलूर,जि.नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, देगलूर आडत व्यापारी संस्था, देगलूर, जिल्हा नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०१.२००८ रोजी टपालाने माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्जाची रजिस्ट्री परत केल्यामुळे त्यांनी सचिव, देगलूर आडत व्यापारी शिक्षण संस्था तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, देगलूर महाविद्यालय, देगलूर यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयामध्ये कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात काही माहिती पोस्टाद्वारे मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाचे टपाल न स्वीकारल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असा खुलासा केला की, त्यांच्याकडे मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ व अपील अर्ज प्राप्त झाला नाही, तसेच त्यांनी अशाप्रकारचे कोणतेही टपाल परतही केलेले नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची कल्पना त्यांना आयोगाकडील सुनावणीसंदर्भात प्राप्त झालेल्या पत्रासोबत जोडलेल्या अपिलार्थीच्या प्रथम अर्जावरुन आली.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी जरी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी पोस्टाने अर्ज पाठवून दिल्याचे नमूद केले असले तरीही यासंदर्भात कोणताही आवश्यक तो पुरावा (उदा. पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत) आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी देखील आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी संबंधित प्राधिकरणाशी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे आवश्यक त्या माहितीसाठीचा पत्रव्यवहार करुन जन

माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज पाठविल्याचा पुरावा त्यांच्या संग्रही ठेवावा व तो पुरावा आयोगाकडे येथून पुढे सादर करावा, म्हणजे त्यांच्या अशाप्रकारच्या अपिलासंदर्भात निर्णय घेणे सुकर होईल, विचाराधीन अपिलासंदर्भात अपिलार्थीने अशाप्रकारचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केला नाही. प्रत्यक्षातील वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे, आयोगासमोर उपस्थित नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१०-२००९** — **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपूराच्या पाठीमागे,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,देगलूर महाविद्यालय,देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सचिव,देगलूर आडत व्यापारी शिक्षण संस्था, देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६५१
निर्णय दिनांकः २३-१०-२००९

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नांदेड.

त्रयस्थ पक्षः श्री. डी.बी. सोनटक्के

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज दाखल केला असता जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमानुसार माहिती न देता गैरकायदेशीर पत्रव्यवहार केल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडे दि. २८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता त्यांचे प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या दि. ०६.११.२००६ रोजीच्या पत्रानुसार संजय गांधी हायस्कूल पुणेगावचे मुख्याध्यापक श्री. डी.बी.सोनटक्के यांनी अनुदानाच्या रकमेचे वाटप न केल्यामुळे त्यांच्यावर शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या चौकशी अहवालानुसार फौजदारी गुन्हा का दाखल करण्यात आला नाही आणि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचा कोणता आर्थिक स्वार्थ आहे, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणता प्रतिसाद व तो केव्हा दिला, याचा आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये समावेश नसल्याचे दिसून येत आहे. परंतु यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर निश्चितपणे निर्णय दिला किंवा कसे हे ही आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे ती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या कृतीबाबतची कारणे अपेक्षित करणारी व अमूर्त स्वरुपातील माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ती ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपातच त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे.

माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाबाबतची कारणे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने ती देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीबाहेरची आणि त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीस अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अशाप्रकारे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुपच मूळात अवैध असल्याचे सिध्द होत असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा.समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६५२
निर्णय दिनांकः २३-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शेख मुनीर शेख नन्हेसाब,<br>रा.किनवट,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्राम पंचायत कार्यालय,गोकुंदा,<br>ता.किनवट,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि.२३.१०.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याचे नमूद केले आहे तसेच विचाराधीन अपील ते स्वखुषीने मागे घेत असल्याने ते रद्द करावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील रद्द करण्याची केलेली विनंती आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १६५२/०८, दि. ०१.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शेख मुनिर शेख नन्हेसाब, रा.इस्लामपुरा, वॉर्ड क्र.१४, किनवट, जि.नांदेड-४३१ ८०४.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रतील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रतील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६५३
निर्णय दिनांक: २३-१०-२००९

१. श्री. शेख मुनीर शेख नन्हेसाब, : अपिलार्थी
रा.किनवट,रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कार्यालय,गोकूंदा,
ता.किनवट,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष: श्री. शिवकुमार संभप्पा भंडारे,
श्री. शिवकांत विठ्ठलराव बोंपोलवार,
श्री. म.ताजोद्दिन म.अजीमोद्दिन,
श्री. शेख मु. शेख नन्हेसाब

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने व तुटपुंजी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले असून आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष, श्री. श्री. शिवकुमार संभप्पा भंडारे,श्री. शिवकांत विठ्ठलराव बोंपोलवार, श्री. म.ताजोद्दिन म.अजीमोद्दिन व स्वतः श्री. शेख मु.शेख नन्हेसाब यांच्या नावे असलेल्या मौ. गोकुंदा येथील स.नं.३३/१ अंतर्गत असलेल्या प्लॉटची एकूण संख्या, विक्री केलेल्या प्लाटची संख्या आणि उर्वरित प्लॉटच्या मालकीहक्काचे प्रमाणपत्र स.नं. ३३/१ च्या नकाशाची सत्यप्रत, नमुना नं. ८ च्या उताऱ्याची सत्यप्रत व या प्लॉटचे फेरफार ज्या कागदपत्रांच्या आधारे केले आहे त्यांच्या नकला - अशी माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी हा १९८८ ते २००८ असा आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणातही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन दि. ०६.०९.२००८ रोजी यासंदर्भात निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून सात दिवसांची मुदत मागितली व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य केली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी माहिती पुरविली तथापि प्राप्त माहिती तुटपुंजी वाटल्यावरुनअपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी तसेच श्री. शिवकांत विठ्ठलराव बोंपोलवार वगळता उर्वरित सर्व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. ते व त्यांचे तीन भागीदार हे स.नं. ३३/१ चे मालक असून त्यांच्या मालकीहक्काच्या जमिनीच्या संदर्भात ग्राम पंचायतीने बेकायदेशीररित्या व त्यांच्या अपरोक्ष काही भूखंड परस्पर विक्री केले असल्याने यासंदर्भात न्यायालयीन कामकाजासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०१.०९.२००८ रोजी फक्त त्यांना माहिती देण्यात येत असल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. या पत्रासोबत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त नमुना नं. ९ च्या काही प्रती प्राप्त झालेल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. मात्र ते परत शोध घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न करतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत व संपूर्णपणे दिलेली नाही, असे दिसून येते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यापूर्वी प्रथमतः जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी तपासणी करावी व तदनंतर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी अपिलार्थीस विनामूल्य पुरवतील असे पहावे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, केवळ बॉण्डपेपर आणि रजिस्ट्री याच्याच आधारे त्यांनी विचाराधीन जमिनीच्या मालकी हक्कामध्ये फेरफार केलेला आहे. तथापि हे फेरफार त्यांच्याकडे आता उपलब्ध नाहीत. यासंदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नाही, त्यासंदर्भात सदर माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर गट विकास अधिकारी,

पंचायत समिती, किनवट यांनी फौजदारी अथवा प्रशासकीय कारवाई करण्याचा विचार करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.०९.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या पत्रावरुन प्लॉटच्या संख्येव्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती, या पत्राचे वाचन करणाऱ्या व्यक्तीस प्राप्त होऊ शकत नाही किंबहुना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.०९.२००८ रोजी दिलेले पत्र हे पूर्णतः दिशाभूल करणारे असल्याचेच या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस अशाप्रकारे विलंबाने व दिशाभूल करणारी माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव पूर्णपणे स्पष्ट केला आहे व स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. हे पाहता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गोकुंदा तथा जन महिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती देण्यापूर्वी प्रथमतः तपासणी करावी व तदनंतर सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य रजिस्टर्ड पोस्टाद्वारे जन माहिती अधिकारी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत यांचे मार्फत उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन महिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गोकुंदा यांच्यावर प्रचलीत

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शेख मुनिर शेख नन्हेसाब, रा.इस्लामपुरा, वॉर्ड क्र. १४, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रतील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रतील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रतील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३५
निर्णय दिनांक २३/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सना कनिष्ठ महाविद्यालय, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २१.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०५.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २ महिने १८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले

नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सना कनिष्ठ महाविद्यालय, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३६
निर्णय दिनांक   २३/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री. संत नामदेव महाराज विद्यालय, मौजे बोरी (खुर्द), ता.कंधार, जि.नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २ महिने १२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले

नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत नामदेव महाराज विद्यालय, मौजे बोरी (खुर्द), ता.कंधार, जि.नांदेड
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३७
निर्णय दिनांक २३/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १७.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २१.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २ महिने २२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले

नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३८
निर्णय दिनांक २३/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २८.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिने १२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले

नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुखेड, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३९
निर्णय दिनांक २३/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३ महिने ७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले

नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२४
निर्णय दिनांक २३/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदकिशोर हिरालाल अकोले,<br>रा.सावदा, ता.रावेर, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>दि सावदा मर्चंट्स को-ऑप. क्रेडिट सोसा.मर्या.,<br>सावदा, ता.रावेर, जि.जळगांव | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जळगांव. | : | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ११.०१.२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २३.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०८.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे व्यवस्थापक, दि सावदा मर्चंट्स को-ऑप. क्रेडिट सोसा.मर्या. यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या वतीने त्यांच्या वकिलांनी त्यांच्या दि. ०६.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे सदर पतसंस्था सार्वजनिक प्राधिकरण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ पतसंस्थेस लागू होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १६.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांनी दि. १५.११.२००६ रोजी निर्णय देऊन माहिती अधिकार अधिनियम, २००५ हा पतसंस्थेस लागू होत नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले. या निर्णयाने

व्यथित होऊन अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात त्याच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल. या पार्श्वभुमीवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.११.२००६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

२) अपील क्र. २८२४/०७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदकिशोर हिरालाल अकोले, रा.संभाजी चौक, चावडीसमोर, सावदा, ता.रावेर, जि.जळगांव
२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, दि सावदा मर्चंट्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी मर्यादित, सावदा, ता.रावेर, जि.जळगांव.
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२५
निर्णय दिनांक २३/१०/२००९

१ व्यवस्थापक, : अपिलार्थी
श्री.अहमदनगर जिल्हा जैन ओसवाल पंचायत
नागरी सहकारी पतसंस्था मर्या. शहाजी रोड,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २०.०४.२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २३.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी श्री.चंद्रकांत रतनलाल भंडारी, रा.अहमदनगर यांनी दिनांक २१.११.२००५ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, श्री अहमदनगर जिल्हा जैन ओसवाल पंचायत नागरी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री. भंडारी यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २१.१२.२००५ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी दि. १६.०२.२००६ रोजी निर्णय देऊन, श्री. भंडारी यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना

आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, श्री अहमदनगर जिल्हा जैन ओसवाल पंचायत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित, अपिलार्थी, व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही.

या निर्णयाच्या पाश्वभूमीवर व्यवस्थापक अहमदनगर जिल्हा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था, अहमदनगर यांनी या प्रकरणी घेतलेली भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना मूळ अर्जदार श्री. भंडारी यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परिणामी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्या दि. १६.०२.२००६ रोजीचा निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २८२५/०७ मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.चंद्रकांत रतनलाल भंडारी, रा.आनंद, ५३४०, बुरुडगल्ली, अहमदनगर

२. व्यवस्थापक, अहमदनगर जिल्हा जैन ओसवाल पंचायत नागरी सहकारी पतसंस्था, शहाजी रोड, अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६२६/०८,१६२७/०८,१६२८/०८ व १६२९/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६२६ ते १६२९
निर्णय दिनांक : २६-१०-२००९

१. श्री. विलास समर्थराव कदम :अपिलार्थी
रा.मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

१. **अपील क्र.१६२६/०८**

जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हिमायतनगर,
जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड. :प्रतिवादी

२. **अपील क्र.१६२७/०८**

जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हदगाव,
जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड.

३. **अपील क्र.१६२८/०८**

जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, माहूर,
जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड.

४. **अपील क्र.१६२९/०८**

जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, किनवट,
जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही म्हणून त्यांच्यावर कलम क्रमांक २०(१) व (२) नुसार दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई करावी. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन उपरोक्त चारही प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, हिमायतनगर, हदगाव, माहूर व किनवट यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २०% , ३० %व १२ वा वित्त आयोगाच्या अनुदानातून केलेल्या कामाबाबत सन २००४-२००७ या कालावधीची अनुदानाची माहिती, सादीलवार अनुदानाचा एकूण तपशील व खर्चाचा संपूर्ण तपशील, खर्चाच्या पावत्यासह, ही माहिती पंचायत समिती स्तरावरील माहिती तसेच ग्रामपंचायतस्तरावरील माहिती वेगळी देण्यात यावी. या सर्व योजनेच्या अनुदानाच्या खर्चाच्यासाठी C.S.T./B.S.T. ची प्रमाणके आहेत का, असतील तर त्यांची शासन परिपत्रके देण्यात यावीत. वरील सर्व माहितीच्या  झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात, उदा. अंदाजपत्रक, M.B.बुक ची झेरॉक्स. वरील कालावधीत आपल्या कार्यालयाला संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २०% , ३० %व १२ वा वित्त आयोगाअंतर्गत व महसूल अनुदान, गौण खनिज अनुदान, स्टॅम्प डयुटी अनुदान,संपूर्ण तपशील पंचायत समिती स्तरावरील तसेच ग्रामपंचायत स्तरावरील त्यांना देण्यात आलेले आणि खर्चाचा संपूर्ण तपशील योजनानिहाय, योजनानिहाय खर्चाचे तरतुदीचे शासन परिपत्रके, पंचायत समिती स्तरावरुन कामे केलेल्या धनादेश देण्यात आलेल्याचा संपूर्ण तपशील, खात्यामार्फत केलेल्या कामाचे धनादेश कोणाच्या नावे काढण्यात आलेले आहेत त्याचा संपूर्ण तपशील उदा. अभियंता, B.D.O.,ग्रामसेवक इत्यादी संपूर्ण नावासह देण्यात यावेत, योजनानिहाय, पंचायत समितीच्या वरील योजनेचे अनुदान वाटप केलेल्या कॅशबुक व पासबुकाची झेरॉक्स प्रत, वरील योजनेतून करण्यात आलेल्या कामाचे अंदाजपत्रकाची झेरॉक्स सर्व ग्रामपंचायत स्तरावर ग्राम.पं.निहाय व M.B.बुकाची झेरॉक्स प्रती, सर्व खर्चाच्या पावत्यासह देण्यात यावीत. पंचायत समिती सभागृहाच्या प्रोसिडिंग बुकाची झेरॉक्स, तसेच ग्रा.पं.चे बँक

खात्याचे कॅशबुक व पासबुकाची झेरॉक्स सर्व ग्रा.पं.नियम काम करण्यात आलेल्या रोकड किर्द बुकची झेरॉक्स ग्रा.पं.सर्व पावत्यासह झेरॉक्स देण्यात यावीत. वरील सर्व माहिती पंचायत समिती स्तरावरील वेगळी,वर्षनिहाय देण्यात यावी. प्रत्येक ग्रामपंचायतीची वेगवेगळी सर्व अनुदानाच्या खर्चाच्या पावत्यसाची झेरॉक्स आवश्यक आहे."

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने या नंतर अपील क्र. १६२६/०८ व १६२८/०८ च्या संदर्भात दि. १९.०४.२००८ रोजी व १६२७/०८ व १६२९/०८ च्या संदर्भात दि.०२.०५.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या चारही अपील अर्जासंदर्भात सुनावण्या घेऊन दि. २५.०६.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपील क्र.१६२६/०८ व १६२७/०८ च्या संदर्भात दि.०३.०७.२००८ पर्यंत व अपील क्र.१६२८/०८ व १६२९/०८ च्या संदर्भात अनुक्रमे दि. ३१.०५.२००८ व २२.०६.२००८ पर्यंत संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित व संबंधित सर्व जन माहिती अधिकारी  अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजही अपेक्षित आहे. त्यांची अशी धारणा आहे की, या चारही पंचायत समितीमध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे उपलब्ध नाहीत आणि या चारही पंचायत समितीमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याने संबंधितांनी हे अभिलेखे नष्ट केले असल्याची शक्यता आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या चारही प्रकरणी त्यांनी दि.२५.०६.२००८ रोजी निर्णय देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचना दिल्या होत्या.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर व माहूर यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही तर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव व किनवट यांनी अपिलार्थीस अनुक्रमे दि. १०.०३.२००८ रोजी व दि. १९.०३.२००८ रोजी अनुक्रमे रु. १५,०००/- व प्रतिपृष्ठ रु. १०/- प्रमाणे एकूण रु.५४०/- इतके शुल्क अपिलार्थीस शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव व किनवट यांनी जरी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो प्रतिसाद अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे या शुल्काचा तपशील अपिलार्थीस कळविला नाही. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर रु. १०/- असा चुकीचा दर नमूद करुन अपिलार्थीस शुल्क कळविले. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव व किनवट यांनी अपिलार्थीस शुल्काचा योग्य व बरोबर तपशील न कळवून अधिनियमातील कलम ७(३)(क) चा भंग केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस गट विकास अधिकारी, हदगाव व किनवट यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता वरील सर्व जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी मोठया व्याप्तीची असली तरी अपिलार्थीने केलेला मूळ अर्ज व आज रोजी सुनावणीचा दिनांक यामध्ये व्यपगत झालेला कालावधी लक्षात घेता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे आदेशित करणे हे अधिक न्यायोचित होईल, असे आयोगास वाटते. सबब आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर व माहूर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची उपेक्षा केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांना देता येणे शक्य नव्हते तर त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे अपिलार्थीस तसे अधिनियमातील विहित मुदतीत कळविणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर व माहूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रत्येकी रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन चारही अपील अर्जासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १६२६/०८ व १६२८/०८ मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १६२७/०८ व १६२९/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

३. चारही जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर व माहूर यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांना प्रत्येकी एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. विलास समर्थराव कदम, तगलाईन गल्ली, झेंडा चौक, मुखेड जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६३०/०८,१६३१/०८,१६३२/०८ व १६३६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६३०,१६३१,१६३२ व १६३६
निर्णय दिनांक : २६-१०-२००९

१. श्री. विलास समर्थराव कदम :अपिलार्थी
रा.मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

१. **अपील क्र.१६३०/०८**
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड. :प्रतिवादी

२. **अपील क्र.१६३१/०८**
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड

३. **अपील क्र.१६३२/०८**
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड

४. **अपील क्र.१६३६/०८**
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही म्हणून त्यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई कलम क्रमांक २०(१) व (२) नुसार करावी व या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित दि.२०.०२.२००८ रोजीच्या चारही मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, नांदेड, नायगाव, धर्माबाद, देगलूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४ ते २००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे एकसारखीच माहिती मागितली होती.

"संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २०%, ३० %व १२ वा वित्त आयोगाच्या अनुदानातून केलेल्या कामाबाबत सन २००४-२००७ या कालावधीची अनुदानाची माहिती, सादीलवार अनुदानाचा एकूण तपशील व खर्चाचा संपूर्ण तपशील, खर्चाच्या पावत्यासह, ही माहिती पंचायत समिती स्तरावरील माहिती तसेच ग्रामपंचायतस्तरावरील माहिती वेगळी देण्यात यावी. या सर्व योजनेच्या अनुदानाच्या खर्चाच्यासाठी C.S.T./B.S.T. ची प्रमाणके आहेत का, असतील तर त्यांची शासन परिपत्रके देण्यात यावीत. वरील सर्व माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात, उदा. अंदाजपत्रक, M.B.बुक ची झेरॉक्स. वरील कालावधीत आपल्या कार्यालयाला संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २०%, ३० %व १२ वा वित्त आयोगाअंतर्गत व महसूल अनुदान, गौण खनिज अनुदान, स्टॅम्प डयुटी अनुदान,संपूर्ण तपशील पंचायत समिती स्तरावरील तसेच ग्रामपंचायत स्तरावरील त्यांना देण्यात आलेले आणि खर्चाचा संपूर्ण तपशील योजनानिहाय, योजनानिहाय खर्चाचे तरतुदीचे शासन परिपत्रके, पंचायत समिती स्तरावरुन कामे केलेल्या धनादेश देण्यात आलेल्याचा संपूर्ण तपशील, खात्यामार्फत केलेल्या कामाचे धनादेश कोणाच्या नावे काढण्यात आलेले आहेत त्याचा संपूर्ण तपशील उदा. अभियंता, B.D.O.,ग्रामसेवक इत्यादी संपूर्ण नावासह

देण्यात यावेत, योजनानिहाय, पंचायत समितीच्या वरील योजनेचे अनुदान वाटप केलेल्या कॅशबुक व पासबुकाची झेरॉक्स प्रत, वरील योजनेतून करण्यात आलेल्या कामाचे अंदाजपत्रकाची झेरॉक्स सर्व ग्रामपंचायत स्तरावर ग्राम.पं.निहाय व M.B.बुकाची झेरॉक्स प्रती, सर्व खर्चाच्या पावत्यासह देण्यात यावीत. पंचायत समिती सभागृहाच्या प्रोसिडिंग बुकाची झेरॉक्स, तसेच ग्रा.पं.चे बँक खात्याचे कॅशबुक व पासबुकाची झेरॉक्स सर्व ग्रा.पं.नियम काम करण्यात आलेल्या रोकड किर्द बुकची झेरॉक्स ग्रा.पं.सर्व पावत्यासह झेरॉक्स देण्यात यावीत. वरील सर्व माहिती पंचायत समिती स्तरावरील वेगळी,वर्षनिहाय देण्यात यावी. प्रत्येक ग्रामपंचायतीची वेगवेगळी सर्व अनुदानाच्या खर्चाच्या पावत्यसाची झेरॉक्स आवश्यक आहे."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९.०४.२००८ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे चार स्वतंत्र प्रथम अपिले केली. या सर्व अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०६.२००८ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी नांदेड, नायगाव, धर्माबाद व देगलूर यांना अनुक्रमे दि. २७.०६, १५.०६,२७.०६ व दि. ३१.०५.२००८ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. या पैकी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव यांनी दि. १३.०८.२००८ रोजी काही माहिती देऊ केली असता, ही माहिती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले व उर्वरित सर्व गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, अपील क्र.१६३१/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी

व जन अपिलीय अधिकारी  उपस्थित आणि इतर प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या म्हणण्याशी सुसंगत असा युक्तिवाद केला. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्याने त्यांना प्रथमतः माहिती गोळा करण्यासाठी वेळ लागला. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०६.२००८ रोजी आदेशित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १३.०८.२००८ रोजी माहिती देऊ केली असता,अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. आता त्यांनी त्यांच्यासोबत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींशी संबंधित माहिती आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव वगळता उर्वरित कोणत्याही गट विकास अधिकारी यांनी मूळात कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना जर नाकारावयाची होती, तर त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) व ७(८) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तसेच आपल्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव वगळता उर्वरित सर्व गट विकास अधिकारी आयोगासमोर अनुपस्थित आहेत. गट विकास अधिकारी, नांदेड, धर्माबाद व देगलूर यांनी अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, धर्माबाद व देगलूर यांना असे आदेशित करण्यात

येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रत्येकी रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाच्या संदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या वेळेत कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन चारही अपील अर्जांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १६३०/०८, १६३२/०८ व १६३६/०८ मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १६३१/०८ अंशत: मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, धर्माबाद व देगलूर यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, धर्माबाद व देगलूर यांनी उपरोक्त प्रकरणी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याबद्दल त्यांना प्रत्येकी एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

५. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. विलास समर्थराव कदम, तगलाईन गल्ली, झेंडा चौक, मुखेड जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाद्वारे)

५. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाद्वारे)

६. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६३३/०८,१६३४/०८,१६३५/०८ व १६३७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६३३,१६३४,१६३५ व १६३७
निर्णय दिनांक : २६-१०-२००९

१. श्री. विलास समर्थराव कदम :अपिलार्थी
रा.मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

१. **अपील क्र.१६३३/०८**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, बिलोली,<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड | :प्रतिवादी |

२. **अपील क्र.१६३४/०८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, कंधार,<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड |

३. **अपील क्र.१६३५/०८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, भोकर,<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड |

४. **अपील क्र.१६३७/०८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, अर्धापूर,<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य  माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र  द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही म्हणून त्यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई कलम क्रमांक २०(१) व (२) नुसार कारवाई करावी असे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, बिलोली, कंधार, भोकर व अर्धापूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४ ते २००७  या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २०% , ३० %व १२ वा वित्त आयोगाच्या अनुदानातून केलेल्या कामाबाबत सन २००४-२००७ या कालावधीची अनुदानाची माहिती, सादीलवार अनुदानाचा एकूण तपशील व खर्चाचा संपूर्ण तपशील, खर्चाच्या पावत्यासह, ही माहिती पंचायत समिती स्तरावरील माहिती तसेच ग्रामपंचायतस्तरावरील माहिती वेगळी देण्यात यावी. या सर्व योजनेच्या अनुदानाच्या खर्चाच्यासाठी C.S.T./B.S.T. ची प्रमाणके आहे का, असतील तर त्यांची शासन परिपत्रके देण्यात यावीत. वरील सर्व माहितीच्या  झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात, उदा. अंदाजपत्रक, M.B.बुक ची झेरॉक्स. वरील कालावधीत आपल्या कार्यालयाला संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २०% , ३० %व १२ वा वित्त आयोगाअंतर्गत व महसूल अनुदान, गौण खनिज अनुदान, स्टॅम्प डयुटी अनुदान,संपूर्ण तपशील पंचायत समिती स्तरावरील तसेच ग्रामपंचायत स्तरावरील त्यांना देण्यात आलेले आणि खर्चाचा संपूर्ण तपशील योजनानिहाय, योजनानिहाय खर्चाचे तरतुदीचे शासन परिपत्रके, पंचायत समिती स्तरावरुन कामे केलेल्या धनादेश देण्यात आलेल्याचा संपूर्ण तपशील, खात्यामार्फत केलेल्या कामाचे धनादेश कोणाच्या नावे काढण्यात

आलेले आहेत त्याचा संपूर्ण तपशील उदा. अभियंता, B.D.O.,ग्रामसेवक इत्यादी संपूर्ण नावासह देण्यात यावेत, योजनानिहाय, पंचायत समितीच्या वरील योजनेचे अनुदान वाटप केलेल्या कॅशबुक व पासबुकाची झेरॉक्स प्रत, वरील योजनेतून करण्यात आलेल्या कामाचे अंदाजपत्रकाची झेरॉक्स, सर्व ग्रामपंचायत स्तरावर ग्राम.पं.निहाय व M.B. बुकाची झेरॉक्स प्रती, सर्व खर्चाच्या पावत्यासह देण्यात यावीत. पंचायत समिती सभागृहाच्या प्रोसिडिंग बुकाची झेरॉक्स, तसेच ग्रा.पं.चे बँक खात्याचे कॅशबुक व पासबुकाची झेरॉक्स, सर्व ग्रा.पं.निहाय काम करण्यात आलेल्या रोकड किर्द बुकची झेरॉक्स ग्रा.पं.सर्व पावत्यासह झेरॉक्स देण्यात याव्यात. वरील सर्व माहिती पंचायत समिती स्तरावरील वेगळी वर्षनिहाय देण्यात यावी. प्रत्येक ग्रामपंचायतीची वेगवेगळी सर्व अनुदानाच्या खर्चाच्या पावत्याची झेरॉक्स आवश्यक आहे."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली, कंधार, भोकर व अर्धापूर यांनी अनुक्रमे दि. १७.०३, ०५.०३, निरंक व दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना ग्राम पंचायतीकडे वेगळ्याने अर्ज करुन घेण्याचे सूचित केले. गट विकास अधिकारी, भोकर व अर्धापूर यांनी अपिलार्थीस अनुक्रमे रु. १०,०००/- व रु.५,०००/- इतके माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. ०२.०५.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे चार स्वतंत्र प्रथम अपिले केली. या सर्व अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०६.२००८ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीच्या अपील क्र. १६३३/०८, १६३४/०८ व १६३५/०८ या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जातील माहिती दि. २२.०६.२००८ पर्यंत व अपील क्र. १६३७/०८ च्या संबंधित मूळ अर्जातील माहिती दि. ०३.०७.२००८ पर्यंत विनामूल्य देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व अपील क्र. १६३४/०८ व १६३५/०८ या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार व भोकर यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत. अपील क्र. १६३३/०८ व १६३७ च्या संदर्भातील जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली व अर्धापूर हे गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेल्या विनंतीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती कंधार यांच्याकडून दि. १०.१०.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली व कंधार यांनी प्रतिसाद दिला असला तरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना वेगळयाने ग्रामपंचायतीकडे अर्ज करुन देण्याच्या सूचना देण्याचे त्यांना कोणतेही प्रयोजन नव्हते. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीकडे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवावयास हवी होती व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही न

केल्यामुळे व पर्यायाने अधिनियमातील कलम ६(३)(एक) चा भंग केल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्या स्तरावर संकलीत करुन आता अपिलार्थीस पुरविणे भाग आहे. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर व अर्धापूर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अनुक्रमे दि.'निरंक' व दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३)(क) मधील तरतुदीप्रमाणे देणे त्यांना भाग आहे, तो दिलेला नाही. त्यामुळे पंचायत समिती भोकर व अर्धापूर यांचे अपिलार्थीस दिलेले अनुक्रमे दि. 'निरंक' व दि. १८.०३.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. त्यामुळे त्यांनाही आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. या सर्व पार्श्वभूमीवर गट विकास अधिकारी, पंचायत समिती,बिलोली, भोकर व अर्धापूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण देय (प्रश्नार्थक व मोघम स्वरुपाची माहिती सोडून) माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, सर्व संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई आदेशित करणे आयोग उचित समजत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन चारही अपील अर्जांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १६३३/०८, १६३५/०८ व १६३७/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १६३४/०८ निकाली काढण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली, भोकर व अर्धापूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. विलास समर्थराव कदम, तगलाईन गल्ली, झेंडा चौक, मुखेड जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९
निर्णय दिनांक २६/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख शाकिरभाई अब्दुल सत्तार,<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर. | | |

**निर्णय**

श्री. शेख शाकिरभाई अब्दुल सत्तार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २८.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २०.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३ महिने १८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले

आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार, तवकल वस्ताद मळा, टिळक रोड, अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५०
निर्णय दिनांक २६/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पोपट नाना पवार,<br>रा.खुडसरगांव, ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, नांदगांव, जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>नांदगांव, जि.नाशिक | | |

**निर्णय**

श्री. पोपट नाना पवार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २३.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २४.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या

दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४ महिने इतक्या जास्त विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पोपट नाना पवार, रा.खुडसरगांव, ता.राहुरी, जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नांदगांव, जि.नाशिक
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदगांव, जि.नाशिक.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५१
निर्णय दिनांक २६/१०/२००९

१ श्री. संभाजी मल्हारी झावरे, : अपिलार्थी
रा.टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

श्री. संभाजी मल्हारी झावरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०१.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दिनांक २७.०१.२००९ रोजी निर्णय दिला. तो निर्णय अपिलार्थी यांना दि. २३.०२.२००९ रोजी प्राप्त झाला आहे. या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संभाजी मल्हारी झावरे, मु.पो.टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२
निर्णय दिनांक २६/१०/२००९

१ श्री. संभाजी मल्हारी झावरे, : अपिलार्थी
रा.टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

श्री. संभाजी मल्हारी झावरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०१.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दिनांक २७.०१.२००९ रोजी निर्णय दिला. या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संभाजी मल्हारी झावरे, मु.पो.टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४६
निर्णय दिनांक २६/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बालाजी नारायण काळे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सिंचन उपविभाग, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>सिंचन उपविभाग, सिल्लोड, जि.औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. बालाजी नारायण काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २७.०८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०४.११.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १८.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिने ९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले

आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बालाजी नारायण काळे, एफ-१, एच-१, प्लॉट नं.६, तिरुपती पार्क जवळ, एन-४, सिडको, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी, सिंचन उपविभाग, सिल्लोड, जि.औरंगाबाद
३. जन अपिलीय अधिकारी, सिंचन उपविभाग, सिल्लोड, जि.औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६११

निर्णय दिनांक २७-१०-२००९

१ श्री. भगवान कचरु खोतकर, भदंत आनंद कौसल्यायन, : अपिलार्थी
बुध्दविहाराजवळ, राहुलनगर, (रेल्वेस्टेशन) पैठण रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : स्वस्त धान्य दुकान क्रमांक ६२, ६५, ६६, ९६, १०६, १५३

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती त्यांना विहित कालावधीमध्ये न पुरविल्यामुळे त्यांनी दिनांक ०५-०७-२००८ रोजी जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन अपिलार्थीस माहितीसाठी फी भरण्याचे कळविले आहे. या प्रकाराने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद शहरातील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ६२, ६५, ६६, ९६, १०६ व १५३ या दुकानासंदर्भात सन २००० ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करेपर्यंतच्या दिनांकापर्यंत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या दुकानाशी संबंधित स्वस्त धान्य दुकानात व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात नोंद असलेल्या विविध प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांची स्वतंत्र यादी, प्रतिमहा अथवा प्रति पंधरवाडा केला जाणारा धान्य पुरवठा, त्याचे दर व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रतीच्या छायांकीत प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. परंतु अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले असून अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००८ रोजी निर्णय पारीत करुन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिनांक ०१-०८-२००८ रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व प्राप्त माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी व सर्व त्रयस्थ पक्ष हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिली असून हे पत्र त्यांनी प्रत्यक्षात दिनांक ०१-०८-२००८ रोजी पोस्टाने पाठविले आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो द्यावयाची माहिती ते वीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

सर्व त्रयस्थ पक्षांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारचा कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी सादर केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००८ रोजी

दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शिधापत्रिकाधारकांची यादी न देता कार्ड संख्येचा उल्लेख केला आहे. त्यातही अपिलार्थीने दुकान क्रमांक १५३ ची माहिती मागितली असता, अपिलार्थीस १९३ क्रमांकाच्या दुकानाची माहिती दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठी-च्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते दिनांक ०५-०६-२००८ या कालावधीशी संबंधित दुकानदाराकडील स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रतीच्या छायांकीत प्रतीची मागणी केली आहे. तथापि यापैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती त्यांच्या या दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली नाही उलट त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०७-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडील रजिस्टरच्या छायांकीत प्रती नियमानुसार शासन खाती फी जमा करुन हस्तगत करुन घेण्याचे सूचविले आहे. वास्तविक पाहता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा विहीत कालावधी या पत्रव्यवहारापूर्वीच व्यपगत झाला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे. या सूचनेकडे देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दुर्लक्ष करुन अपिलार्थीस शासन खाती फी जमा करण्याचे सूचित केले आहे. परंतु शासन खाते कोणते याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये माहिती टपालाव्दारे मागितलेली असूनही माहिती हस्तगत करुन घ्यावी अशी उलट सूचना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दिलेली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये दुकानदारांना सन २००० ते दि. ०५-०६-२००८ पर्यंतच्या कालावधीसाठी धान्य पुरवठ्याची माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित दुकानदारांचा धान्याचा मंजूर कोटा कळविला आहे. परंतु प्रत्यक्षात केलेल्या पुरवठयाची माहिती दिलली नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत तर सोडा परंतु जन अपिलीय

अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही असे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलार्थीस पुरविली आहे ती वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहाय्यक यांनी अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक हे एकत्रितपणे अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवण्यास जबाबदार ठरत आहेत. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई

करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. भगवान कचरु खोतकर, भदंत आनंद कौसल्यायन, बुध्दविहाराजवळ, राहुलनगर, (रेल्वेस्टेशन) पैठण रोड, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१२

निर्णय दिनांक २७-१०-२००९

१ श्री. सखाराम संपतराव आराख, : अपिलार्थी
रा. चंदनझिरा, वॉर्ड क्रमांक १९, बुध्द मंदिराच्या बाजूला,
चंदनझिरा, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
जालना, तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना,
तालुका जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना यांच्याकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी त्यांच्या उपदान रकमेच्याबाबत काही माहिती मागितली असता त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तहसीलदार, जालना यांच्याकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी

प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर तहसीलदार, जालना यांनी देखील कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांची उपदान रक्कम ते ज्या खाजगी कंपनीमध्ये कामाला होते त्या कंपनीकडून वसूल करुन घेण्याकरिता नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना यांच्याकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी केलेला अर्ज, हा त्यांच्या उपदानाची रक्कम नॅशनल इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन, मुंबई यांच्यामार्फत वसूल करुन ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात केलेला विनंती अर्ज आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रांची छाननी केली असता असे आढळून येते की, अपिलार्थी हे मुंबई येथील खाजगी कंपनीत नोकरीला होते. तथापि ही कंपनी कालांतराने बंद झाली. परंतु अपिलार्थीस त्यांच्या हक्काची उपदान रक्कम प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी वेगवेगळया महसूल प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केला. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, जालना यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्राने सूचित करुनही तहसीलदार, जालना यांनी अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी तहसीलदार, जालना यांनी उपदान प्रदान अधिनियम १९७२ च्या कलम ८ नुसार थकीत रक्कम वसूल करण्याबाबत कार्यवाही करावयाची होती परंतु तहसीलदार व नायब तहसीलदार, जालना यांनी टाळाटाळ करुन अद्यापपावेतो अपिलार्थीच्या या विषयावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीच्या मर्यादेपर्यंत अपिलार्थीच्या कथित माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितली

नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे दिसून येत आहे. या अर्जाव्दारे तहसीलदार, जालना यांनी अशी देय उपदानाची रक्कम संबंधीत कंपनीकडून एरिअर्स ऑफ लॅण्ड रेव्हेन्यू या सदराखाली वसूल करुन ती अपिलार्थीस देणे हे अपिलार्थीस येथे अपेक्षित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अशा प्रकारच्या विनंतीवर जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे अपेक्षित नाही. ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सखाराम संपतराव आराख, रा. चंदनझिरा, वॉर्ड क्रमांक १९, बुध्द मंदिराच्या बाजूला, चंदनझिरा, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१३

निर्णय दिनांक २७-१०-२००९

१ श्री. गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड, : अपिलार्थी
मु. बाळापूर, कुंभार गल्ली जवळ, पो. तालुका
धर्माबाद, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी जिल्हाधिकारी,

नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर पुढील कार्यवाही करुन अपिलार्थीस  समर्पक उत्तर देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) नुसार प्रतिदिनी रुपये २५० इतकी दंडाची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

"१. मौजे बाळापूर चे अर्जदार गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड आवक क्रमांक DMO८५२२ नुसार माहिती सुविधा केंन्द्र धर्माबाद येथे दाखल केल्या दिनांक २०/१०/२००७ या रोजी प्रमाणे सदरिल प्रकरणात योग्य त्या कार्यवाही करुण अर्जदारास न्याय देऊन दिनांक ०४/११/२००७ या रोजी जन्म नोंदणी आदेशाचे प्रमाण पत्र मिळणे या बाबतचे मे. तहसिलदार धर्माबाद साहेबानी सविस्तर माहिती दयावी.

२. अन्यथा जन्म नोंदणी आदेशाचे योग्य त्या कार्यवाही करुन न्याय देणे या विषयी व तसेच जन्म नोंदणी प्रमाण पत्र मिळणे किंवा न मिळणे या बाबतचे मे. साहेबांनी तसे अर्जदाराचे तामील नोटीसावर नामे गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड याचे हस्ते स्वाक्षरी केलेल्या पावतीचे न्याय देऊन सविस्तर माहिती दयावी.

वरिल आवश्यक असलेल्या माहितीचा वर्णन / तपशिल क्रमांक ०१ ते ०२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अर्जदारास न्याय देऊन सविस्तर माहिती दयावी. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००८ रोजी अपिलार्थीस पत्राव्दारे असे कळविले की, त्यांनी या प्रकरणी तहसीलदार, धर्माबाद यांच्याशी संपर्क साधावा. यानंतर तहसीलदार यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली जन्म मृत्यू नोंदणीसंदर्भात आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (३) नुसार वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील दिनांक ०६-०९-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक ते जन्म मृत्यू नोंदणीचे प्रमाणपत्र त्यांनी दिनांक ०५-०८-२००९ रोजी पुरविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने ज्या उद्देशाकरिता जन

माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज केला होता तो उद्देश जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०८-२००९ रोजी जन्म मृत्यू प्रमाणपत्र दिल्याने साध्य झाल्याचे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थीस आवश्यक ती कथित माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली आहे त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी याच्याकडे "व्यक्तिशः" माहितीची मागणी केल्यानंतर ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांच्याशी या अर्जासंदर्भातील पुढील घडमोडी ज्ञात करुन घेण्याकरिता त्यांनी व्यक्तिशः संपर्क साधणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांच्याशी अपिलार्थीने अशाप्रकारचा संपर्क साधला असल्याचा कोणताही उल्लेख अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही व तसेच यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड, मु. बाळापूर, कुंभार गल्ली जवळ, पो. तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१४

निर्णय दिनांक २७-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख नईम शेख लाल,<br>नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली,<br>तालुका जिल्हा हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली,<br>तालुका जिल्हा हिंगोली | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी, हिंगेली यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २०-०५-२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती चुकीची व अपूर्ण असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे सन २००५-०६ या कालावधीमध्ये हिंगोली, रामलीला मैदान या शासकीय जमिनीची जागा सर्वे नंबर ९४ ही पे ॲण्ड पार्क स्वरुपात दहा महिन्याच्या कालावधीकरिता लिलाव पध्दतीने दिल्यासंदर्भात एकूण नऊ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पे ॲण्ड पार्क पध्दतीने देण्यासंदर्भात कोणाची परवानगी व कोणत्या नियमाप्रमाणे देण्यात आली त्या परवानगीची व नियमाची प्रत, शासनाच्या परवानगीची प्रत, पे ॲण्ड पार्क स्वरुपात शासनाच्या मालकीची जागा भाडे तत्वावर देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना अधिकार आहेत का, असल्यास नियमाची प्रत, ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्याची प्रत, जे झोन पाडण्यात आले, त्यातील ए, बी, सी, डी, इ यातील एकुण दुकानांची संख्या, प्रत्येक दुकानाचे क्षेत्रफळ, प्रतिदिनी भाडे त्याची माहिती, जे झोन पाडण्यात आले होते ज्यामध्ये जिल्हा प्रशासनाने क्षेत्रफळ ठरवून देण्यात आले होते त्या पध्दतीने आजच्या परिस्थितीत दुकाने आहे काय, संबंधित जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची नांवे, यासंदर्भात दाखल केलेल्या दिवाणी दाव्याच्या संदर्भात जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, हिंगोली यांच्यातर्फे न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्राची प्रत व ठेकेदारांना ज्यावेळी जागा ताब्यात दिली व नंतर घेतली होती त्यावर लेखी पत्रव्यवहार करण्यात आला होता काय - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित नस्तीच्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन दिल्या. यानंतर परत दिनांक १७-०४-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांना दिनांक ०९-०४-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले असता

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती चुकीची व अपुरी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०४-२००८, दिनांक १७-०४-२००८ व दिनांक २०-०५-२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

या प्रकरणातील संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४, ५, ८ व ९ शी संबंधित माहिती बरोबर दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी सदरची दुकाने लिलाव पध्दतीने भाड्याने देण्यासंदर्भात तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. बाजीराव जाधव यांच्या तोंडी आदेशाप्रमाणे कार्यवाही केली. तेव्हा अपिलार्थीस या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्या तोंडी आदेशाप्रमाणे कार्यवाही केली होती असे उत्तर देणे समर्पक ठरले असते, तथापि त्यांनी अपिलार्थीस जिल्हाधिकारी हिंगोली यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असे उत्तर दिले आहे जे अपूर्ण व चुकीचे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने ठेकेदाराशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या करारनाम्याची प्रत मागितली आहे. परंतु या मुद्दयावर करारनामा केल्याबाबतची कोणतीही

कागदपत्रे उपलब्ध नाहीत अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडील संचिकांचे अवलोकन केले असता त्यामध्ये या करारनाम्याच्या प्रती आढळून आल्या आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी संबंधितांशी केलेल्या करारनाम्याची प्रत आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. मुद्दा क्रमांक ५ मध्ये अपिलार्थीने एकूण दुकानांची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ आणि दुकानाचे प्रतिदिवस भाडे ही माहिती विचारली आहे. याबाबींचा व दुकानाच्या भाड्याचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी संबंधित ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्याच्या प्रतीमध्ये उपलब्ध आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले की, ही माहिती नकाशामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दर्शविली आहे व या प्रकरणाच्या शर्ती व अटी जाहीर प्रगटनामध्ये नमूद केल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस दिलेली अशा प्रकारची माहिती देखील निश्चितपणे दिशाभूल करणारी आहे असे आयोगास वाटते. अपिलार्थीस या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी नकाशाची प्रत उपलब्ध करुन देणे गरजेचे होते परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी या प्रकरणी दिवाणी न्यायालयात कोणत्याही प्रकारचे शपथपत्र सादर केलेले नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस अशी माहिती देण्याच्या ऐवजी दिवाणी न्यायालयात शपथपत्र सादर केल्याबाबतचे अभिलेखे संचिका उपलब्ध नाही असे उत्तर दिले आहे, जे पूर्णतः चुकीचे आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मुद्दा क्रमांक ४ मध्ये समाविष्ट आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजी पुरविलेली

माहिती व आज त्यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली माहिती यामध्ये आयोगास फरक आढळून आल्याने जन माहिती अधिकारी याना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४, ५, ८ व ९ व्दारे मागणी केलेली व वास्तवावर आधारीत संपूर्ण माहिती  अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४, ५, ८ व ९ व्दारे मागणी केलेली, वास्तवावर आधारीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली, तालुका जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली, तालुका

जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१५

निर्णय दिनांक २७-१०-२००९

१ श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी
नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (ना.),
तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

त्रयस्थ पक्ष : श्री. अभिमान रंगनाथ बोधवड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. अभिमान रंगनाथ बोधवड, तहसीलदार, औंढा (ना.) यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची व टी. सी. ची सत्यप्रत मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे कार्यालयीन कामकाजाशी संबंधित नसल्याचे कळविले. तसेच या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस असेही अवगत केले की, अधिनियमातील कलम ११ नुसार या प्रकरणी संबंधितांची पूर्वपरवानगी प्राप्त नसल्याने ती अपिलार्थीस देणे शक्य होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. अपिलार्थीचे अपील फेटाळून लावतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्याने दिली नसल्याने आणि जात प्रमाणपत्र देण्यासाठी जात प्रमाणपत्र वितरीत करणारे अधिकारी हे सक्षम अधिकारी असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी तथा त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची आहे आणि अशा प्रकारची माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्याने ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. ही माहिती जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असण्याची शक्यता आहे असेही त्यांनी आयोगास अवगत केले .

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्रयस्थ पक्ष श्री. अभिमान रंगनाथ बोधवड, तहसीलदार, औंढा (ना.) यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची व टी. सी. ची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे जरी जातीचे प्रमाणपत्र ही वैयक्तीक स्वरुपाची माहिती असली तरीही या प्रमाणपत्राच्या आधारे संबंधितांना विशेष प्राधान्याने शासकीय सेवेमध्ये सामावून घेतले गेले आहे. तसेच या प्रमाणपत्राचा फायदा पुढील प्रगतीसाठी देखील त्रयस्थ पक्षास वेळोवेळी होत असतो. या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त होणाऱ्या नियुक्ति व तदनंतरच्या पदोन्नती नंतर त्रयस्थ पक्षास मिळणारा पगार हा शासनाने कररुपाने नागरीकांकडून वसूल केलेल्या रकमेतून होत असतो. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती जरी वैयक्तीक स्वरुपाची असली तरी तिचे स्वरुप खाजगी आहे असे म्हणता येणार नाही. शासनाकडून या जातीच्या प्रमाणपत्राआधारे त्रयस्थ पक्षास शासकीय सेवेमध्ये वेळोवेळी आर्थिक लाभ होत असतो, त्यामुळे ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची ठरते. सार्वजनिक स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांना उघड करण्यासाठी संबंधित त्रयस्थ पक्षाची हरकत असली तरीही या माहितीचे वरील मुद्दयामध्ये स्पष्ट केलेले सार्वजनिक स्वरुप पाहता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस उघड करुन द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे ही माहिती जर जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे उपलब्ध होती तर त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ११-०३-२००८ रोजीचा प्रथम अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही व परिणामी अपिलार्थीस आवश्यक माहितीपासून वंचित राहावे लागले.

त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या कार्यालयातून त्रयस्थ पक्ष श्री. अभिमान रंगनाथ बोधवड यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध करुन घेऊन ती अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे त्यांना आता ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाच्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्षाच्या टी. सी. च्या सत्यप्रतीची मागणी केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, टी. सी. ची प्रत त्रयस्थ पक्षाने ज्या शाळेतून / महाविद्यालयामधून त्यांची पदवी घेतली असेल त्या संस्थेकडे उपलब्ध असणे मूलतः अभिप्रेत आहे त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे अपेक्षित नसल्याने, देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीपैकी त्रयस्थ पक्षाच्या (श्री. अभिमान रंगनाथ बोधवड)जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (ना.),तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वसमत,तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१७

निर्णय दिनांक २७-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. देवेंद्र कल्लप्पा नागोबा,<br>रा. नारळी मठ, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,<br>तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना चुकीची पेन्शन ऑर्डर दिल्यामुळे त्यांना कमी रोखे मिळत असल्याने आणि त्यांच्या पेन्शनवर टाच आणली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या तपशीलासंदर्भात " पेन्शन ऑर्डर चुकीची आहे. घटनेने पेन्शन हा हक्क ठरविलेला आहे. पेन्शन ऑर्डर चुकीची आहे " असे अभिप्राय दिले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पेन्शन ऑर्डरच्या संदर्भात " पेन्शनबाबत " ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी नक्की कधी प्रतिसाद दिला हे आवश्यक त्या कागदपत्राअभावी आयोगास कळण्यास मार्ग नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १३-१२-२००७ रोजी आदेश पारीत करुन या आदेशान्वये अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळतांना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये पेन्शन ऑर्डरची प्रत दिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावल्याचे नमूद केले आहे. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या निर्णयाची प्रत सादर केली.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेला " पेन्शनबाबत " हा माहितीचा विषय होऊ शकत नाही. कारण केवळ " पेन्शनबाबत " असे नमूद केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा स्पष्ट बोध होत नाही. अशी "माहिती" ही माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेल्या निर्णयावरुन अपिलार्थीस त्यांच्या पेन्शनमध्ये सुधारणा अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. तथापि अशा प्रकारचे प्रशासकीय आदेश देणे हे आयोगाच्या अधिकार कक्षेच्या बाहेरचे आहे. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार केला असता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना प्राप्त होणा-या पेन्शनच्या रकमेबाबत जर त्यांचे काही आक्षेप असतील तर या आक्षेपाचे निराकरण त्यांनी ही पेन्शन मंजूर करणा-या प्राधिकरणाकडून अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देवेंद्र कल्लप्पा नागोबा, रा. नारळी मठ, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१८
निर्णय दिनांकः २७-१०-२००९

१. श्री. ज्योतीबा लिंबाजी पवार, : अपिलार्थी
रा.सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,तुळजापूर जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तुळजापूर जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व प्रथम अपिलाची सुनावणी होऊनही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००० ते प्रथम अर्जाच्या दिनांकापर्यंत भाग १ व २ मध्ये शासनास पूर्ण हिशेब सादर न करणाऱ्या रेशन दुकानदारांच्या बाबतची माहिती मागितली होती. यामध्ये - "हिशेब सादर न करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई केली होती का ?, असल्यास त्यांची यादी, या संबंधी शासनास अहवाल सादर केला असल्यास त्याची सत्यप्रत, हिशेब सादर न करणाऱ्या दुकानदारास माल वाटप केला आहे का ?, असेल तर कोणाच्या आदेशाने व नियमाने" - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १०.०९.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिली व या माहितीसंदर्भात अपिलार्थीची काहीही तक्रार नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना लेखी पत्राद्वारे कबूल केले आहे. अपिलार्थीचा सदरचा दि. १०.०९.२००९ रोजीचा लेखी जबाब त्यांनी आयोगास सादर केला असून यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे व त्यांची या संदर्भात कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे कबूल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाने, उपस्थित जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कारण विचारले असता, त्यांनी अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे त्या प्रकरणाशी संबंधित सर्व अभिलेखे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी जप्त केले असल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी विलंब लागला, असे आयोगास अवगत केले. वास्तविक पाहता जिल्हाधिकारी यांनी जर जन माहिती अधिकारी यांच्याकडील माहिती जप्त केली होती तर अशावेळी, त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्याची कार्यवाही करण्यास हरकत नव्हती. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अशी कृती न केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस दि.१०.०९.२००९ रोजी माहिती प्राप्त झाल्याचा पुरावा व अपिलार्थीचा कबूली जबाब आयोगाकडे सादर केला असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**२.** तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ज्योतीबा लिंबाजी पवार, रा.सिंदफळ ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१९
निर्णय दिनांक: २७-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय महादेवराव सोनवणे,<br>रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>पुरवठा विभाग,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | | |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी फेर सादर झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे मूळात दि.०१.१०.२००७ द्वितीय अपील केले होते. तथापि या अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे न जोडल्यामुळे, सदर अपील आवश्यक त्या कागदपत्राच्या पूर्ततेकरिता आयोगाच्या कार्यालयातून अपिलार्थीकडे परत पाठविण्यात आले होते. आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेसह अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०८.२००८ रोजी विचाराधीन द्वितीय अपील फेरसादर केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही आणि त्यांना प्राप्त

झालेली माहिती ही अपूरी व चुकीची आहे. यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १२.१०.२००५ ते १५.०५.२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, माहिती प्राप्त झालेल्या अर्जदारांची संख्या, अपिलात गेलेल्या अपिलार्थींची संख्या, यासंदर्भातील नोंदवहीची प्रत व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे ग्राहक प्रबोधनार्थ प्राप्त झालेला निधी जिल्हयात किती व कोठे वापरला, याची तपशीलवार माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तथापि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०७.२००७ रोजी प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या पदावर माहे डिसेंबर, २००७ पासून कार्यरत आहेत. सदरचे प्रकरण हे त्यांनी कार्यभार स्वीकारण्यापूर्वीचे आहे. त्यांना अपिलार्थी हे दि. २०.०६.२००८ रोजी भेटण्यासाठी आले असता अपिलार्थीने त्यांना दि. २०.०६.२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे लेखी कळविले आहे. त्यांच्या म्हणण्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना दि. २०.०६.२००८ रोजी माहिती मिळाल्याचे अभिप्राय आयोगास दाखविले. या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही पत्राद्वारे माहिती दिली असल्याचा पुरावा आयोगाकडे आज उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली आहे असे मानता येणार नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसात विनामूल्य देण्यास तयार आहेत. हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे करताना त्यांना व्यक्तिशः माहिती हवी असल्याचे नमूद केले आहे. 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यास अर्ज दाखल केल्यानंतर त्यांच्या अर्जाच्या संदर्भात पुढील घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधणे गरजेचे आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी अशाप्रकारे

व्यक्तिशः संपर्क साधल्याचा कोणताही पुरावा जोडला नाही व तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६२०
निर्णय दिनांकः २७-१०-२००९

१. श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे, : अपिलार्थी
रा. कळंब, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक व
मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (नि.श्रे.)उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
लातूर विभाग,लातूर.

त्रयस्थ पक्षः श्री. कल्याण कुलकर्णी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, चुकीची, दिशाभूल करणारी व खोटी माहिती विनामूल्य प्राप्त झाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या प्रकरणी त्यांना पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती पाठविल्यामुळे शासनाचे माहितीचे मूल्य बुडाल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले असून आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांच्या संदर्भात एकूण सात मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या सात मुद्यांमधील मुद्दा क्र. ४ ते ७ या मुद्यांबाबत त्रयस्थ पक्ष श्री. कुलकर्णी, वरिष्ठ लिपीक,आस्थापना यांच्या नेमणूकीबाबत त्रयस्थ पक्षाची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात नेमणूक झाल्यापासून ते त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित आस्थापना विभागाकडे माहिती मागितली होती व उर्वरित ३ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील बदलीच्या आदेशाच्या प्रती अशाप्रकारची सर्वसाधारण स्वरुपाची माहिती मागविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी हा दि. २४.१०.१९९२-९३ ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंत असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्याने त्यांना अधिनियमातील कलम ८(त्र) व १६(ट) व (च)नुसार देता येत नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दि. ०७.०७.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०६.२००८ रोजी पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण व चुकीची वाटल्यावरुन आणि विशेषतः ती विनामूल्य प्राप्त झाली असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०६.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ३ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षिली आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची अथवा त्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या संदर्भात त्यांना कारणे विचारणे अर्जदारास अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ३ द्वारे मागणी केलेल्या माहितीतील जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची "कारणे" अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित मुद्यांवर, सर्वसाधारणपणे सुसंगत माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मधील जन माहिती अधिकारी यांनी एका वर्षात केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त श्री. किरण कुलकर्णी यांच्या बदलीच्या संदर्भातील आदेशाची प्रत दिली आहे. त्यांनी या प्रकरणी इतर बदल्यांच्या आदेशांच्या प्रतीही अपिलार्थीस पुरवाव्यात म्हणजे अपिलार्थीस मुद्दा क्र. २ च्या संदर्भात संपूर्ण माहिती दिल्यासारखे होईल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या

प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती दिल्याबद्दल व याद्वारे शासनाचा महसूल बुडाल्याबाबत आक्षेप घेतले आहेत. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत माहितीपोटीचे शुल्क कळविणे अथवा अर्जदाराच्या अर्जातील माहिती त्यांना देणे अथवा नाकारणे यासंदर्भात निर्णय घेणे अभिप्रेत आहे. हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होऊ शकते. हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच दि. २२.०४.२००८ रोजी नकारात्मक प्रतिसाद दिला आहे आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १९.०६.२००८ रोजीच्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीस दि. २७.०६.२००८ रोजी सकारात्मक प्रतिसाद देऊन माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने माहितीसाठी केलेला मूळ अर्ज व प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा दिनांक यामध्ये व्यपगत झालेला कालावधी हा अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या तीस दिवसांच्या कालावधीपेक्षा जास्त असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य माहिती प्राप्त झाली आहे, असे अपिलार्थीस येथे स्पष्ट करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २७-१०-२००९** | **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे, सायली निवास,भिमनगर,मु.पो. कळंब,ता.कळंब, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (नि.श्रे.) उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६२१/०८ व १६२२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६२१ व १६२२
निर्णय दिनांक: २७-१०-२००९

१. श्री. गोरख सोपानराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.शिंगोली,ता. जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, ती एकाच प्राधिकरणाशी संबंधित असल्यामुळे एकत्रितपणे आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्रमांक १६२१/०८** :-

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांनी २३ दिवसांत परत पाठविल्याने आणि त्यांनी चुकीचे अभिप्राय उशिराने कळविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी आयोगाच्या

असेही निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अभिप्राय समाविष्ट नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या दि. १८.०६.२००८ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) व पशुसंवर्धन अधिकारी यांच्या अभिप्रायाची नोटींगसह झेरॉक्स प्रत, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज अपिलार्थीस परत केला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १४.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचा अर्ज संबंधित विभागाकडे पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागाशी संबंधित पत्राची प्रत अपिलार्थीस दि. ०६.०८.२००८ रोजी पाठविली. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांच्या अभिप्रायाचा समावेश नसल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायाची प्रत त्यांच्याकडे मागितली आहे. परंतु ही नस्ती सामान्य प्रशासन विभागाकडे असल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्या अर्जातील, "उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सा.प्र. यांचे अभिप्राय" या भागाशी संबंधित माहिती ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आता विनामूल्य पुरवावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगास कबूल केले आहे. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अपील क्र. १६२२/०८ :-**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याविरुध्द असलेली तक्रार मुद्दाम जाणीवपूर्वक झाकून ठेवली त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम १९६७ मधील कलम २२ चा दुरुपयोग केला असल्याचे

दिसून येते. या संदर्भात पुढे अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने - जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दि. ३०.०४.२००८ ते २३.०५.२००८ या कालावधीमध्ये केलेल्या तक्रार अर्जाच्या प्रती त्यांनी वरिष्ठांच्याकडे केव्हा पाठविल्या त्याचा दिनांक, जावक क्रमांक व संबंधित रजिस्टरचे पान(पुढील शब्द अस्पष्ट आहेत.) कोणास पाठविले - अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने संबंधित तक्रार अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावाने थेट केले असल्यामुळे त्यांच्या अर्जाची प्रत वरिष्ठांना पाठविली नाही, असे अपिलार्थीस कळवून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकड सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दि.३०.०४.२००८ रोजीच्या केलेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद श्री. सत्यवान भोसले यांच्याविरुध्द दि. ३०.०४.२००८ रोजी एक तक्रार केली होती. ही तक्रार त्यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना उद्देशून केली नव्हती. त्यांनी ही तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना उद्देशून करुन त्या तक्रारीची प्रत त्यांनी उपआयुक्त पशुसंवर्धन उस्मानाबाद यांना अग्रेषित केली होती. ही प्रत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना प्राप्त झालेली आहे. शासनाच्या प्रचलीत पध्दतीनुसार कोणत्याही कर्मचाऱ्याने आपल्या स्वतःच्या विरुध्द त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही विशिष्ट अभिप्रायाशिवाय प्राप्त झालेली प्रत त्याच्या वरिष्ठांच्याकडे पाठविण्याची पध्दत नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या तक्रार अर्जाची प्रत उपआयुक्त, पशुसंवर्धन उस्मानाबाद यांना केवळ माहितीस्तव दिली होती. त्यामुळे अपिलार्थीने सदर तक्रार करतेवेळी उपआयुक्त पशुसंवर्धन उस्मानाबाद यांच्याकडून त्यांनी कोणतीही कार्यवाही अपेक्षित केली नसावी असे अनुमान काढण्यास हरकत नसावी. या प्रकरणी मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या मर्यादेत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षित करणे आयोगास आवश्यक वाटत नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या दि.२३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच, अधिनियमातील विहित मुदतीत प्रतिसाद दिला आहे

हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोरख सोपानराव गायकवाड, रा.शिंगोली,ता. जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६२३
निर्णय दिनांक: २७-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. वैजिनाथ पांडुरंग पांडागळे,<br>रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्राम पंचायत, चिंचोली, ता. तुळजापूर,<br>जि. उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>तुळजापूर, जि.उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी ग्रामसेवक हे गैरहजर राहिले. ग्रामसेवकाने त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व माहिती ऐवजी रजिस्टर्ड पोस्टाने ''लोकमत सखी'' हे पुस्तक पाठविले व त्यामुळे संबंधित ग्रामसेवकावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्राम पंचायत, चिंचोली अंतर्गत झालेल्या यशवंत ग्रामसमृध्दी योजना, १२ वा वित्त आयोग, जवाहर योजना, दलीत वस्तीत झालेल्या कामासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - किती कामे कोणत्या फंडातून व त्यांची अंदाजपत्रकीय रक्कम, पाहणी अहवालाची प्रत, सदरील कामे अंदाजपत्रकाप्रमाणे झाले आहे काय, सदरील अंदाजपत्रकापेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याची टक्केवारी, सिमेंट कॉंक्रीट कामाचे टेस्ट रिपोर्ट, सध्या चालू वर्षात किती कामे चालू आहेत, त्याच्या इस्टीमेटची रक्कम व वर्क ऑर्डरच्या नकला व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहितीच्या अर्जांची संख्या व त्या अर्जांच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली असून ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ११.०६.२००८, १९.०६.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी दि. २१.०६.२००८ रोजी यासंदर्भात अपिलार्थीचे प्रथम अपील मंजूर केल्याचा निर्णय दिला. या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिल्याचे दिसून येत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करताना ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. परंतु आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाबरोबर त्यांनी त्यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत जोडली असल्याचे दिसून येत नाही. तसेच आजच्या सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आवश्यक त्या पुराव्याशिवाय कोणताही निर्णय घेणे आयोगास शक्य नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील या परिस्थितीत खारीज करण्याशिवाय गत्यंतर नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१६२३/०८, दि.१३.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वैजिनाथ पांडुरंग पांडागळे,रा. भीमनगर, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्राम पंचायत,चिंचोली, ता. तुळजापूर,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४०
निर्णय दिनांक २७/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विठ्ठल कोंडीबा वाघ,<br>रा.सेलू, जि.परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, सेलू, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. विठ्ठल कोंडीबा वाघ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०१.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०४.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिना इतक्या जास्त विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल कोंडीबा वाघ, रा.पिंपरी बु., ह.मु. महेश नगर, सेलू, ता.सेलू, जि.परभणी.
२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि.परभणी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४१
निर्णय दिनांक २७/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल कोंडीबा वाघ,<br>रा.सेलू, जि.परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, सेलू, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. विठ्ठल कोंडीबा वाघ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०१.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल कोंडीबा वाघ, रा.पिंपरी बु., ह.मु. महेश नगर, सेलू, ता.सेलू, जि.परभणी.
२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि.परभणी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४२
निर्णय दिनांक २७/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३ महिने ७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२६
निर्णय दिनांक २७/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सेवाराम होलाराम चावला,<br>रा.देवळाली कॅम्प, नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासक,<br>झुलेलाल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,<br>नाशिक रोड, नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, नाशिक | : | |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २०.१०.२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २७.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०८.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे प्रशासक, झुलेलाल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या प्रशासकांनी त्यांच्या दि. ३०.०८.२००६ रोजीच्या पत्राव्दारे सदर पतसंस्था माहिती अधिकार अधिनियम, या अधिनियमाखाली येत नसल्यामुळे पतसंस्थेकडे मागणी केलेली माहिती देता येणार नाही, असे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार दि. १४.०९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका यांनी त्यांच्या दि. १९.०९.२००६ रोजीच्या पत्राव्दारे, सदर पतसंस्था ही विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांच्या अधिपत्याखाली येत असल्याने, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे पाठवून त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. सदर अपिलावर विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी दि. २८.०९.२००६ रोजीच्या पत्राव्दारे, सदर पतसंस्था ही माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (ज) मधील तरतुदीनुसार शासकीय प्राधिकरण या संज्ञेत येत नाही, असे अपिलार्थीस कळवून त्यांचा अर्ज निकाली काढला. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, पतसंस्थेचे व्यवस्थापक व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, पतसंस्थेचे व्यवस्थापक व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्याअसे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर

पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २८२६/०७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सेवाराम होलाराम चावला, होलाराम को-ऑप. हौसिंग सोसायटी, संसारी लेन नं. २, देवळाली कॅम्प, ता.जि.नाशिक.
२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, झुलेलाल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, झुलेलाल भवन, डॉ.आंबेडकर रोड, नाशिक रोड, नाशिक- ४२२ १०१.
३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक-२

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २८२७/०७, २८३०/०७, २८३१ /०७, २८३२/०७, २८३३/०७ व २८३४/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२७,२८३०, २८३१, २८३२, २८३३ व २८३४/०७

निर्णय दिनांक २७/१०/२००९

१ श्री. विजय रविंद्रनाथ काबरा, : अपिलार्थी
रा.जळगांव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्यवस्थापक,
केमिस्ट को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., जळगांव
२ जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, जळगांव.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जळगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०२.११.२००६ रोजी नोंदविलेली व औरंगाबाद खंडपीठास दि. ३०.०५.२००८ रोजी फेरसादर केलेली सहा व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०५.२००६, २५.०५.२००६, २६.०५.२००६, २७.०५.२००६, २९.०५.२००६ व ३१.०५.२००६ रोजींच्या मूळ अर्जांद्वारे व्यवस्थापक, केमिस्ट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी त्यांच्या दि. २३.०६.२००६ रोजीच्या पत्राव्दारे माहिती अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी पतसंस्थांना लागू होत नाही, सबब मागणी केलेली माहिती

देता येणार नाही, असे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०७.२००६ रोजी सहा प्रथम अपिले दाखल केली. सदर अपिलांसंदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांनी त्यांच्या दि. २९.०७.२००६ रोजीच्या पत्राव्दारे, माहिती अधिकार अधिनियम, २००५ हा पतसंस्थेस लागू होत नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेली सहा व्दितीय अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेली त्यांची

सहा व्दितीय अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र . २८२७/०७, २८३०/०७, २८३१/०७, २८३२/०७, २८३३/०७ व २८३४/०७ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

अपील क्र. २८२७/०७, २८३०/०७ ते २८३४/०७

प्रत,

१. श्री. विजय रविंद्रनाथ काबरा, ४, आनंदबन हौसिंग सोसायटी, वखारीजवळ, पिंप्राळा, जळगांव.
२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, केमिस्ट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., २१५, गोलानी मार्केट, पहिला मजला, जळगांव- ४२५ ००१.
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७६

निर्णय दिनांक २८-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर,<br>संपादक - सह्यादीचा आवाज,<br>कार्यालय - 'पांडव निवास', दत्त मंदिराजवळ, टिळक नगर,<br>सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अर्धवट दिली गेली आणि जन अपिलीय अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क वसूल केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील तळणी गावाजवळ बांधकाम करण्यात आलेल्या नळकंडी पुलाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अंदाजपत्रक, निविदा प्रारुप, तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, निविदा मंजुरीचे पत्र, कामावर वापरण्यात आलेले साहित्य खडी, सिमेंट, दगड, वाळू व कच या साहित्य खरेदीच्या देयकाची प्रमाणित नकला - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००७ ते १५-०१-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६२ इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले व चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल करुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १३-०३-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६२ इतके जन माहिती अधिकारी यांच्याकडे ८२२६५२९ या क्रमांकाच्या पावतीने भरले व त्यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील

अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्या सहायकाने दिनांक २९-०४-२००८ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट माहिती देण्यात आली असून त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील तळणी पुलाच्या बांधकामावर वापरण्यात आलेली खडी, सिमेंट, दगड, वाळू व कच या साहित्याच्या खरेदीच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो पुरविण्यात आलेल्या नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क रुपये १६२ इतके स्वीकारले तसेच या बांधकामाच्या दर्जाबाबत ते साशंक आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०५-२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या बांधकामाच्या साहित्याचे देयके त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमा-

तील तरतुदीशी सुसंगत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत व योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६२ इतके त्यांना भरण्याचे सांगितले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अद्यापपर्यंत अपिलार्थीस प्राप्त न झालेल्या खडी, सिमेंट, दगड, वाळू व कच या साहित्याच्या खरेदी इत्यादीच्या बिलाबाबत असे नमूद करण्यात येत आहे की, अपिलार्थीने ज्या बांधकामाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती ते बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित ठेकेदारांना उक्त दराने दिले होते. या पध्दतीने एखाद्या बांधकामाची एकूण रक्कम संबंधित कंत्राटदारास त्यातील समाविष्ट बाबींच्या परिमाणानुसार व मान्यताप्राप्त दराने अदा केली जाते. या पध्दतीमध्ये कंत्राटदाराकडून त्यांनी बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची बिले घेणे आणि ती सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांनी स्वतः जतन करुन ठेवणे अशा प्रकारची कार्यपध्दती महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागामधील सार्वजनिक बांधकाम संहितेमध्ये प्रचलीत नाही. त्यामुळे अपिलार्थीने जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात उपलब्ध असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे व जी माहिती इतर सार्वजनिक प्राधिकरणाकडून हस्तगत करुन घेऊ शकतात या शिवाय इतर माहिती देण्याची तरतूद नाही. अपिलार्थीने ज्या कंत्राटदाराकडील बांधकाम साहित्याच्या बिलाची अपेक्षा केली आहे तो कंत्राटदार हे सार्वजनिक प्राधिकरण नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोग मान्य करत आहे व त्याचबरोबर असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६२ इतके भरण्याचे आवश्यक त्या तपशीलासह सूचित केले आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १३-०३-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केलेला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ मधील ७ (१) व ७ (३) ची तरतूद पाहता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी दिनांक २३-०३-२००८ रोजी व्यपगत होत होता. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अनुज्ञेय कालावधीपेक्षा अंदाजे दोन महिने इतक्या विलंबाने, अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही, दिनांक २३-०५-२००८ रोजी माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी घेतलेला कालावधी हा अधिनियमातील सशुल्क माहिती देण्याच्या अनुज्ञेय कालावधीपेक्षा जास्त असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये १६२ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावामुळे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य शिस्तभंग कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १६२ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, संपादक - सह्यादीचा आवाज, कार्यालय - 'पांडव निवास', दत्त मंदिराजवळ, टिळक नगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७७

निर्णय दिनांक २८-१०-२००९

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, : अपिलार्थी
गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय उप आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा प्रकल्प अधिकारी (नपाप्र), जिल्हा नागरी विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, " जिल्हाधिकारी, परभणी यांनी सन २००० ते २००८ या कालावधीत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती, व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ च्या कलम ३०८ नुसार सेलू नगरपरिषदेचे किती ठराव रद्द केले त्याची माहिती व सेलू नगरपरिषदेने दिनांक ०४ सप्टेंबर ०२ चा ठराव क्रमांक १५५ मान्यतेसाठी पाठविला होता का, पाठविला असल्यास ठरावाची प्रत, या प्रकरणी या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशाची प्रमाणित प्रत" ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार विभागीय उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २४-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यावेळी या प्रकरणी ते प्रथम अपिलीय अधिकारी नसल्यामुळे त्यांनी दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे अपिलार्थीचे प्रथम अपील वर्ग केले. अपर जिल्हाधिकारी, परभणी तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ३१-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहितीसाठीचा प्रथम अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे केला असल्यामुळे त्यांना जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून माहिती प्राप्त होणे आवश्यक आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने

त्यांना माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कार्यवाही करण्यात यावी व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी, अशीही त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच रुजू झाले असून अपिलार्थीने ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती त्यावेळी श्री. व्यंकट निलावड हे अधिकारी (सध्या मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय परभणी या पदावर कार्यरत) या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद का दिला नाही याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, ते अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी " ............................ ठराव क्रमांक १५५ मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला होता का," या भागाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून जिल्हाधिकारी, परभणी यांनी सन २००० ते २००८ या कालावधीमध्ये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती, व औद्योगिक नगरे, अधिनियम १९६५ च्या कलम ३०८ नुसार त्यांनी सेलू नगरपरिषदेच्या रद्द केलेल्या ठरावांची संख्या व संबंधीत आदेशाची व ठरावाची प्रत आणि सेलू नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या दिनांक ०४-०९-०२ मधील ठराव क्रमांक १५५ ची प्रत एवढीच माहिती देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले आहे की, अद्यापपावेतो सेलू नगरपरिषदेच्या दिनांक ०४-०९-२००२ च्या ठराव क्रमांक १५५ ला जिल्हाधिकारी, परभणी यांनी मान्यता दिलेली नाही.

अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ प्रमाणे जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहिती मागितली असल्याने जिल्हाधिकारी, परभणी यांनी ती माहिती अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे. अपिलार्थीचे या संदर्भात अधिनियमातील कलम ५ कडे लक्ष वेधून घेण्यात येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हा प्रकल्प अधिकारी (नपाप्र) यांची अधिनियमातील कलम ५ (१) च्या तरतुदीप्रमाणे सक्षम प्राधिकरणाने नियुक्ती केली असल्याने अपिलार्थीने जरी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला असला तरी अपिलार्थीस ती माहिती या प्रकरणाच्या संदर्भात नेमणूक केलेले जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी यांच्याकडूनच प्राप्त होऊ शकेल. या प्रकरणी असेही आढळून आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे देखील त्यांनी कोणतीही कार्यवाही न करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले आहे. मूळात अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००८ ते आजपर्यंतच्या दीर्घ कालावधीकरिता अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवण्याचे कोणतेही कारण समर्थनीय असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. अशा प्रकारे उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. निलावड यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अधिनियमातील कलम २० (२) नुसार करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील परिच्छेछामध्ये स्पष्ट

केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. नीलावाड) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी (नपाप्र), जिल्हा नागरी विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. व्यंकट नीलावाड, मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७८

निर्णय दिनांक २८-१०-२००९

१ श्री. पंजाब चिंतामण मोकासे, : अपिलार्थी

"माँकृपा," व्यंकटेशनगर, डॉ. राठोड हॉस्पिटलमागे,

मंठा-औरंगाबाद बायपास रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील वक्फ बोर्डाच्या मिळकतीच्या संदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वक्फ अधिनियम १९९५ कलम ५ (२) नुसार दिनांक ३१-०३-२००७ रोजी कन्नड तालुक्यातील वक्फची यादी नमुना "ब" चा उतारा, नियम क्रमांक १२ (१) (चार) अन्वये नमुना - म (४) चा उतारा फक्त कन्नड तालुक्याअंतर्गत व कलम ३७ अन्वये दिनांक ३१-०३-२००७ रोजी अस्तित्वात असलेल्या कन्नड तालुक्यातील वक्फ मिळकतीच्या यादीचा उतारा - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही परंतु अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या औरंगाबाद येथील कार्यालयातील नोंदणी विभागात असल्यामुळे दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे त्यांनी नोंदणी विभागाची ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून मागविली. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे श्री. सैय्यद फैज या तत्कालीन जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर संबंधितांनी त्यांच्या कार्यालयातील नोंदणी विभागाकडे दिनांक १७-०४-२००८, दिनांक १४-०५-२००८ रोजीच्या स्मरणपत्राव्दारे पाठपुरावा केल्यानंतर नोंदणी विभागाने दिनांक २९-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना काही माहिती पुरविली. ती माहिती जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिनांक ३१-०५-२००८ रोजी जशीच्या तशी पाठवून दिली. तथापि प्राप्त

माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा अर्ज केला होता त्यावेळी श्री. सैय्यद फैज सय्यद गौस नावाचे अधिकारी या पदावर कार्यरत होते. सध्या ते पुणे येथे वक्फ बोर्डात कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील रेकॉर्ड सेक्शनमध्ये उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील नोंदणी शाखा व रेकॉर्ड सेक्शन यांच्याकडे उपलब्ध आहे. तथापि या शाखेसाठी स्वतंत्र जन माहिती अधिका-याची नेमणूक केली आहे किंवा कसे हे आयोगास उपस्थित जन माहिती अधिकारी स्पष्ट करु शकले नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या कथित माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात त्यांना असे कळविले आहे की, अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती ते वक्फ बोर्डाच्या अभिलेख कक्षाकडून प्राप्त करु शकतात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नियम १२ (१ )(चार) अन्वये नमुना - म (४) चा उतारा ही माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ अन्वये द्यावयाची माहिती पुरविली आहे, जी अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीशी पूर्णपणे विसंगत आहे. आणि मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत कन्नड तालुक्यातील वक्फ मिळकतीच्या यादीचा उतारा अपिलार्थीस देण्याऐवजी कन्नड तालुक्यामध्ये वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार फक्त एकाच वक्फ संस्थेची नोंद झालेली आहे असे अपिलार्थीस कळविले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त अपुरी माहितीच दिली नाही तर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ च्या संदर्भात पूर्णतः दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. आयोगास पुढे असेही आढळून आले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०५-२००८ रोजी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती अपिलार्थीस दिली आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडून वक्फ बोर्डाची कार्यप्रणाली अवगत करुन घेतली असता असे दिसून येते की, जिल्हा वक्फ अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील नोंदणी / रेकॉर्ड सेक्शन यांच्यावर अवलंबून राहावे लागते. परंतु या विभागांनी जन माहिती अधिकारी यांना वेळीच माहिती न पुरविल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अर्थात अपिलार्थीस त्यांनी अंतीमतः जी माहिती पुरविली आहे ती देखील अपूर्ण व दिशाभूल करणारी अशी आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण आणि दिशाभूल करणारी माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक कर्मचारी हे सर्वजण एकत्रितपणे जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी आपल्या अशा प्रकारच्या वर्तनाव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद व या

प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील सर्व संबंधित कर्मचारी (रेकॉर्ड व नोंदणी शाखेसह) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, ती कार्यालयातील सर्व संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून अपिलार्थीस पुरविण्यात येणारी माहिती, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याची खात्री करुन घ्यावी व तदनंतर अपिलार्थीस ती माहिती देण्यात यावी असे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचारी (रेकॉर्ड व नोंदणी शाखेसह) यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंजाब चिंतामण मोकासे, "माँकृपा," व्यंकटेशनगर, डॉ. राठोड हॉस्पिटलमागे, मंठा-औरंगाबाद बायपास रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७९

निर्णय दिनांक २८-१०-२००९

१ श्री. पंढरीनाथ देवबा वाघमारे, : अपिलार्थी
मार्फत सहयोगी अधिष्ठाता,
पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी
हिल्स, नागपूर - ०६

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान
विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर - ०६

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने दाखल केलेला प्रथम अपील अर्ज मुदतीत निकाली न काढल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे उप

कुलसचिव आस्थापना या पदावर महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठामध्ये झालेल्या नियुक्ती संदर्भात एकूण ९ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांच्याकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देली नाही व कोणताही निर्णय दिला नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे व जन अपिलीय अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस ही माहिती त्यांनी दिनांक १२-११-२००८ रोजी पुरविली आहे. तथापि अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समाधान झाल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. २८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीस या प्रकरणी त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्णतः संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच त्यांनी तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ देवबा वाघमारे, मार्फत मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर - ०६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर - ०६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८०

निर्णय दिनांक २८-१०-२००९

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
व्दारा- श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स,
कचेरी रोड, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी,
तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अपील अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील संबंधित शाळेच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सन २००३-२००४ या वर्षाच्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाहीत, त्या जन माहिती अधिकारी यांनी देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित वेगवेगळया मुद्दयाव्दारे मोठ्या प्रमाणात व्याप्ती असलेली काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सन २००३-०४ या वर्षाच्या हजेरीपत्रकाच्या प्रतींचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २१८ इतके त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १३-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दिनांक २४-०६-२००८ रोजी विनामूल्य माहिती प्राप्त झाली. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सन २००३-०४ या कालावधीतील हजेरीपटाची प्रत या मुद्दयावरील माहितीचा समावेश नसल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांच्या लेखी विनंतीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक २४-०६-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सन २००३-०४ या कालावधीतील हजेरीपत्रकाच्या प्रती ही माहिती वगळता, उर्वरित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी, अपिलार्थी हे त्यांच्या शाळेच्या सेवेत असतांना त्यांच्याकडे होती. त्यांनी शाळेचे शाळेशी संबंधित बरेच अभिलेखे गहाळ केले असल्यामुळे अपिलार्थीच्या विरुध्द पोलीसात तक्रार दिली आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीस अद्याप द्यावयाची माहिती उपलब्ध नसल्याने ते ही माहिती अपिलार्थीस आता ती सापडल्याशिवाय देऊ शकणार नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थी हे संबंधित शाळेच्या सेवेमध्ये कार्यरत असतांना त्यांच्या हातून जी कथित कागदपत्रे गहाळ झाली असल्याचे जन माहिती अधिकारी स्पष्ट करीत आहेत त्याच कागदपत्रांची मागणी ते आता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित शाळेचे मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करत आहेत. या प्रकरणी मुख्याध्यापक यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस अद्याप द्यावयाच्या राहिलेल्या माहितीसंदर्भात ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती त्यांच्यावर प्रशासकीय अथवा फौजदारी कार्यवाही करावी व

त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत कळवावे व संबंधित माहिती याच कालावधीमध्ये अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी व अपिलार्थीस उर्वरित माहिती याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, व्दारा- श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स, कचेरी रोड, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८१

निर्णय दिनांक २८-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नारायण ग्यानबा बापमारे,<br>मु. पो.मंगरुळ नं. १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,<br>माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे व त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशीही विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती

त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व ही माहिती त्यांना विहित मुदतीत न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ ते अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या दिनांकापर्यंतची व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबधितांकडून मागविली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व संबंधितांकडून माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस देण्याचे त्यांना आश्वासीत केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेता सदर अपील अर्ज त्यांच्याकडे विना कार्यवाही तसाच प्रलंबीत ठेवला. परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आणि व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत या पार्श्वभूमिवर आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील

अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु. पो.मंगरुळ नं. १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८२
निर्णय दिनांकः २८-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. कचरुमल बस्तीमल जैन,<br>रा. बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे आजतागायतही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्याचे आदेशित करुनही त्यांना वेळीच माहिती न पुरविल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यात यावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जो जन माहिती

अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. ०२.०४.२००८ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०१.२००३ रोजी टोकन क्र. १२ अन्वये लोकशाही दिनाच्या दिवशी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात केलेल्या चौकशी अहवालाची प्रत व अपिलार्थीने दि. ०२.०८.२००४, २५.०८.२००४ व ०५.०७.२००४ आणि दि. २४.०२.२००६ या तारखांना दिलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही -अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. १२.०५.२००८ रोजी सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०५.२००८ रोजी माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०७.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अनुमान काढून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात त्यांनी दि. ०६.०१.२००३ रोजी लोकशाही दिनी अर्ज सादर केला असला तरी,

अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भातील माहिती त्यांना देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या विविध अर्जांवर त्यांनी अपिलार्थीस दि.१३.०५.२००८ रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील निर्देशित केलेल्या दि. ०५.०७.२००४ व ०२.०८.२००४ रोजीच्या अर्जांवर त्यांनी परत अपिलार्थीस माहिती दिली आहे आणि अपिलार्थीचे दि. २५.०८.२००४ व २४.०२.२००६ रोजीचे अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झालेले नसल्यामुळे अपिलार्थीस ते माहिती देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०२.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०५.०७.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात मुद्देनिहाय ऊहापोह केला आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क व विहित मुदतीत माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगास, त्यांच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाचे अवलोकन व्हावे, अशी विनंती केली आहे त्याप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयाने अपिलार्थीने केलेल्या वेगवेगळया अर्जावर काय कारवाई केली आहे, हे त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीवरुन समजून येत नाही. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये झालेल्या कार्यवाहीविषयी माहिती मागितली असल्यास संबंधित प्रकरणाच्या अनुषंगाने त्यांनी वेगवेगळया प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे सर्वसाधारणपणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रत्येक अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली आहे, हे अपिलार्थीस वेगळया स्पष्टीकरणात्मक पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी कळविणे मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज अपिलार्थी उपस्थित नाहीत. त्यामुळे निश्चितपणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या मुद्यावर व काय कार्यवाही अपेक्षित आहे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. या कारणास्तव अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०७.२००८ रोजी दिलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो व परिणामी अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. कचरुमल बस्तीमल जैन,रा.शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड, ता.जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८३
निर्णय दिनांक: २८-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रामराव नारायण कवडे,<br>रा. आष्टा, ता.भूम, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. माणकेश्वर व वंजारवाडी सर्कल मधील रेशन दुकानाच्या संदर्भात सन २००६ ते दि. २४.०६.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौ. माणकेश्वर व वंजारवाडी सर्कल मधील रेशन दुकानदारांनी मार्च, २००६ ते मार्च २००७ या कालावधीमध्ये कोणास, किती लिटर रॉकेल वितरण

केले याबाबत लोकांच्या सह्या व अंगठे असलेल्या रजिस्टरची नक्कल आणि दोन्ही सर्कलला मार्च, २००६ ते मार्च, २००७ या कालावधीमध्ये एकूण किती लिटर रॉकेल वितरण झाले आहे, त्याबाबतचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसात माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही.

अपिलार्थीने आयोगास त्यांच्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज आणि जन अपिलीय यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दि. २९.०८.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाव्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे आयोगास सादर केली नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हस्तगत करण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अपिलार्थीचे आहे. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्त्व योग्यरित्या पार पडले आहे किंवा कसे तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर आजपर्यंतच्या कालावधीमध्ये अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी कळण्यास मार्ग नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती  जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असावी किंवा ही माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये अपिलार्थीस आता स्वारस्य उरले नसावे, असे अनुमान काढून अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य  असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. रामराव नारायण कवडे,रा. आष्टा, ता.भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८४
निर्णय दिनांकः २८-१०-२००९

१. श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी
रा. मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रावणबाळ, वृध्दापकाळ, संजय गांधी निराधार व इंदिरा गांधी भूमीहीन शेतमजूर या योजनांच्या लाभार्थ्यांची यादी व सदर लाभार्थी केव्हापासून लाभ घेत आहेत, याची माहिती मागितली होती. याच माहितीबरोबर अपिलार्थीने उमरगा तालुक्यातील गॅस धारक

एजन्सीची एकूण संख्या व त्यांच्या लायसन्सची झेरॉक्स प्रत आणि त्यांना दि. २९.०३.२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अपूर्ण प्राप्त झाल्याचे नमूद करुन संबंधित माहिती पूर्ण स्वरुपात द्यावी, अशी विनंती केली आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे निश्चितपणे कोणता प्रतिसाद दिला हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. या संदर्भात आज रोजी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगास चुकीची कागदपत्रे सादर केली आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०६.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०६.२००८ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २२.०४ व २४.०६.२००८ रोजी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.०३.२००८ रोजीच्या वेगळया अर्जाच्या संदर्भात असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अपिलार्थीस दि. २२.०४ व २४.०६.२००८ रोजी माहिती दिली हा युक्तिवाद, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने ज्या योजनांशी संबंधित लाभार्थ्यांच्या यादीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे त्या योजनांच्या अंमलबजावणीचे नियमित स्वरुप पाहता दरवर्षी या लाभार्थ्यांच्या संख्येत व नावात बदल होणे स्वाभाविक असते. त्यामुळे याप्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, त्या कालावधीचा उल्लेख करणे गरजेचे होते. तसेच अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, याचा खुलासा त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही किंवा सदरचा खुलासा त्यांनी कोणत्याही वेगळया पत्राद्वारे आयोगास केला असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थी हे आयोगासमोर त्यांच्या या मुद्याचे समर्थन करण्यासाठी उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील, विशेषत: जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३०.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील निर्णयाचे अवलोकन करता व अपिलार्थीने त्यांच्याकडे माहिती मिळाली असल्याचे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे कबूल केल्याने, फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादाच्या वेळी आयोगास चुकीच्या संदर्भाची कागदपत्रे सादर केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे

सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी यापुढे आयोगासमोर सुनावणीस येताना संबंधित प्रकरणाशी संबंधित कागदपत्रांचा अभ्यास करुन स्वतःचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर करुन मगच सुनावणीस उपस्थित राहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, मु.पो.मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८५
निर्णय दिनांकः २८-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. स. नुरअली स. बाखर अली,<br>रा. अर्धापूर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील<br>कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड.<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याने व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माहे सप्टेंबर २००७ मध्ये मुदखेड येथील ३ अर्धघाऊक रॉकेल विक्री परवाने निलंबित केले, या संदर्भात एकूण २ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीचा कालावधी हा सप्टेबर ते ऑक्टोबर, २००७ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०७.२००८ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती तथापि सदरची सुनावणी होऊन यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी काही निर्णय दिला आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन त्यांचा निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, आपला निर्णय पारित करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०५.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. स.नुरअली स.बाखर अली, रा. कुबा कॉलनी, अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८६
निर्णय दिनांकः २८-१०-२००९

१. श्री. जेटेवाड राजेश्वर नागोजी, : अपिलार्थी
रा. बरबडा, ता.नायगाव(खै), जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, नांदेड.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,नायगाव (खै.),जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, नायगाव (खै.), जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.११.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. विचेवाड जयराम यांच्या मौ. बरबडा, ता. नायगाव येथील

घ.नं.३६९ वर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून शासकीय अनुदान दिले आहे काय ? दिले असल्यास दिलेल्या अनुदानाच्या यादीची  छायाप्रत - ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे दि. १७.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्याच दिवशी तहसीलदार, नायगाव यांच्याकडे पाठविला. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने  वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी  उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास, त्यांनी अपिलार्थीस दि. २७.१०.२००९ रोजी ८ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविल्याचे अवगत केले व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीच्या अभिप्रायासह पोचसहीची स्थळप्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. या पत्रावर अपिलार्थीने "माहिती उशिरा मिळाली" असे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

अपिलार्थीस आता जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती मिळाली असली तरीही या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर व प्रथम अपील अर्जावर संबंधित नायब तहसीलदार व तहसीलदार यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, ही वस्तुस्थिती शिल्लक राहत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी तहसील कार्यालयामध्ये ते एकटेच नायब तहसीलदार या पदावर कार्यरत होते. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर कार्यवाही करण्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी ते तहसीलदार, नायगाव या पदावर जानेवारी, २००९ पासून रुजू

झाले असून अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या निदर्शनास न आल्यामुळे ते अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही करु शकले नाहीत, असा युक्तिवाद केला. इत:पर अशाप्रकारचा निरर्थक कालापव्यय होणार नाही व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या माहितीसाठीच्या प्रत्येक अर्जावर आणि प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील विहित कालावधीमध्ये कार्यवाही करण्यात येईल, असे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास आश्वासित केले. या प्रकरणी संबंधितांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर अशा प्रसंगांची पुनरावृत्ती टाळावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, नायगाव यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. जेटेवाड राजेश्वर नागोजी,रा. बरबडा, ता.नायगाव(खै), जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,नायगाव (खै.),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८०९
निर्णय दिनांक: २८-१०-२००९

१. श्री. बाबुराव नागप्पा पडसलगे, : अपिलार्थी
रा. नांदगाव, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००८ रोजी फेरसादर झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जावर निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०६.०९.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित पाणीपुरवठा योजनेसंदर्भात काही माहिती

मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.११.२००६ रोजी अधीक्षक अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु अधीक्षक अभियंता यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व अंतिमतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांना या प्रकरणासंदर्भात कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. २५.११.२००६ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, लातूर यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिला नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये फक्त जन अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती उपलब्ध आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन त्यांचे निर्णय देणे योग्य राहील, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २५.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे

आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२५.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. बाबुराव नागप्पा पडसलगे, मु.पो. नंदगाव, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,

लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२८
निर्णय दिनांक २८-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.नरेंद्र बारकु चौधरी,<br>धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक, चिंतामणी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,बाफना मार्केट, तळमजला, राणा प्रताप चौक,मनपासमोर,धुळे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०३.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. अतुल चंद्रसेन संन्नासि उपस्थित आहेत.

सदरच्या सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २८.१०.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे अपील क्र.२८२८/०७ हे रद्द करुन निकाली काढण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडील विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्याने, त्यांची विनंती मान्य करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २८२८/०७, दि.०५.०३.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.नरेंद्र बारकु चौधरी, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर,धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, चिंतामणी नागरी सहकारी पतसंस्था,मर्यादित बाफना मार्केट, तळमजला राणा प्रताप चौक,मनपा समोर,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,म.रा.,ससुन हॉस्पीटलसमोर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९

निर्णय दिनांक २८/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ व्यवस्थापक,<br>राजे शिवाजी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था<br>मर्यादित, कान्हुर पठार, ता.पारनेर, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २८.१०.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी श्री. मधुकर तुकाराम साळवे, रा. उल्हासनगर, ठाणे यांनी दिनांक ०३.०२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, राजे शिवाजी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.साळवे यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २५.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी दि. २९.०४.२००९ रोजी निर्णय देऊन, श्री.साळवे यांचे अपील अंशतः मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, राजे

शिवाजी ग्रामिण बिगरशेती पतसंस्था मर्यादित यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. श्री. मधुकर तुकाराम साळवे गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस आता श्री. मधुकर तुकाराम साळवे यांच्या दि. ०३.०२.२००९ रोजी अर्जाव्दारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविणे बंधनकारक असणार नाही.

सबब वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा उपनिबंधक अहमदनगर यांनी या संदर्भात दि. २९.०४.२००९ रोजी दिलेला आदेश अधीक्रमीत करुन अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. ९९/०९ मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मधुकर तुकाराम साळवे, ए-३६० ब्लॉकच्या मागे, कुर्ला कॅम्प, नं.४, उल्हासनगर, जि.ठाणे.

२. व्यवस्थापक, राजे शिवाजी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कान्हुर पठार, ता.पारनेर, जि.अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६
निर्णय दिनांक २८/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु.,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १५.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड
२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७
निर्णय दिनांक २८/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु.,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १५.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)  अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :     २८/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८
निर्णय दिनांक २८/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कक्ष अधिकारी,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण संचालक (प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड
२) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९
निर्णय दिनांक २८/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. एस.पी.नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड | | |

**निर्णय**

सौ. एस.पी.नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २७.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०५.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ.एस.पी.नैण, व्दारा- मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०
निर्णय दिनांक २८/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार महसूल), तहसील कार्यालय, कंधार, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जि.नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०३.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कंधार, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४३
निर्णय दिनांक २८/१०/२००९

१ श्री. ऋषिनाथ नरहरी पाटील, : अपिलार्थी
रा.अरणगांव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

श्री. ऋषिनाथ नरहरी पाटील यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३१.०८.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक ०५.१२.२००७ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १५.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन, तीन दिवसामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४ महिने १ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ऋषिनाथ नरहरी पाटील, मु.पो.अरणगांव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४५
निर्णय दिनांक २८/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>पोलिस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५.०७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०७.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २०.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५ महिने व १६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या

विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा, विश्वास नगर, लेबर कॉलनी, फ्लॅट नं. एस.आर.टी. १९, हनुमान मंदिराजवळ, औरंगाबाद- ४३१ ००१.
२. जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, मिल कॉर्नर, औरंगाबाद
३. जन अपिलीय अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, मिल कॉर्नर, औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६६९/०८, १६७०/०८ व १६७१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६६९, १६७० व १६७१

निर्णय दिनांक २९-१०-२००९

१ श्री. दिगंबर कोंडीबा भोसले, : अपिलार्थी
व्दारा दवाखाना, भगवती चौक, स्वामी समर्थ मंदिराच्या
शेजारी, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

अपील क्रमांक १६६९/२००८

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

अपील क्रमांक १६७०/२००८

२ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू,

तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू,

तालुका सेलू, जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

अपील क्रमांक १६७१/२००८

१ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पाथरी,

तालुका पाथरी, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पाथरी,

तालुका पाथरी, जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१०-२००८ रोजी नोंदविलेले तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जाशी संबंधित माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे अपिलार्थीने सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकाच कालावधीतील एकसारखीच माहिती मागितली असल्याने या तीनही अपील अर्जांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे. या तीन अपील अर्जापैकी मंडळ कृषि अधिकारी, सेलू व पाथरी यांनी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीस दिनांक २२-१०-२००८, दिनांक २०-१०-२००८ रोजी अनुक्रमे सेलू व पाथरी कार्यालयाशी संबंधित माहिती प्राप्त झाली असल्याचे व त्यांची याबाबत काही तक्रार नसल्याचे तालुका कृषि अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवेदन आयोगास सादर केले आहे. त्यामुळे अपील क्रमांक १६७०/२००८ व १६७१/२००८ निकाली काढण्यात येत आहेत.

अपील क्रमांक १६६९/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एप्रिल २००६ ते मार्च २००८ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयातर्फे रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या जलसंधारणाच्या व मानव विकास मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या सिमेंट नाला बांध व माती नाला बांधाची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गावाचे नांव, गट क्रमांक, मंजूर रक्कम, खर्च रक्कम, मंजुर पाणीसाठा व प्रत्यक्षात असलेला पाणीसाठा - या मुद्दयांचा समावेश होता. रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात अपिलार्थीने या मुद्दयाशिवाय जन माहिती अधिकारी यांच्याकडे मजूरी वाटपाच्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती व मोजमाप पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १२-०९-२००८ रोजी सुनावणी

ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील खारीज केले. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर त्यांना तालुका कृषि अधिकारी, सेलू व पाथरी यांनी माहिती दिली असल्याने व प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याने तसेच या दोनही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीचा दिनांक ०५-०६-२००८ रोजीचा अर्ज जो त्यांच्याकडे प्रत्यक्षतः दिनांक १२-०६-२००८ रोजी प्राप्त झाला होता त्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असल्याने ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र नाहीत.

वरील तीनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक १६६९/०८ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. अपील क्रमांक १६७०/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत व अपील क्रमांक १६७१/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत. या तीनही अपील प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांच्या प्रतिनिधीस अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी न दिलेल्या प्रतिसादाबाबत कोणतेही समर्थन आयोगासमोर करता आले नाही. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती तीन आठवड्याच्या आत ते देऊ शकतील असे त्यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांचे प्रतिनिधी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या मूळ

अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस २० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता, तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तालुका कृषि अधिकारी जिंतूर कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, जिंतूर श्री आर. एम. ईघारे यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त (कृषि), पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक १६६९/२००८ मान्य करण्यात येत आहे. अपील क्रमांक १६७०/२००८ व १६७१/२००८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १६६९/२००८ मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १६७०/२००८व १६७१/२००८ खारीज करण्यात येत आहेत.

३. तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. आयुक्त (कृषि) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, जिंतूर श्री आर. एम. ईघारे यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिगंबर कोंडीबा भोसले, व्दारा दवाखाना भगवती चौक, स्वामी समर्थ मंदिराच्या शेजारी, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६७२/२००८ व १६७३/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६७२ व १६७३

निर्णय दिनांक २९-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. युसूफ खान हनिफ खान,<br>प्लॉट नं. ६७, आजम कॉलनी, दर्गा रोड, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

**अपील क्रमांक १६७२/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना चटोपाध्याय श्रेणी लागू करण्याकरिता त्यांच्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी, चटोपाध्याय श्रेणी त्यांना लागू करण्यासंदर्भात दिनांक २७-१२-२००७ रोजी दिलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००८ रोजी निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर एक आठवड्याच्या आत निर्णय घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आता दिनांक २३-१०-२००९ रोजी माहिती पुरविली असून ही माहिती दिशाभूल करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या तक्रारीचे निवारण करण्याचे काम हे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाचे असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या अर्जावर मुख्याध्यापक, डॉ. झाकिर हुसेन

प्राथमिक शाळा, पालम यांना कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत दिनांक १०-०३-२००८ रोजी सूचना दिलेल्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "व्यक्तिशः" माहितीची मागणी केल्यानंतर मूळ अर्जातील माहितीच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधणे त्यांना अनिवार्य आहे. यासंदर्भात अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, ते दर आठवड्याला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जात होते परंतु त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ आयोगाने अपिलार्थीकडे पुराव्याची मागणी केल्यानंतर अपिलार्थी असा पुरावा सादर करु शकले नाहीत.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराच्या एखाद्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही जर अर्जदारास उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास त्यांच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या दिनांकापर्यंत त्यांनी संदर्भीत प्रकरणाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या अर्जासंदर्भात त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती अर्जदारास देणे भाग आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती या परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही व्यक्तिशः मागितली

असल्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून याच कालावधीमध्ये व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी लागेल, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**<u>अपील क्रमांक १६७३/२००८</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाच्या संदर्भात दिलेल्या निर्णयाचे जन माहिती अधिकारी यांनी पालन न केल्यामुळे आणि त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे परभणी एज्युकेशन सोसायटी अंतर्गत असलेल्या डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळांतील पदवीधर शिक्षक व प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत बदली झालेल्या शिक्षकांच्या संदर्भात सन १९८० ते २००७ या २७ वर्षाच्या कालावधीतील काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळा परभणी, पालम, पूर्णा, सेलू, गंगाखेड, सोनपेठ व जिंतूर या शाळेमधील शिक्षकांच्या संदर्भात अपिलार्थीने विहित केलेल्या तक्त्यामध्ये मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून ही माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांना जास्त वेळ लागला व त्रास झाला. त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे परंतु ते ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे संबंधित शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संदर्भातील काही मुद्दयावरील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असेलही परंतु अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा सारांश लक्षात

घेता, ही माहिती त्यांच्याकडील अभिलेख्यामधून अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे जिकरीचे आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने अपिलार्थीने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून ही माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्यांनी विशेष प्रयत्न करुन त्यांच्या दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागितलेली माहिती बहुतांशी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस आता फक्त परभणी व सोनपेठ येथील डॉ. झाकिर हुसने प्राथमिक शाळा संदर्भातील माहिती द्यावयाची बाकी आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती व्यक्तिशः मागितली आहे. शिक्षण विभागाच्या संदर्भात कोठल्याही शाळेशी संबंधित माहिती देण्याकरिता संबंधित शाळा हे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे संबंधित शाळांचे मुख्याध्यापक यांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहे, हे पाहता, अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेली माहिती संबंधित मुख्याध्यापकांकडे अर्ज करुन घेण्याऐवजी त्यांनी ती शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे मागितली. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणतात त्याप्रमाणे या शाळा शिक्षकांच्या नेमणुकीस व पदोन्नतीस त्यांच्या कार्यालयाकडून मान्यता प्राप्त करुन घेत असतात. जन माहिती अधिकारी यांच्या अधिपत्याखालील शाळांची प्रचंड संख्या पाहिल्यास या शाळेतील सर्व शिक्षकांच्या संबंधातील अपिलार्थीने मागणी केलेल्या सर्व मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकत्रित स्वरुपात सहज उपलब्ध असणे शक्य नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार, त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत संबंधितांकडे पाठवून त्या पत्रांच्या प्रती अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती केलेली नाही. आज त्यांनी

आयोगासमोर प्राथमिक विद्यालय, परभणी व सोनपेठ या शाळांच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची तजवीज करावी. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून याच कालावधीमध्ये व्यक्तिशः प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची तजवीज करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. युसूफ खान हनिफ खान, प्लॉट नं. ६७, आजम कॉलनी, दर्गा रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक १६७४/०८ व १६७५/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६७४ व १६७५

निर्णय दिनांक २९-१०-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, : अपिलार्थी

रा. आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १६७४/२००८

जन माहिती अधिकारी

तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना,

ग्रामपंचायत कार्यालय, निलेगांव, तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

२ अपील क्रमांक १६७५/२००८

जन माहिती अधिकारी

तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना,

ग्रामपंचायत कार्यालय, गोंधळवाडी, तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

३ अपील क्रमांक १६७४/०८ व १६७५/०८ : प्रतिवादी

जन अपिलीय अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद उपविभाग तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी दाखल केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले क्रमांक १६७४/२००८ व १६७५/२००८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना संबंधितांकडून माहिती देण्यात आली नाही, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची दखल घेतली गेली नाही, मुदत संपली तरीही माहिती दिली नाही, माहिती देण्यास टाळाटाळ केली, त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, निलेगांव व गोंधळवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे भारत निर्माण योजनेअंतर्गत कार्यान्वित करण्यात येत असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेसंदर्भात सन २००६ ते दि. ०४-०७-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण १० मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने ज्या योजनेच्या संदर्भात माहिती मागितली आहे त्या योजनेचे वैशिष्ट्य असे आहे की, सदर योजना दहा टक्के लोकवर्गणी व उर्वरित रक्कम शासन सहाय्य या स्वरुपात राबविली जाते. ही योजना गावातील नागरिकांच्या सहभागातून राबविली जात असते. या योजनेची पूर्ण अंमलबजावणी ही संबंधित गावातील पाणीपुरवठा योजना समितीमार्फत केली जाते. या समितीचे अध्यक्ष व सचिव हे दोघेही खाजगी व्यक्ती आहेत. या समितीवर फक्त तांत्रिक नियंत्रण जिल्हा परिषदेच्या उप अभियंता यांचे असते. ती योजना कशा प्रकारे पूर्ण करावयाची व

इतर अनुषंगिक अंमलबजावणीसंबंधातील नियंत्रण पाणी पुरवठा समितीमार्फत, जी पूर्णतः खाजगी व्यक्तिची आहे अशा समितीमार्फत केले जाते. या योजनेची संबंधित माहिती ही शासनाकडे किंवा कोणत्याही अधिका-याकडे जतन करुन ठेवली जात नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रत्येक गावातील पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष व सचिव यांच्याकडे असते. या संदर्भात माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी त्यांच्या दिनांक ०१-०६-२००९ रोजीच्या आदेशान्वये जो अपिलार्थीने मूळ अर्ज केल्याच्या दिनांकानंतर पारित केला गेला आहे त्याद्वारे केली आहे. या आदेशामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी ग्रामीण स्तरावरील माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता संबंधित गावाचे ग्रामसेवक हे माहिती अधिकारी व तालुक्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले आहे, हे पाहता अपिलार्थीस आता असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी आता संबंधित गावाच्या ग्रामसेवकाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करावा व जर त्यांचे प्राप्त माहितीवर काही आक्षेप असतील किंवा माहिती मिळाली नसेल तर त्यांनी संबंधित अपिलीय प्राधिकरणाकडे व तदनंतर राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे अधिनियमातील कलम १९ (१) व १९ (३) नुसार अपील करावे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी निलेगाव पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात संबंधित पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष / सचिव आयोगासमोर उपस्थित नाहीत. गोंधळवाडी पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक २३-०९-२००८ रोजी पुरविल्याचे आयोगास अवगत केले. या माहितीत कामावर देखरेख व नियंत्रण अहवाल या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस त्यावेळी द्यावयाची राहिली होती असेही त्यांनी आयोगास अवगत केले. त्यांना ही माहिती त्यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे सूचित करण्यात आले आहे. ग्रामीण पाणीपुरवठा योजना निलेगांव संदर्भात अपिलार्थीस त्यांना वरील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आयोग सूचित करत आहे.

मूळात या प्रकरणी अपिलार्थीने ज्या प्राधिकरणांकडे माहिती मागितली आहे ते अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्थाने सार्वजनिक प्राधिकरण होत नसल्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर विचार करण्याचे आयोगास कोणतीही प्रयोजन आढळून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले क्रमांक १६७४/२००८ व १६७५/२००८ निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १६७४/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १६७५/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, रा. आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत

कार्यालय, गोंधळवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद उपविभाग तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६७६/०८ व १६७७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६७६ व १६७७
निर्णय दिनांकः २९-१०-२००९

१. श्री. जोतीबा लिंबाजी पवार, : अपिलार्थी
रा. सिंदफळ, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. **अपील क्र.१६७६/०८**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद :प्रतिवादी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी :
सहायक अभियंता श्रेणी-१,
जिल्हा परिषद उपविभाग
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. **अपील क्र.१६७७/०८**

जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी एकाच अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.१०.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र. १६७६/०८** :-

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामांसंदर्भात काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागविली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०८.२००८ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१०.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात दि. ०६.११.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. सदर सुनावणी पूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी गट विकास अधिकारी, तुळजापूर यांच्याकडे अपिलार्थीच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता, अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेल्या प्रमाणपत्रामध्ये त्यांचे नाव दारिद्रयरेषेखालील व्यक्तींच्या यादीत ५२ क्रमांकावर असल्याचे नमूद केले होते तथापि गट विकास अधिकारी यांनी तपासणी केल्यानंतर या क्रमांकावर श्री. गायकवाड या व्यक्तीचे नाव

असल्याचे आढळून आल्याने अपिलार्थीचे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत सादर केलेले दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र अवैध ठरते. तथापि एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस दि. १८.०९.२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पोस्टाने पाठविली. यासंदर्भातील पुरावा त्यांनी आयोगास सादर केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्रावर श्री. लिंबाजी बापू पवार या व्यक्तीचे नाव आहे. अपिलार्थीचे नाव जोतीबा लिंबाजी पवार असे आहे, यावरुन अपिलार्थी हे स्वतः दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याचा बोध होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दारिद्रयरेषेखालील व्यक्तीस अर्ज करावयाचा झाल्यास त्यांनी त्यांच्या नावाचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र सादर करावे अथवा यासंदर्भातील वैध पुरावा प्रथम अर्जासोबत जोडणे त्यांना अनिवार्य आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे गट विकास अधिकारी, तुळजापूर यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २०.१०.२००८ रोजी कळविलेल्या पत्राप्रमाणे अपिलार्थीचे दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर, त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्जच अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने, विचार करण्याचे कोणतेही वेगळे प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>अपील क्र. १६७७/०८ :</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.१८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जावर व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०८.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही कार्यवाही झालेली नाही. मात्र तदनंतरअपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील क्र.१६७६/०८ च्या संदर्भात निर्णय देताना आयोगास असे आढळून येते की, अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रमाणपत्रामधील नावामध्ये फरक आहे. या संदर्भात आयोगाने अपिलार्थीच्या अपील क्र. १६७६/०८ वर निर्णय देताना पुरेसे भाष्य केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र त्यांच्या वरील अर्जाच्या प्रतीसोबत जोडलेले नाही, असे दिसून येत आहे.

अपील क्र. १६७६/०८ व १६७७/०८ मधील अपिलार्थी हे एकच व्यक्ती असल्याचे गृहित धरण्यात येऊन विशेषतः सुनावणीसाठी कोणीही संबंधित (अपील क्र. १६७७/०८ च्या संदर्भात)उपस्थित न राहिल्यामुळे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीचे

विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. जोतीबा लिंबाजी पवार, मु.पो. सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१,जिल्हा परिषद उपविभाग तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६७८
निर्णय दिनांकः २९-१०-२००९

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर. : अपिलार्थी
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,
श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी
महाविद्यालय,तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,
जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न देता चुकीचा पत्रव्यवहार करण्यात आला, त्यांच्या अपील अर्जावर सुनावणी घेण्यात आली नाही आणि त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर या महाविद्यालयात

मॅनेजमेंट कोटयातील सर्व शाखेतील झालेल्या प्रवेशाच्या संदर्भात काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३६/- इतके भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस दि. १८.०९.२००८ रोजी प्राप्त झाले. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ३०.०९.२००८ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की,अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क पाठविण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलबध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे न भरल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील सादर केले आहे. माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक अर्जदारास, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्यास, आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी हे ज्याप्रमाणे सूचित करतील, त्याप्रमाणे करणे अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरुन त्यांचे वैधानिक उत्तरदायित्त्व पार पाडल्याचे दिसून येत नाही. या संदर्भातील त्यांचा युक्तिवाद स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास दिसून येत आहे. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर, परमेश्वर वाडा, तुळजापूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६७९
निर्णय दिनांकः २९-१०-२००९

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर. : अपिलार्थी
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तुळजापूर, जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत माहिती न मिळाल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दि. २१.०९.२००८ रोजीचे निवेदन आयोगास सादर केले असून यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना संपूर्णपणे प्राप्त झाली असून याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही.

अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. २१.०९.२००८ रोजीच्या या निवेदनाव्दारे त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याबाबतचे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे कबूलीपत्र लिहून दिले आहे. मात्र यानंतर त्यांनी दि. १२.१०.२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील करुन या अर्जामध्ये त्यांना माहिती पूर्णपणे देण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील निश्चितपणे कोणती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही, हे आयोगासमोर स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच त्यांनी या संदर्भात कोणताही लेखी युक्तिवाद आयोगास सादर केलेला नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर, नळदुर्ग रोड, 'राजगड', जिल्हा मनसे कार्यालय,तुळजापूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८०
निर्णय दिनांकः २९-१०-२००९

१. श्री. शेख शागीर्द अहेमद अब्दुल गफूर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव,
शम्स एज्युकेशन सोसायटी, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा,
धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती शेख बद्रुनिसा अब्बास

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपिली अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांना दिशाभूल करणारे उत्तर प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ माहितीसाठीचा अर्ज सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे दि. २७.०६.२००८ रोजी सादर केली होती व यासंदर्भातील प्रथम अपील अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०८.२००८ रोजी केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर

दि. १०.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज आणि त्यावरील प्रथम अपील अर्ज एकाच सार्वजनिक प्राधिकरणाकडे केलेला नाही.

एका सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधित असणे आवश्यक आहे, या प्रकरणी मूळात सहायक धर्मादाय आयुक्त यांना, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेल्या माहितीवरच व त्यांच्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्दच केलेले प्रथम अपील स्वीकारता येईल. तथापि या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त हे शम्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे अथवा शासन निर्देशाद्वारे नेमणूक केलेले अपिलीय अधिकारी नाहीत. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अर्ज करावा म्हणजे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यास मदत होईल.अशाप्रकारे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रति,

१. श्री. शेख शागीर्द अहेमद अब्दुल गफूर,खाजा नगर गल्ली नं.(१३) उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३
निर्णय दिनांक २९/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ सौ. एस.पी.नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>खुरेशिया उर्दू हायस्कूल, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

सौ.एस.पी.नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिने व २६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, व्दारा-मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खुरेशिया उर्दू हायस्कूल, बारा ईमाम रोड, मनियारगल्ली, नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४
निर्णय दिनांक २९/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. एस.पी.नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>उर्दू हायस्कूल धर्माबाद,<br>ता.धर्माबाद, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

सौ.एस.पी.नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०४.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिने व २६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, व्दारा-मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू हायस्कूल धर्माबाद, ता.धर्माबाद, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५
निर्णय दिनांक २९/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. एस.पी.नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>नॅशनल गर्ल्स उर्दू हायस्कूल,<br>अरबगल्ली, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

सौ.एस.पी.नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०८.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिने व २६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, व्दारा-मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल गर्ल्स उर्दू हायस्कूल, अरबगल्ली, नांदेड
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१
निर्णय दिनांक २९/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर,<br>जि.नांदेड | | |

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झ ालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२
निर्णय दिनांक २९/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा वक्फ अधिकारी,
नांदेड जिल्हा वक्फ कार्यालय, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पानचक्की, औरंगाबाद

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ११ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड जिल्हा वक्फ कार्याला, नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३
निर्णय दिनांक २९/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
लातूर विभाग, लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक (प्राथमिक),
लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झ ालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०८.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ११ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :    २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, म.गांधी पुतळयाजवळ, लातूर विभाग, लातूर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा  शिक्षण उपसंचालक (प्राथमिक), लातूर विभाग, लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४
निर्णय दिनांक २९/१०/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष,
सना वेल्फेअर अँड एज्युकेशन सोसायटी,
नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक धर्मादाय आयुक्त,
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नांदेड विभाग,
नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंदम युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५
निर्णय दिनांक २९/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार,<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>अधिक्षक,<br>सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर | | |

**निर्णय**

श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २०.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक ०२.०८.२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन, अपिलार्थीस माहिती देण्याचे, जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलाथीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २२९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार, तवकल वस्ताद मळा, टिळक रोड, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९६
निर्णय दिनांक २९/१०/२००९

१ श्री. मो.मोईज खान पठाण, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णूपुरी, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी,
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णूपुरी, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वित्त व लेखाधिकारी,
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

जन अपिलीय अधिकारी : प्रभारी कुलसचिव (प्रशासकीय बाबी),
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

**निर्णय**

श्री. मो. मोईज खान पठाण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९.०९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.०७.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय

अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिना व ३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मो.मोईजखान पठाण, व्दारा-राम संगनवार, ओम निवास, प्र.नि.हा. शाळेजवळ, कैलास नगर, नांदेड- ४३१ ६०५.
२. जन माहिती अधिकारी तथा वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णूपुरी, नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव (प्रशासकीय बाबी), स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णूपुरी, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२१
निर्णय दिनांक २९/१०/२००९

१ सौ.पार्वतीबाई शंकरराव राऊत, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, कोतवाली, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
नगर शहर भाग, अहमदनगर

**निर्णय**

सौ.पार्वतीबाई शंकरराव राऊत यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १२.०५.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि२६.०६.२००६ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २ महिने इतक्या जास्त विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ.पार्वतीबाई शंकरराव राऊत, व्दारा-श्री. शंकरराव राऊत, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.
२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, कोतवाली, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर शहर भाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३६
निर्णय दिनांक २९/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शमीमखान इब्राहिमखान पठाण,<br>रा.संगमनेर, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन / मॅनेजर,<br>संगमनेर औद्यागिक वसाहत मर्यादित,<br>संगमनेर, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, संगमनेर, जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

श्री. शमीमखान इब्राहिमखान पठाण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २७.०८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०३.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १ महिने व ४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :    २९/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शमीमखान इब्राहिमखान पठाण, संगमनेर स्वातंत्र्य चौक, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.
२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन / मॅनेजर, संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, संगमनेर, जि.अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, जि.अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८७
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१. श्री.सगर सुधीर व्यंकटराव, : अपिलार्थी
रा.किल्लारी, ता.औसा, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी,
भूकंप पुनर्वसन विभाग, लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, लातूर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा पुनर्वसन अधिकारी,लातूर

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. आण्णाराव रामराव सगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती न दिल्यामुळे व तसेच यानंतर अपिलार्थीने दि. १५.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्मरणपत्राद्वारे विनंती करुनही त्यांनी माहिती न दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकाऱ्याने कोणताही दंड न लावल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे किल्लारी भूकंपात मयत झालेल्या व्यक्तींच्या अनुदान वाटपात झालेल्या कथित फसवणूकीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या दि. २२.११.२००६ व दि. १७.०३.२००७ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात त्रयस्थ पक्ष श्री. आण्णाराव रामराव सगर यांच्यावर झालेली कार्यवाही - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने बारा वर्षानंतर आक्षेप नोंदविल्याबाबत अपिलार्थीचा खुलासा मागितला असतानाही तो त्यांनी दिला नसल्याची अपिलार्थीस प्रथमतः कल्पना दिली व तदनंतर या प्रकरणी अपिलार्थीने ज्यांच्याविरुध्द तक्रार केली आहे, त्या संबंधितांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या खुलाशाच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना प्रतिपृष्ठ रु.२/- इतके शुल्क शासनाकडे जमा करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या तक्रार अर्जाच्यासंदर्भात त्यांनी काय कार्यवाही केली, हे अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले.

यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधितांच्यावर कारवाई करण्यात येत आहे असे कळवून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या संबंधितांच्या खुलाशाच्या प्रती अपिलार्थीस दिल्या. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथम दि. ०१.०८.२००८ रोजी व तदनंतर दि. २२.०९.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे व या प्रकरणाशी संबंधित अंतिम निर्णय त्यांनी अपिलार्थीस दि. १४.०९.२००९ रोजी कळवून अपिलार्थीने त्यांच्या तक्रार अर्जामध्ये उपस्थित केलेली बाब ही दिवाणी न्यायालयाच्या अखत्यारीत असल्याचे अपिलार्थीस कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला असला तरी तो फारसा सकारात्मक असल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रतिसादाद्वारे त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित व्यक्तींच्या खुलाशाच्या प्रती प्रतिपृष्ठ रु.२/- याप्रमाणे देऊ केल्या. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांना शुल्काचा तपशील कळविणे भाग आहे. तथापि अशाप्रकारचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस कळविला नाही व यासंदर्भात त्यांच्याकडे संबंधितांकडून प्राप्त झालेल्या खुलाशाच्या प्रती व कार्यवाही करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस दि. २२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आणि अंतीम निर्णय सरतेशेवटी दि. १४.०९.२००९ रोजी अपिलार्थीस कळविला. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली अशाप्रकारची माहिती अर्जदाराने मागितल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून यासंदर्भातील सर्व पत्रव्यवहारांच्या प्रती अर्जदारास उपलब्ध करुन

देणे सर्वसाधारणपणे अभिप्रेत आहे. परंतु या ठिकाणी अशाप्रकारची कृती जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित तक्रार अर्जावर त्यांच्या कार्यालयाने दि. ०५.०७.२००८ पर्यंत विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व त्यांच्या अभिलेख्यावरील या प्रकरणाशी संबंधित नोंदी त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवाव्यात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्वनियोजित वेळी ही माहिती हस्तगत करुन घ्यावी लागेल.

अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद पाहता, यामध्ये त्यांनी अपिलार्थीने १२ वर्षांनंतर आक्षेप नोंदविल्याबाबत त्यांच्याकडे खुलासा मागविला असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशाप्रकारचे खुलासे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास मागणे योग्य नाही, त्यांनी जर अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्याप्रमाणे कळविणे हे या अधिनियमामध्ये त्यांच्याकडून अपेक्षित आहे. तसेच जन माहिती अधिकारी (श्रीमती दिपाली मोतियाळे,सध्या उपजिल्हाधिकारी भूसंपादन,नांदेड) यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना अधिनियमातील कलम ७(३)(क) चा भंग करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही शास्ती लावली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर

कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचे अधिकार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये नाहीत तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून एखाद्या दुष्ट हेतूने माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोगाकडूनही आदेशित करण्यात येत नाही. मात्र त्यांच्या हातून घडलेल्या प्रशासकीय अनियमिततेबद्दल त्यांना वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.
३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्रीमती दिपाली मोतियाळे,सध्या उपजिल्हाधिकारी भूसंपादन,नांदेड) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सगर सुधीर व्यंकटराव,मु.पो.किल्लारी, ता.औसा, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्रीमती दिपाली मोतियाळे,उपजिल्हाधिकारी भूसंपादन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५८८
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री.होळे दशरथ आच्युतराव, : अपिलार्थी
रा.आष्टामोड,ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लातूर लघुपाटबंधारे विभाग, लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी,
लातूर लघुपाटबंधारे विभाग,लातूर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अधिकारी,
लातूर लघुपाटबंधारे विभाग,लातूर

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता,
बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी,
जि.बीड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ६ चे पोटकलम ३ नुसार दुसऱ्या कार्यालयाकडून मागवून घेऊन देणे बंधनकारक असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती देण्याऐवजी ती दुष्ट हेतूने दडवून ठेवली आहे. त्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई होण्याकरिता व त्यांनी मूळ अर्जातील माहिती प्राप्त होण्याकरिता त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - "मौ. जठाळा साठवण तलावातील स.नं. ५८ मधील १ हेक्टर ६० आर. भूसंपादन जमिनीचा पुनर्प्रस्ताव तयार करण्याबाबत तालुका भूमि अभिलेख कार्यालय, चाकूर यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविलेल्या स्वयंस्पष्ट अहवालाची प्रत." - ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन तालुका निरीक्षक भूमी अभिलेख चाकूर यांच्याकडून अपिलार्थीने त्यांच्या अर्जात संदर्भित केलेल्या स्वयंस्पष्ट अहवालाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी, लातूर पाटबंधारे विभाग यांच्याकडे दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या नंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, मूळात अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठी प्रथम अर्ज केला, त्यावेळी त्यांच्या कार्यालयात भूमी अभिलेख कार्यालयाकडून, कोणताही अहवाल प्राप्त झाला नव्हता, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती त्यांच्या दि. २९.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविली आहे.भूमापन कार्यालयाकडून त्यांच्याकडे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती (अहवाल) दि.३०.०६.२००९ रोजी, अपिलार्थीने त्यांच्याकडे कथित प्रथम अपील अर्ज केल्यानंतर प्राप्त झाली आहे व तसेच अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना अर्जातील प्रकरणाच्या सद्यस्थितीची माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दि. ३०.०६.२००९ रोजी प्राप्त झाली आहे व त्यामुळे अपिलार्थीस जर अद्यापही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वतंत्र अर्जाद्वारे प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणाशी संबंधित कार्यवाहीकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते पहावयाचे झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्ज मूळात प्राप्त झालेला नाही. या सर्व बाबींचे अवलोकन करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.	श्री.होळे दशरथ आच्युतराव,रा.आष्टामोड, पो. गांजूर,ता.चाकूर, जि.लातूर

२.	जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लातूर लघुपाटबंधारे विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. १५८९/०८ व १५९०/०८**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८९ व १५९०
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री.यादव नरसिंग माधवराव, : अपिलार्थी
रा.तुळशीराम तांडा, ता.अहमदपूर,
जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी,लातूर.
अपील क्र.१५९०/०८ त्रयस्थ पक्षः सचिव, सुधाकर नाईक,
प्राथमिक आश्रम शाळा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, ती एकाच प्राधिकरणाशी संबंधित असल्यामुळे आयोगासमोर एकत्रित सुनावणीसाठी विचाराधीन आहेत.

**अपील क्र. १५८९/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ चा भंग केला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यात यावी व त्यांना संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण १२ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने दि. २२.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. १३.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. ०५.११.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना पूर्ण माहिती हवी असल्याच्या त्यांच्या मागणीचा पुनरुच्चार त्यांच्या युक्तिवादामध्ये केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. १८.०९.२००८ रोजी संबंधित आश्रम शाळेच्या मुख्याध्यापक यांच्याकडे पाठविला असता, मुख्याध्यापकांनी अपिलार्थीस दि. २८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही. आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे आयोगास असेही स्पष्ट केले की, त्यांच्याकडे कार्यालयीन कर्मचारीवर्ग अपुरा असल्यामुळे ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे संमिश्र स्वरुपाची माहिती मागविली आहे. विशेषतः

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ मधील, "सदरील शाळेस सुरुवातीला वेतन व वेतनेतर अनुदान देत असताना सदरील शाळेची सखोल चौकशी केली का? ", मुद्दा क्र.९ मधील,"सदर शाळेवरील प्रकरण एवढया टोकाला जाऊ देण्यात आपल्याला धन्यता वाटते का? याचा खुलासा द्यावा", मुद्दा क्र.१० द्वारे, "आपण शासनाचे प्रतिनिधी आहात काय? असाल तर संस्थाचालक आपणास का जुमानत नाहीत? याचा खुलासा द्यावा" व मुद्दा क्र.१२,"सदरील शाळेमधील कायम कर्मचाऱ्यांवर संस्थाचालकाने केलेल्या अन्यायाबाबत आपली भूमिका काय आहे? " या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात असलेली माहिती, ती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. हे पाहता अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ८,९,१० व १२ या मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या “माहिती” या शब्दाच्या व्याप्तीबाहेरची असल्याने, ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांवरील माहिती, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती, अपिलार्थीस देय होत आहे व आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर त्यांनी दि. १८.०९.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलर्थीच्या अर्जाची प्रत संबंधित आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. या आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकाने दि. २८.०९.२००८ रोजी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.२/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयाकडे करण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीस एकूण किती शुल्क भरावयाचे व त्यांना देण्यात येणाऱ्या माहितीच्या संभावित पृष्ठांची

अंदाजित संख्या देखील त्यांनी अपिलार्थीस कळविली नाही. मूळात अपिलार्थीच्या अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून, अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे पाच दिवसाच्या आत पाठविणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी ही कृती विलंबाने केली आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहितीचा देखील समावेश आहे.परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असणे अभिप्रेत असलेली माहिती देखील अपिलार्थीस पुरविण्यासंदर्भात आजतागायत कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०५.११.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित करुनही आज सुनावणीच्या दिवसापर्यंत म्हणजेच अंदाजित अकरा महिन्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांच्याकडे कोणतीही माहिती तयार नाही. या संपूर्ण घटनाक्रमातील जन माहिती अधिकारी यांची अशाप्रकारची नकारात्मक मानसिकता पाहता, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे असद्‌हेतूने टाळले असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. **सबब संचालक, समाजकल्याण यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

**अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व या**

**निर्णयामध्ये वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.**

**<u>अपील क्र. १५९०/०८:</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने वरील अपील क्र. १५८९/०८ मध्ये केलेल्या विनंतीची पुनरावृत्ती या अपील अर्जामध्ये केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुधाकर नाईक प्राथमिक आश्रमशाळेच्या संदर्भात त्यांनी केलेल्या कार्यवाहीविषयी एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अथवा व्यक्तिशः माहिती पाहिजे आहे, यासंदर्भात संबंधित मुद्यासमोर त्यांचे कोणतेही अभिप्राय नोंदविलेले नाहीत.अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी आदेश पारित करुन, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून दि. १५.०९.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०३.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याचे कळविले. परंतु अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर न राहिल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष (संबंधित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका) उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना संपूर्ण माहिती हवी असल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याकरिता बोलाविले असता, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर न राहिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. संस्थेच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे समाजकल्याण संचालनालयाच्या आदेशासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, अशाप्रकारचे आदेश संचालनालयाकडून त्यांना प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये सुधाकर नाईक प्राथमिक आश्रम शाळेच्या संदर्भात त्यांचे वेगवेगळे आक्षेप नोंदविले असून यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक व त्यांचा खुलासा अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात माहिती मागविल्याचे दिसून येते. याला अपवाद म्हणजे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे त्यांनी मागितलेल्या, सुधाकर नाईक प्राथमिक आश्रम शाळेला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिलेल्या नोटीसची प्रत, हा होय. उर्वरित सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सन १९९४ पासून मंजूर झालेले वेतन अनुदान संस्थेच्या खात्यावर जमा करण्याचे संचालनालयाचे आदेश होते काय?, विभागीय समाज कल्याण अधिकारी,लातूर यांच्या दि.२५.०९.२००७ नुसार अतिरिक्त कर्मचारी व शाळेत रुजू करुन घेण्यास नकार दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत आपण काय निर्णय घेणार अहात?, जाणुनबुजून वेतन

बंद करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्याचे नाव व पदनाम" अशाप्रकारची माहिती मागविली आहे, जी मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल कारणे अथवा स्पष्टीकरणे देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील बहुतांशी भाग हा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची दोनही अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.१५८९/०८ व १५९०/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.
२. अपील क्र. १५८९/०८ च्या संदर्भात,जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेली व या निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. अपील क्र. १५९०/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व या निर्णयामध्ये स्पष्ट

केलेली अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. अपील क्र. १५८९/०८ च्या संदर्भात, संचालक, समाजकल्याण यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. अपील क्र. १५९०/०८ च्या संदर्भात, संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.यादव नरसिंग माधवराव,रा.तुळशीराम तांडा, पो. गंगाहिप्परगा,ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९१
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री.विलास संग्राम गरीबे, : अपिलार्थी
रा.नेकनाळ,पो. तळेगाव (भो.),
ता.देवणी, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,
नेकनाळ, ता.देवणी, जि.लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, देवणी, जि.लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीच्या दि. ०७.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम सुनावणी दि.२०.१०.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. तथापि दि. २०.१०.२००८ रोजी सुनावणी होऊ शकली नाही. या नंतर त्यांनी याच अपिलाची द्वितीय सुनावणी दि. १६.१०.२००९

रोजी घेतली व या पूर्वी म्हणजे दि. २०.०९.२००८ रोजी दिलेली माहिती अपिलार्थीस परत दि. १६.१०.२००९ रोजी दिली. अपिलार्थीस त्यांनी दि. १६.१०.२००९ रोजी द्वितीय सुनावणीच्या वेळी दिलेली माहिती अपिलार्थीस मिळाल्याबाबत व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना दि. १६.१०.२००९ रोजीच्या त्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे कबूल केले आहे. या पत्राची सत्यप्रत त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीचे आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १६.१०.२००९ रोजी प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाल्याचे दिसून येते. हे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे आणि याबद्दल अपिलार्थीची कोणतीही तक्रार नाही. आजच्या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १५९१/०८, दि.०८.१२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.विलास संग्राम गरीबे,रा.नेकनाळा पो. तळेगाव (भो.),ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, नेकनाळ, ता.देवणी, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९२
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.सचिन चंद्रकांत संगमे, रा.उदगीर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने असे नमूद केले आहे की त्यांना अद्यापपर्यंत, त्यांनी वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करुन देखील अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन १९९९ ते २००३ या कालावधीतील, माध्यमिक शाळा उघडण्यासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - शैक्षणिक वर्ष २०००-०१, व २००१-०२ या कालावधीमध्ये शाळा

उघडण्यासाठी शासनाने ठरविलेल्या नियमावलीची सत्यप्रत, या कालावधीमध्ये शाळा उघडण्यासाठी तयार केलेल्या बृहद आराखडयाच्या सत्यप्रती, श्री संगमेश्वर बहु सेवाभावी संस्था,दवणहिप्परगा या संस्थेने कै.विमलताई माध्यमिक विद्यालय, दवणहिप्परगा ही शाळा उघडण्यासाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या सत्यप्रती, त्या अहवालासोबत संबंधित कार्यालयाने व शासनाने तयार केलेले रिपोर्ट, प्रतिक्रियांच्या सत्यप्रती, त्या संस्थेस शाळा चालविण्याची शासनाकडून मिळालेले परवानगी पत्राची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सन २००० ते २००१ या कालावधीतील असल्यामुळे आणि त्यानंतर त्यांचे कार्यालय चार ठिकाणी हलविण्यात आले असल्याने अपिलार्थीस देण्याकरिता माहिती उपलब्ध होऊ शकत नसल्याचे त्यांना कळविले आणि अपिलर्थीच्या मुद्दा क्र. ५ - शाळा चालविण्यासाठी शासनाकडून मिळालेली परवानगी - या मुद्यावरील माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजी शिक्षणाधिकारी व अपिलार्थी यांना उद्देशून एक पत्र लिहून या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती मिळवून देण्यासाठी शिक्षणाधिकारी यांनी आवश्यक ते सहकार्य करावे अशा सूचना देऊन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढला. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपथित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आजही, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची न्यायालयीन प्रकरणाकरिता आवश्यकता आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे आयोगास अशी विनंती केली की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. साळुंके यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती उपलब्ध न करुन दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई आयोगाने करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती त्यांना आता शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयाकडून उपलब्ध झाली असून ही माहिती अपिलार्थीस देण्यास ते तयार आहेत. उर्वरित माहितीसंदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील माहिती माध्यमिक शाळा संहितेमध्ये उपलब्ध आहे. माध्यमिक शाळा संहितेमधील संबंधित पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांच्या कार्यालयाचे ४ वेळा स्थलांतर झाले असल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता येऊ शकत नाही. तथापि ही माहिती शिक्षण संचालक व मंत्रालय स्तरावर उपलब्ध होऊ शकेल. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ३ (a) व (b) च्या संदर्भात अपिलार्थीस ही माहिती कशाप्रकारे देता येणे त्यांना शक्य नाही, हे त्यांनी आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ५(मुद्दा क्र.३.c) शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता उपलब्ध आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस आता हे आदश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ (a) व ३(b) च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या दृष्टीने

महत्त्वाची आहे. ही माहिती जर त्यांच्या कार्यालयाने, संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाल्यामुळे जर नष्ट केली असेल तर, त्यासंदर्भात योग्य तो पुरावा अपिलार्थीस देऊन त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे अन्यथा सदरचे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्याची होती, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांचा,अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सन २००० ते २००१ सालाशी संबंधित असल्यामुळे व त्यांच्या कार्यालयाचे चार वेळा स्थलांतर झाल्यामुळे ती अपिलार्थीस देता येत नाही  हा युक्तिवाद, आयोग अमान्य करीत असून जन माहिती अधिकारी यांना असे सूचविण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ही माहिती त्यांच्या विभागातील ज्या-ज्य प्राधिकरणाकडे उपलब्ध असण्याची शक्यता त्यांना वाटते, त्या प्राधिकरणाकडे त्यांनी आपल्या कार्यालयातील कर्मचारी पाठवून ही माहिती इतर कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी. याकरिता जन माहिती अधिकारी यांना तीस दिवस इतका कालावधी देण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. साळुंके) यांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी असे आढळून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे कारणासहीत कळविले आहे. या प्रतिसादावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दुष्ट हेतूने दडविल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीची तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री. साळुंके यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र.३.(c) शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व उर्वरित माहिती तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सचिन चंद्रकांत संगमे,रा.'संगमे निवास', नोबल कॉलनी,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९३
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री.स्वामी भिमाशंकर महादेव, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, अहमदपूर,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती कशी चुकीची व दिशाभूल करणारी आहे, हे नमूद केले असतानाही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील नामंजूर केले व त्यांना अचूक व योग्य माहिती देण्याचे निर्देश माहिती अधिकाऱ्यांना दिले नाहीत, म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०२.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अहमदपूर येथील घर क्र.एन-२८ च्या हस्तांतरणासंदर्भात श्री.महादेव सोमनाथ स्वामी यांनी केलेल्या अर्जाच्यासंदर्भात सन २००५-०८ या कालावधीतील काही माहिती ३ मुद्यांद्वारे

मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वारसा हक्काअंतर्गत केलेल्या हस्तांतरणाच्या अर्जास वारस नसलेल्या व्यक्तींना नगर परिषद कायद्याच्या ज्या कलमांतर्गत आक्षेप घेता येतात त्या कलमांचा क्रमांक व त्यात नमूद असलेला पूर्ण मजकूर, वारसाहक्काअंतर्गत हस्तांतरणाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषदेतर्फे जे जाहीर प्रगटन काढण्यात येते, त्यात वारस नसलेल्या व्यक्तींचे आक्षेप मागवितात किंवा नाही व यासंदर्भातील कलमांचा नंबर व मजकूराचा तपशील आणि घ.क्र.एन-२८ च्या श्री. महादेव सोमनाथ स्वामी यांच्या हस्तांतरणाच्या अर्जास ज्या वारस नसलेल्या व्यक्तीने आक्षेप घेतले आहेत, त्याने हस्तांतरणाच्या नमुन्यात दर्शविलेल्या घर क्र.एन-२८ च्या मोजमापाला आक्षेप घेतले आहेत किंवा नाही याची माहिती व आक्षेप घेतले असल्यास मोजमापाबद्दल आक्षेपकर्त्यांच्या म्हणण्याच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने विचाराधीन अपील वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २६.०९.२००८ रोजी माहिती पुरविली असून या प्रकरणाची पार्श्वभूमी त्यांनी आयोगास थोडक्यात विशद केली.

त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस ज्या मालमत्ता हस्तांतरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे, त्या मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत न्यायालयामध्ये अपिलार्थी व संबंधित मठाचे मूळ स्वामी यांच्यातील वादाचे प्रकरण प्रलंबित आहे. न्यायालयाने आदेश दिल्याशिवाय अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या मालमत्तेचे हस्तांतरण त्यांना करता येत नाही. त्यांनी या प्रकरणी केलेली कार्यवाही ही महाराष्ट्र नगर परिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ मधील कलम ३२३,३२६, ३३५ व १४८- के नुसार केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक त्या खुलाशासह अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिलेल्या निर्णयावर काही आक्षेप नोंदविले आहेत. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींपुरते या प्रकरणाकडे पहावयाचे झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.स्वामी भिमाशंकर महादेव,रा.घर नं.एन-२८, महादेव गल्ली,अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९४
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री.भागवत किसन गरगडे, : अपिलार्थी
रा.समदर्गा,ता.औसा, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत समदर्गा, ता.औसा,जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, औसा,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०३.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौ. समदर्गा पो.कोरगंळा,ता.औसा गावात हरयाली कामासाठी शासनाकडून प्राप्त अनुदान, उचललेली रक्कम, मजूरांचे हजेरी मस्टर, ग्रामसभा व मासिक सभेच्या इतिवृत्ताच्या नकला, ग्रामसभेला उपस्थित असलेल्या स्वाक्षरी असलेल्या पत्रकाच्या नकला, दलित वस्ती सुधार या योजनेसाठी शासनाचे प्राप्त अनुदान व त्यावर झालेल्या खर्चाच्या नकला व संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नकला,सन २००४ ते २००८ पर्यंतच्या संपूर्ण ग्रामसभेच्या व मासिक

सभेच्या नकला - या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.११.२००८ रोजी आपले आदेश पारित केले असून या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि हा कालावधी व्यपगत होऊनही अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. ०३.०९.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामधील अंतिम भाग - संपूर्ण रोजगार हमी योजनेच्या नकला - हा भाग अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना अपेक्षित असलेल्या या मुद्यावरील व एकूण माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. उर्वरित सर्व माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे

अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, हे कळून येत नाही. अपिलार्थीने वर म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील मुद्यांचा अपवाद वगळता, मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती पुरवावी लागेल.या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वेळा गेले, या संदर्भातील कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही अथवा हे स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी "संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नकला" हा भाग वगळता, उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी "संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नकला" हा भाग वगळता, उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.भागवत किसन गरगडे,रा.समदर्गा,पो.कोरगंळा,ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत समदर्गा,पो.कोरगंळा, ता.औसा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९५
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री. स्वामी विरभद्र वैजनाथ, : अपिलार्थी
रा.निलंगा,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वरिष्ठ लिपीक,
नगर परिषद,निलंगा, जि.लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, निलंगा, जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १०.११.२००८ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी आजतागायत न झाल्याने व परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती आजतागायत न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण १६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १९२/- इतके

त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने दि. १३.१०.२००८ रोजी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याच दिवशी काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.११.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५,६,७,११ व १३ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. १३.१०.२००८ रोजी सशुल्क माहिती दिली व तदनंतर दि. ०५.१२.२००८ रोजी विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने आयोगाकडे दि. २९.११.२००८ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर दि. ०५.१२.२००८ रोजी उर्वरित माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता सर्वसाधारणपणे ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर, उर्वरित माहिती विनामूल्य प्राप्त झाली

असल्याने व तसेच अपिलार्थीचे आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०५.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे निश्चितपणे कोणते अभिप्राय आहेत हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास ज्ञात होत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. स्वामी विरभद्र वैजनाथ,रा.'संगमेश निवास',तेरणा कॉलनी शेजारी, निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,नगर परिषद,निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९६
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री. चौकटे प्रदीप नागनाथ, : अपिलार्थी
रा. अंधोरी,ता.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पोलीस अध्यक्ष कार्यालय,लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नांदेड परीक्षेत्र, नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : माहिती अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर.

जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनीही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलमान्वये योग्य ती कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी,पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे

त्यांच्या दि.२६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे - दि. १५.०६.२००८ रोजी अंधोरी येथील अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाबाबत सरपंच व इतरांनी दिलेल्या निवेदनाच्या छायाप्रती - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने हा अर्ज जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे केला होता. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र,नांदेड यांच्याकडे दि. ३०.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अपील अर्ज जिल्हा पोलीस अधीक्षक,लातूर यांच्याकडे निर्णयासाठी पाठवून दिला. या अपील अर्जावर जिल्हा पोलीस अधीक्षक,लातूर यांनी देखील कोणतीही सुनावणी न घेऊन निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर व विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र,नांदेड हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने अपिलार्थीच्या दि. ३०.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक,लातूर यांनी सुनावणी घेऊन आपले निर्णय देणे, विशेषतः अपिलार्थीने ज्या विषयासंदर्भात माहिती मागविली आहे, त्याविषयाचे गांभीर्य लक्षात घेता आयोगास गरजेचे वाटते. सबब अपर जिल्हा पोलीस अधीक्षक तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.३०.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**लातूर**
**दिनांक : ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चौकटे प्रदीप नागनाथ, मु.पो.अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९७
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री. मंगे शंकर माधव, : अपिलार्थी
रा. अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अहमदपूर,
जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. १६.०८.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात गट विकास अधिकारी, सौ. कल्पना क्षिरसागर यांनी त्यांचा दि. १६.०६.२००८ रोजीचा माहितीचा अर्ज स्वीकारण्यास इन्कार केला व नंतर दि. १८.०८.२००८ रोजी अपिलार्थीस सायंकाळी ५.०० वा. पर्यंत ताटकळत ठेवून स्वीकारला. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे पोस्टाने माहिती मागितली असताना देखील अपिलार्थीस, "माहिती घेऊन जावी"असा आदेश दिला. यानंतर सहायक माहिती अधिकारी श्री. कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने श्री. कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधल्यानंतर श्री. कुलकर्णी यांनी अपिलार्थीची आर्थिक

पिळवणूक केली. तसेच त्यांना प्राप्त झालेली माहिती ही साक्षांकित करुन दिलेली नाही आणि दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातल्यामुळे व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना दि.१८.०८.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित भारत निर्माण योजनेसंदर्भात एकूण १ ते ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. (अपिलार्थीच्या या अर्जामध्ये मुद्दा क्र. ४ चा समावेश नाही.) अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००७-०८ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.लातूर यांच्याकडे दि. २४.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे जन माहिती

अधिकारी आणि त्यांच्या सहायकाबद्दल केलेल्या तक्रारीबाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी अपिलार्थीस विनाकारण खोळंबून ठेवले नसल्याचे आणि त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारे आर्थिक व्यवहार केला नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीचा दि. १६.०८.२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.०८.२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला. यानंतर त्यांनी तीस दिवसाच्या आत म्हणजे दि. १७.०९.२००८ रोजी अगर तत्पुर्वी अपिलार्थीस माहिती देणे भाग होते. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०९.२००८ रोजी तयार असल्याचे दिसून येत आहे. तथापि ती दि. १८.०९.२००८ रोजी (सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर एक दिवसाच्या विलंबाने ) पाठविल्याचे दिसून येते. या एक दिवसाच्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून, त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाचे त्यांनी गांभीर्याने वाचन करुन अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या माध्यमाद्वारे माहिती मागविली आहे त्याच माध्यमाद्वारे माहिती पुरविण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून जरी पूर्ण माहिती प्राप्त झाली असली तरी एक दिवसाच्या विलंबाने ती प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे. त्यामूळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या सहकाऱ्यावर आर्थिक व्यवहारासंदर्भात केलेल्या आरोपाबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही

आणि आज रोजी सुनावणीच्या वेळी देखील ते गैरहजर आहेत. हे पाहता, अपिलार्थीस आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून इतःपर सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांवर आवश्यक त्या पुराव्याशिवाय अशाप्रकारचे आरोप करु नयेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. सबब त्यांचा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मंगे शंकर माधव, मु.पो. अंधोरी ता. अहमदपूर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९८
निर्णय दिनांक ३०-१०-२००९

१ श्री. कोरनुळे अंबादास व्यंकटराव, : अपिलार्थी
रा. अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी,लातूर.
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, लातूर
त्रयस्थ पक्षः श्री. विश्वनाथ रामचंद्र कोरनुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती देणे बंधनकारक असतानाही माहिती दिली नाही आणि दिशाभूल करणारा पत्रव्यवहार केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०.०८.२००८ रोजीच्या मूळ

अर्जाद्वारे - त्रयस्थ पक्ष श्री. विश्वनाथ रामचंद्र कोरनुळे यांनी दि. २६.०६.२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीविषयी काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संदर्भिय अर्जाचा दैनंदिन प्रगती अहवाल, या प्रकरणाशी संबंधित अधिकाऱ्याची नावे व पदनामे, प्रत्येक अधिकाऱ्याकडे प्रकरण वर्ग झाले त्या त्या कालावधीत अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही,प्रत्येक अधिकाऱ्याकडे अर्जदाराचे प्रकरण वर्ग झाले त्याच्या पावत्याच्या पुराव्याच्या प्रती, 'नागरिकांच्या सनदी'प्रमाणे किंवा इतर कोणत्याही आदेशाप्रमाणे अशाप्रकारची प्रकरणे निकाली काढून निपटारा करण्याचा विहित कालावधी व त्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील नियमावलीची प्रत, संबंधित अधिकाऱ्यांना लागू असलेल्या नियमांच्या कालावधीचे पालन करणे बंधनकारक नाही काय? ज्या अधिकाऱ्यांनी या नियमांचे पालन केले नाही, त्यांना लागू असलेल्या सेवानियमांच्या यादीची प्रत, उपरोक्त अधिकाऱ्यांनी अर्जदाराला अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत हेल्पाटे मारावयास लावले,ज्यामुळे अर्जदाराला मानसिक त्रास झाला. उपरोक्त अधिकारी जनतेच्या मानसिक उत्पीडनास जबाबदार आहेत काय? सेवानियमांच्या उल्लंघनाबाबत काय कारवाई करणे बंधनकारक आहे? कारवाई केव्हा व कोणत्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून होईल व अर्जदाराचे प्रकरण कधी निकाली निघेल" - या मुद्याचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज जिल्हाधिकारी, लातूर यांच्या कार्यालयाकडे केला होता, त्या कार्यालयाने यासंदर्भात त्यांच्याकडील दि. ०५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस ही माहिती उपविभागीय अधिकारी, उदगीर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे, हे पत्र त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना उद्देशून लिहिले होते. यानंतर अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती ही

प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले व मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहितीबाबत अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातून सशुल्क उपलब्ध करुन घेऊन जाण्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती माहिती त्यांच्याकडील दि. ०३.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २०.०८.२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले.त्यांनी त्यांच्याकडील दि. ०३.१२.२००८ रोजीचा दिलेला प्रतिसाद हा अपिलार्थीच्या दि. १०.११.२००८ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात दिलेला आहे. हा अर्ज व अपिलार्थीचा दि. २०.०८.२००८ रोजीचा अर्ज यामधील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकसारख्या स्वरुपाची आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५,६,७ व ८ या मुद्यांच्या संदर्भातील माहिती (मुद्दा क्र.५ मधील सेवानियमाच्या यादीची प्रत हा भाग वगळता) अपिलार्थीस देय नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी आणि भविष्यकाळातील अशी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ मधील वर नमूद केल्याप्रमाणे अंशतः भाग वगळता उर्वरित मुद्दा क्र.६,७ व ८ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ ते ४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ  अर्जामध्ये संदर्भीय अर्जाबाबतच्या दैनंदिन प्रगतीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितला आहे. परंतु शासनाच्या कोणत्याही कार्यालयामध्ये प्रत्येक अर्जाचा अपिलार्थीस अपेक्षित असल्याप्रमाणे दैनंदिन प्रगती अहवाल ठेवला जात नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तसे कळविणे या प्रकरणी गरजेचे होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्रयस्थ पक्षाच्या दि. २६.०६.२००८ रोजीच्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्यासाठी जे सक्षम अधिकारी होते, त्या सर्वांची नावे व सदर प्रकरण प्रत्येक अधिकाऱ्याकडे किती कालावधीकरिता प्रलंबित होते, याचा तपशील त्यांनी अपिलार्थीस द्यावा. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडील प्रत्येक अधिकाऱ्याकडे अर्जदाराचे प्रकरण वर्ग करीत असताना त्या अधिकाऱ्याच्या पोच पावतीच्या पुराव्याची प्रत मागितली आहे. या मुद्यावरील माहितीचे देखील अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१ प्रमाणेच स्पष्टीकरण आहे. कोणत्याही शासकीय कार्यालयात

अशाप्रकारच्या प्रकरणावर अभिलेख्याद्वारे अथवा पत्रव्यवहाराद्वारे निर्णय घेतला जातो. एका अधिकाऱ्याने दुसऱ्या अधिकाऱ्यास पत्र लिहिले असता अथवा कुठलाही संदर्भ केला असता त्याच्याकडून पावती घेण्याची पध्दत शासनामध्ये प्रचलीत नाही, अशा अर्थाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग होते. परंतु त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे जमिनीच्या मालकीहक्काबाबत तक्रार केली होती. सदर प्रकरणात कार्यवाही आता पूर्ण झाली असून अपिलार्थीच्या अर्जामध्ये त्यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे अंतिमतः कार्यवाही झाली आहे. अपिलार्थीने ज्या स्वरुपाची तक्रार त्यांच्याकडे केली होती, त्या स्वरुपातील तक्रारीचा निपटारा करण्यासाठी नागरिकांची सनद अथवा इतर कोणत्याही शासकीय निर्णयाद्वारे एक विशिष्ट अशी मुदत घालून दिलेली नाही. अशाप्रकारचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाकडे अपिलार्थीच्या मुद्दा क्र. १ ते ४ च्या संदर्भात केलेले स्पष्टीकरण लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या प्रतिनिधीने आज रोजी युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ४ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधणे त्यांना आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी त्यांच्या युक्तिवादामध्ये म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी व्यक्तिशः उपस्थित राहीले नाहीत आणि या मुद्यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. याचबरोबर या मुद्यासंदर्भात तोंडी युक्तिवाद

करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थितही नाहीत. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिति अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची विनंती आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिति अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ ते ४ च्या संदर्भातील माहिति त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**लातूर**
**दिनांक : ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिति आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कोरनुळे अंबादास व्यंकटराव,रा.प्रसाद बुक सेंटर, डॉ.कदम हॉस्पीटलसमोर,लातूर-नांदेड रोड, अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिति अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६५
निर्णय दिनांक ३०/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बापुराव रामचंद्र मालुसरे,<br>रा. घोनसी, ता.जळकोट, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>संपादक,<br>दैनिक महिला एकजूट कार्यालय, उदगीर, जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा माहिती अधिकारी, लातूर. | | |

**निर्णय**

श्री. बापुराव रामचंद्र मालुसरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २४.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३०/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बापुराव रामचंद्र मालुसरे, मु.पो. घोनसी, ता.जळकोट, जि.लातूर.
२. जन माहिती अधिकारी तथा संपादक, दैनिक महिला एकजूट कार्यालय, 'सगर निवास', समर्थ कॉलनी, देगलूर रोड, (निडेबन), उदगीर, जि.लातूर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारत, तळ मजला, डावी बाजू, लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३७
निर्णय दिनांक ३०/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.चंद्रकांत बाबुराव अडसुळे,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. चंद्रकांत बाबुराव अडसुळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६.१२.२००७ (दि.१९.१२.२००८ रोजी फेरसादर) रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.१२.२००५ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २०.०१.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक १८.०२.२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २२.०२.२००६ रोजी आपले आदेश पारित करुन, सात दिवसामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ५८८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३०/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत बाबुराव अडसूळे, शाहु चौक, लातूर.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३८
निर्णय दिनांक : ३०-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १) श्री. चंद्रकांत बाबुराव अडसुळे,<br>रा. लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, लातूर | : | जन माहिती अधिकारी |
| २) जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री. चंद्रकांत बाबुराव अडसुळे यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ११-१२-२००७ (दि.१९.१२.२००८ रोजी फेरसादर) रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१.०४.२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २१.०१.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २२.०२.२००६ रोजी पारित केले आहे. सदरचे आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, प्रस्तुतचे अपील जून्या कायद्याखाली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे उशीराने प्रथम अपील केल्याचे दिसते. तथापि त्यानंतर मूळ कायदा निरसित झाला असल्यामुळे त्या कायद्याखालील माहितीच्या अर्जासंबंधी आयोगाकडे नविन कायद्यानुसार द्वितीय अपील करता येत नाही. जी द्वितीय अपिले, विहीत तारखेपर्यंत म्हणजेच १२ ऑक्टोबर,२००५ पर्यत दाखल झाली असतील त्यावरच उपलोकायुक्त यांनी निर्णय देणे अपेक्षित होते. व या तारखेनंतर जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात कलम १९ मधील प्रक्रिया पूर्ण करुन सादर केलेल्या व्दितीय अपिलावर आयोगाने निर्णय देणे अपेक्षित आहे. प्रस्तुत अपील विहीत मुदतीनंतर सादर केले असल्यामुळे  खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक :  ३०-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत बाबुराव अडसुळे, शाहु चौक, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९९
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चंद्रकांत बाबूराव अडसुळे,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नगर अभियंता,
नगर परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यास सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे श्री. बामणकर के.ए. हे शहर अभियंता म्हणून कार्यरत असताना त्यांनी नगर परिषद कार्यालयाच्या मागील नाना-नानी पार्क (तळे) च्या सुशोभीकरण केलेल्या कामाच्या संदर्भात काही माहिती एकूण १८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने व अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०९.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी या प्रकरणाशी संबंधित ते असल्याने व आता ते नगर परिषदेच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्याने या प्रकरणाची माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, ते ही माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे चार ते पाच वेळा गेले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, "आज पाहू","उद्या पाहू" अशी उत्तरे दिली व त्यांना माहिती देण्याचे टाळले. ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा पुरावा म्हणून त्यांनी त्यांचे दि. ०३.०७.२००८ रोजीचे जन माहिती अधिकाऱ्यास उद्देशून लिहिलेले एक पत्र आयोगास सादर केले. सदर पत्रावर नगर परिषद, लातूरचा शिक्का असून यावर संबंधित लिपीकाची सही आहे. यावरुन अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्याचे अनुमान निघू शकते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधित नस्ती गहाळ झाली असल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही. त्यांनी आयोगासमोर

असेही कबूल केले की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांच्या कार्यालयाकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने आज आयोगासमोर, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १७ व १८ च्या बाबतीत त्यांना संबंधित प्रकरणी नगरपरिषदेने केलेल्या चौकशीच्या प्रती आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांचा, केवळ संबंधित नस्ती गहाळ झाली म्हणून अपिलार्थीस माहिती देता येणे त्यांना शक्य नाही, हा युक्तिवाद आयोग पूर्णतः अमान्य करीत आहे. अपिलार्थीने ज्या घटनेशी संबंधित माहिती मागितली आहे, ती घटना, अपिलार्थीने प्रथम अर्ज करण्यापूर्वीच्या पाच वर्षांच्या कालावधीतील आहे. त्यामुळे ही माहिती फार जुनी असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहितीची नस्ती शोधून त्यातील माहिती अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना आता तीस दिवसांचा कालावधी देण्यात येत असून, या ही कालावधीमध्ये जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आढळून आली नाही तर त्यांनी ही संचिका जतन करुन ठेवण्याचे ज्या नगर परिषद कर्मचाऱ्याचे कर्तव्य होते, त्या कर्मचाऱ्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी प्रथमतः माहितीची मागणी केली, त्यावेळी श्री. घुगे नावाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता हे लातूर नगर परिषदेकडे शहर अभियंता या पदावर कार्यरत होते व त्यांची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली होती. या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. घुगे यांनी अपिलार्थीस कोणताही

पत्रव्यवहार केलेला नाही किंवा ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याबाबत अपिलार्थीस, त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणी होईपर्यंत लेखी स्वरुपात काहीही अवगत केले नाही. हे पाहता, श्री. घुगे यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीमधून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. घुगे (सध्या तुळजापूर,सार्वजनिक बांधकाम विभाग येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये माहिती अधिकाऱ्यास, अर्जदारास माहिती देण्याकरिता सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, श्री. घुगे यांच्या इतकेच त्यांना सहाय्य करणारे नगर परिषदेमधील सर्व संबंधित कर्मचारी हे देखील जबाबदार असल्याचे दिसून येते. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव ( सार्वजनिक बांधकाम विभाग ) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, श्री. घुगे (सध्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग, तुळजापूर येथे कार्यरत) नगर परिषद,लातूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित नगर पालिका कर्मचाऱ्यांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत बाबूराव अडसुळे,शाहू चौक, लातूर ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव ( सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६००
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

१ श्री. दत्तात्रय पंडीतराव काळे, लातूर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, नगर परिषद, लातूर : प्रतिवादी
२ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : १) आस्थापना प्रमुख,
२) लेखापाल,
३) अंतर्गत लेखा परीक्षक
नगर परिषद कार्यालय,लातूर

त्रयस्थ पक्षः श्री. एस. के. शिवणे व श्री.जाजू बी.जी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक उशिरा व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे श्री. शिवणे एस.के. यांच्या व नगर परिषदेच्या लेखाविभागासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व

टपालाद्वारे अशा दोनही माध्यमाद्वारे अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांच्याकडे दि. २४.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०७.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील तत्त्वतः मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती, नगर परिषद कार्यालयातील या माहितीशी संबंधित विभागांनी दि. ०४.०८.२००८, ०५.०८.२००८ व दि.२७.०८.२००८ रोजी पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि.४, ५ व २७ ऑगस्ट,२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.५ वगळता इतर सर्व मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.५ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "पात्रता नसलेले कर्मचारी लेखापरिक्षक म्हणून काम करीत असतील तर शासकीय लेखापरिक्षणाच्या वेळी जे काही ऑडीट ऑब्जेक्शन निघतील त्यास श्री. शिवणे एस.के. यांचेवर जबाबदारी निश्चित करणार की नाही?" अशी, भविष्यकाळात करावयाच्या

प्रस्तावित कृतीबद्दलची माहिती मागविली आहे जी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दि.४, ५ व २७ ऑगस्ट, २००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या दि.०९.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणतः सुसंगत आहे, असे दिसून येते. या माहितीने अपिलार्थीची कशाप्रकारे दिशाभूल होत आहे आणि अपिलार्थीस नेमकी कोणत्या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी उशिरा माहिती दिली व अद्याप त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती मिळणे बाकी आहे, याचा खुलासा करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत व तसेच त्यांनी यासंदर्भात कोणतेही स्पष्टीकरण त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही.

अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः व टपालाद्वारे अशा दोनही माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षिली असल्याने जर ती त्यांना उशिरा प्राप्त झाली असेल तर त्याचे दोषारोपण जन माहिती अधिकारी यांच्यावर करता येणार नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती, जर अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली असेल तर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करण्याचे उत्तरदायित्त्व संपूर्णपणे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना निश्चितपणे कोणत्या माध्यमाव्दारे माहिती हवी आहे यासंदर्भात त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदिग्धता ठेवली आहे व तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व देखील त्यांनी पार पाडलेले नाही. त्यामुळे या प्रकरणी आयोग जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरवत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ३१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय पंडीतराव काळे,काळे भवन, २३/११ पापविनाश रोड, महावीर चौक,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा १.आस्थापना प्रमुख,/२.लेखापाल,/३.अंतर्गत लेखा परीक्षक नगर परिषद कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०१
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

१ श्री. अंकुश रामचंद्र चामे, : अपिलार्थी
रा.चिखली, ता.अहमदपूर,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा कार्यालय, लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : १) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर
२) समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद,लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी माहिती देण्याचे आदेशित करुनही माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. २०.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, सन १९९२-९८ या कालावधीशी संबंधित काही माहिती

एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व टपालाद्वारे अशा दोनही माध्यमाद्वारे अपेक्षिली होती आणि ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे या अर्जामध्ये नमूद केले होते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०७.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी निर्णय देऊन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधितांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या चार मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे, तर उर्वरित तीनही मुद्यांवरील माहिती समाजकल्याण अधिकारी,गट-अ जिल्हा परिषद, लातूर यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, त्यांच्या विभागाकडे आवक-जावक नोंदवही जतन करुन ठेवण्याचा अनुज्ञेय कालावधी पाच वर्षांचा आहे व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.१ द्वारे त्यांच्याकडे मागितलेली माहिती ही, त्या माहितीचा जतन करुन ठेवण्याचा कालावधी संपुष्टात आल्याने आता नष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे अपिलार्थीस ते ही माहिती देऊ शकत नाहीत. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात त्यांना

लेखी पत्राद्वारे असे न कळविता अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात आले असता, अपिलार्थीस त्यांनी या मुद्यावरील माहितीची तोंडी कल्पना दिली होती. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीचा दि. २०.०५.२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर दि. २६.०५.२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधित होती, त्या प्राधिकरणाकडे म्हणजेच समाजकल्याण अधिकारी, गट-अ,जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे दि. २६.०५.२००८ रोजी पाठविला व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांना अपिलार्थीस ही माहिती पंधरा दिवसांच्या आत देण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात लेखी पत्राद्वारे कोणतीही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करताना त्यांना व्यक्तिशः व टपालाद्वारे अशा दोनही माध्यमाद्वारे माहिती हवी असल्याचे नमूद केले आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीस जर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी असेल तर ते, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आर.टी.आय. २००५ / सिआर ३१५ /०५/५, दि.११.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये विहित केलेल्या प्रपत्र-'अ' मधील मुद्दा क्र. ३ (IV) यामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या दोन माध्यमापैकी केवळ एकच पर्याय ते निवडू शकतात. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दोनही माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१

च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस ही माहिती, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. या मुदतीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, कार्यालयीन दिवशी, पूर्व नियोजित वेळी ही माहिती हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. ही मुदत व्यपगत झाल्यानंतर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य उपलब्ध होऊ शकणार नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित तीन मुद्यांसंदर्भात समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,गट-अ, लातूर यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.२०.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे, जो त्यांना विशेष समाजकल्याण अधिकारी, लातूर यांच्याकडून दि. २६.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाला आहे, त्यातील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. विशेष समाजकल्याण अधिकारी, लातूर यांनी समाजकल्याण अधिकारी, गट-अ,जिल्हा परिषद, लातूर हे अपिलार्थीस ही माहिती या कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ ते ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः देण्यासाठी, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांपर्यंत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवावी.

३. विशेष समाजकल्याण अधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः देण्यासाठी, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांपर्यंत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवावी.

**लातूर**
**दिनांक : ३१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंकुश रामचंद्र चामे,रा.चिखली, ता.अहमदपूर,जि.लातूर-४१३ ५२३.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०२
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

१ श्री. दशरथ आच्युतराव होळे, : अपिलार्थी
रा.आष्टामोड, ता. चाकूर,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, चाकूर,जि.लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, चाकूर,
जि.लातूर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, चाकूर,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १०.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तहसीलदार, चाकूर यांच्याकडे दि. २२.०२.२००८ रोजी दिलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीच्या माहितीची मागणी टपालाद्वारे केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०८.२००८ रोजी तहसीलदार, चाकूर यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीचे हे अपील स्वीकारण्यास संबंधितांनी नकार दिल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त होऊ शकला नाही व अपेक्षित माहितीही मिळाली नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन एक वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही त्यांच्या निवेदनावर संबंधितांनी काहीही कार्यवाही केली नाही अथवा कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविलेही नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी केलेली कार्यवाही त्यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः समजावून सांगितली होती आणि त्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाले होते. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती लेखी स्वरुपात पुरविली नसल्याचे मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. जोशी सध्या तहसील लातूर येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास

कोणताही प्रतिसाद न देता अपिलार्थीचा मूळ अर्ज स्वतःकडे विनाकार्यवाही तसाच ठेवून दिला. श्री. जोशी यांनी आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या निवेदनावरील सद्यस्थिती तोंडी अवगत केल्याचे आयोगास सांगितले व अपिलार्थीस तोंडी स्वरुपात माहिती प्राप्त झाल्याचे गृहीत धरुन त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास कोणतीही लिखीत स्वरुपात माहिती दिली नसल्याचे आयोगास अवगत केले. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस लिखित स्वरुपात देणे, हे त्यांना अनिवार्य आहे. केवळ अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्याबाबत तोंडी कल्पना दिली म्हणजे अपिलार्थीस माहिती दिल्यासारखे होत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने टपालाद्वारे माहिती मागितली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या निवेदनाच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होण्याच्या दिनांकापर्यंत वेगवेगळया प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व यासंदर्भातील त्यांच्या अभिलेख्यातील टिपणीच्या प्रती अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती केलेली नाही.

आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेल्या जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अशाप्रकारच्या अर्जावर कोणती कार्यवाही करणे त्यांच्याकडून अपेक्षित आहे, याची कल्पना देण्यात आली. सबब जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, चाकूर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २२.०२.२००८ रोजीच्या निवेदनावर त्यांच्या कार्यालयाने दि. १०.०७.२००८ पर्यंतच्या कालावधीत त्यांच्या कार्यालयाने विविध सार्वजनिक प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केला असल्यास त्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडील अभिलेख्यातील टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. जोशी, सध्या नायब तहसीलदार, लातूर या पदावर कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर कोणतीही

कार्यवाही न करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची उपविभागीय अधिकारी, उदगीर यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या निवेदनाच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाने वेगवेगळया प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व यासंदर्भात त्यांच्या अभिलेख्यातील टिपणीच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दशरथ आच्युतराव होळे,रा.आष्टामोड, पो. गांजुर, ता. चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०३
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

१ श्री. दशरथ आच्युतराव होळे, : अपिलार्थी
रा.आष्टामोड, ता. चाकूर,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय,
चाकूर, जि.लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, चाकूर,
जि. लातूर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, चाकूर, जि.लातूर.
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही आणि त्यांनी अपिलार्थीस जाणीवपूर्वक माहिती न देऊन केंद्रीय माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १४.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जो जन माहिती अधिकारी यांना दि. २१.०८.२००८ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये जठाळा साठवण तलावाच्यासंदर्भात जन

माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पाठविलेल्या स्वयंस्पष्ट अहवालाच्या प्रतींची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.०९.२००८ रोजी परत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय,लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर यांच्याकडे न पाठविता, तसाच विनाकार्यवाही ठेवून दिला. या सर्व प्रकारामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित राहावे लागले त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या अर्जात विनंती केल्याप्रमाणे या प्रकरणाशी संबंधित अहवाल त्यांच्या कार्यालयाने विशेष भूसंपादन अधिकारी,स्वर्णा प्रकल्प, लातूर यांच्याकडे पाठविला असून संबंधित भूसंपादन अधिकारी हे जमीनधारकास मावेजा अदा करीत असतात, त्यावेळी भूसंपादन अधिकाऱ्याकडे जमिनीच्या हक्कासंदर्भात अनेक वाद निर्माण होत असतात. त्यामुळे भूसंपादनाचे क्षेत्र व रक्कम अंतिमतः निश्चित झाल्याशिवाय अशाप्रकारचे अहवाल संबंधित व्यक्तींना देण्याची पध्दत त्यांच्या कार्यालयात प्रचलीत नाही. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, चाकूर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला अपिलार्थीचा दि. २२.०९.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी प्रथमतः हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर यांच्याकडे पाठवावा. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर यांना प्राप्त झाल्यापासून तदनंतर त्यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन वीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर यांनी अपिलार्थीचा दि.२२.०९.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे संबंधित तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांच्याकडून

प्राप्त झाल्यानंतर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, वीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दशरथ आच्युतराव होळे,रा.आष्टामोड,पो.गांजूर, ता. चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०४
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

१ श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपिलार्थी
रा.साताळा खु., ता. अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर
२ जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपजिल्हाधिकारी (रोहयो), लातूर
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, लातूर
त्रयस्थ पक्षः श्री.भारती (लघुलेखक)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणी केलेली माहिती त्यांना लातूर जिल्हा रो.ह.यो. उपजिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर रोख दंडाची व शिस्तभंगाची कठोर कारवाई आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे लातूर जिल्हा फलोत्पादन योजनेसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम

प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही फलोत्पादन विभागाशी संबंधित असल्यामुळे ही माहिती त्या विभागाकडून उपलब्ध करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. संबंधितांकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. २९.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वकील, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित अपिलार्थी यांचे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी आपला निर्णय दिलेला नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**लातूर**
**दिनांक : ३१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर,रा.साताळा खु., ता. अहमदपूर, जि.लातूर -४१३ ५२३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०५
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर,<br>रा.साताळा खु., ता. अहमदपूर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय,लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, लातूर | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद,लातूर
जन अपिलीय अधिकारी : कृषि सहसंचालक, लातूर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी बुध्दीपूर्वक चुकीचे व दिशाभूल करणारे आदेश काढून त्यांना न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगाकडे अशी विनंती केली आहे की, या प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यावर रोख दंड व शिस्तभंगाची कठोर कारवाई आयोगाने आदेशित करावी व अपिलार्थीस संबंधितांच्याकडून विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. भोंगाडे, माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी लिखीत केलेल्या कार्यवाहीची सत्यप्रतीत माहिती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - इ.स.१९९१-९२ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाच्या रो.ह.यो.अंतर्गत लातूर जिल्हा फलोत्पादन योजनेची माहिती आणि त्रयस्थ पक्ष व मोहिम अधिकारी श्री. भोंगाडे यांनी सदर योजनेच्या प्रचारार्थ व प्रसारार्थ लिखित केलेल्या कार्यवाहीची सत्यप्रत."- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने हा अर्ज माहिती अधिकारी,जिल्हा परिषद कार्यालय, लातूर यांच्याकडे केला होता. अपिलार्थीचा अर्ज जिल्हा परिषदेतील कृषि विभागास प्राप्त झाल्यानंतर कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविला. तथापि त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने परत अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.११.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित विषय हा जिल्हा परिषदेशी संबंधित नसल्याने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज अपिलार्थीस परत पाठविला. तथापि यानंतर अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित त्यांचा प्रथम अपील अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा कृषि सहसंचालक, लातूर यांच्याकडे केला नाही अथवा त्यानंतर जिल्हा परिषदेशी कोणताही पत्रव्यवहार न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे उपस्थित वकील यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

या प्रकरणावर निर्णय देण्यापूर्वी अपिलार्थीच्या दि. ०५.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्ज कृषि सहसंचालक, लातूर यांच्याकडे प्रथमतः सादर करावा व त्यांच्या या अपील अर्जावरील निर्णयाने समाधान न झाल्यास आयोगाकडे अधिनियमातील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार, कृषि सहसंचालक, लातूर यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत द्वितीय अपील करावे.

अशाप्रकारे अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे न करता आयोगाकडे सरळ द्वितीय अपील सादर केले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर,रा.साताळा (खुर्द), ता. अहमदपूर, जि.लातूर-४१३ ५२३.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि सहसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिले**

**क्र. १६०६/०८ व १६०७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०६ व १६०७
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

१ श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय, उदगीर,
जि.लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक,
नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

त्रयस्थ पक्षः श्री. मलंग नुरोद्दीन मो.इस्माईल

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१२.२००८ व २५.११.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, एकाच सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहितीशी संबंधित असल्यामुळे, आज रोजी ही दोनही अपिले एकत्रित आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र.१६०६/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्याबाहेरील व खोटी माहिती दिली असून त्यांना जी माहिती आवश्यक नव्हती ती माहिती पुरवून जन माहिती अधिकारी यांनी जादा शुल्काची आकारणी केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५,१२,१४,१५ व १६ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी खोटया स्वरुपात दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. ०४.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषदेच्या कार्यालयाशी संबंधित विविध मुद्यावर काही माहिती एकूण १७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०९.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५,१२,१४ व १५ च्या संदर्भात माहिती त्यांना सात दिवसांच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय लिखीत स्वरुपात दि. ०५.०३.२००९ रोजी पारित केला. यानंतर दि. १७.०३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दि. ०६.१२.२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०६.०९.२००८ रोजी प्रथमतः व नंतर जन

अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे मुद्दा क्र. ५,१२,१४,१५ च्या संदर्भात दि. १७.०३.२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील हे मुख्यत्त्वेकरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५,१२,१४,१५ व १६ च्या संदर्भात दिलेल्या माहितीकरिता केले आहे. अपिलार्थीच्या मते या मुद्यांवरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी असत्य स्वरुपात पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यासंदर्भात पुरविलेली माहिती आणि अपिलार्थीने विचारलेली माहिती याचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १२,१५ व १६ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमाशी सुसंगत नाही. या सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे हे अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्तीबाहेरचे आहे. उर्वरित मुद्दा क्र.५ व १४ च्या संदर्भातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती पाहता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती खोटी असल्याचे का वाटते, हे आयोगास अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. तसेच ही माहिती खोटी असल्यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणताही सबळ युक्तिवाद सादर केलेला नाही अथवा यासंदर्भातील कोणताही लेखी पुरावाही आयोगास आद्यापपावेतो सादर केलेला नाही. अपिलार्थीने द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आकारलेल्या जास्तीच्या शुल्काच्या परताव्याची मागणी केली आहे. तथापि जन

माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे त्यांच्या दि. ०४.०८.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतेही शुल्क भरले नाही. त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशाप्रकारे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे उपस्थित केलेला कोणताही मुद्दा सिध्द होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

**अपील क्र. १६०७/०८ :**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,४,५,६ व ८ च्या संदर्भातील खोटी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०७.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित विविध मुद्यांवर एकूण १० मुद्यांची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती रु.२२/- इतके माहितीपोटीचे शुल्क आकारुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,४,५,६ व ८ च्या संदर्भातील माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.

२२.१०.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. परंतु प्राप्त माहिती खोटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

आज रोजी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या आधारे वेगवेगळया विषयावर मोठी व्याप्ती असलेली माहिती त्यांच्याकडे मागवून त्यांना त्रास देत असतात व नगर परिषदेच्या कामात नाहक अडथळा निर्माण करीत असतात. ज्यावेळी त्यांना माहिती देण्याकरिता नगरपरिषदेचा शिपाई अथवा इतर कर्मचारी माहिती घेऊन त्यांच्याकडे जातात, त्यावेळी ते ही माहिती स्वीकारीत नाहीत.तसेच विचाराधीन प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. ०२.०८.२००८ रोजी व तदनंतर दि. २२.१०.२००८ रोजी पूर्णतया पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थी ज्या मुद्यांची जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती पुरविली आहे असे म्हणत आहेत, त्या मुद्दा क्र. १,४,५,६ व ८ या मुद्यांपैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. ४,६ व ८ च्या संदर्भातील माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २२.१०.२००८ रोजी त्यांच्या अर्जातील उर्वरित मुद्दा क्र.१ व ५ शी संबंधित पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. माहिती सुसंगत असतानाही अपिलार्थीस ती खोटी का वाटते, याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशाप्रकारे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १६०६/०८ व १६०७/०८ ही दोनही अपिले फेटाळण्यात येत आहेत.

**लातूर**
**दिनांक : ३१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग,रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०८
निर्णय दिनांकः ३१-१०-२००९

१. श्री. पांढरे बाबूराव ईरप्पा, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,
उदगीर,जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद,
उदगीर,जि.लातूर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक,
नगर परिषद कार्यालय,
उदगीर,जि.लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, अर्धवट माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नगर परिषदेने बी.ओ.टी. तत्त्वावर बांधण्यात येत असलेल्या व्यापारी संकुल संदर्भात दि. ३१.०३.२००३ ते ०५.०८.२००८ या कालावधीशी संबंधित एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- नगर परिषदेने व्यापारी संकुल बांधण्याचा सुनिल फार्म इंजिनिअरींग कंपनीशी केलेल्या करारामध्ये बेसमेंट फ्लोअरमध्ये दुकाने बांधण्याची परवानगी दिली होती काय? असल्यास त्यांच्या सत्यप्रती, करारनाम्यात बेसमेंट फ्लोअरच्या बांधकामास परवानगी नसेल तर नगर परिषदेने बेसमेंट फ्लोअरवर संबंधित ठेकेदाराने बांधलेल्या दुकान बांधकामाबाबत काय कारवाई केली? नगर परिषदेने सन २००३ मध्ये केलेल्या ठेकेदाराच्या करारनाम्यात काही फेरबदल केले आहेत काय? केलेल्या फेरबदलाची व त्या सभागृहाने मंजूरी दिलेल्या ठरावाच्या सत्यप्रती, बेसमेंट फ्लोअरची दुकाने बेकायदेशीर असतील तर संबंधित दुकाने विक्री न करण्याबाबत किंवा संबंधित दुकाने बेकायदेशीर असल्याबाबत जनतेला ज्ञात केले आहे काय, केल्यास कोणत्या माध्यमातून " - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. २९.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०३.११.२००८ रोजी काही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व ती चुकीची वाटल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात चुकीची माहिती दिली असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.०९.२००८ व दि. ०३.११.२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे जन माहिती अधिकारी यांना, उदगीर नगर परिषदेने व्यापारी संकुल बांधण्याचा सुनिल फर्म इंजि.कं,लातूर यांच्याशी केलेल्या करारात बेसमेंट फ्लोअरमध्ये दुकाने बांधण्याची परवानगी दिली होती काय?-ही माहिती विचारली असता, "मूळ मंजूर नकाशामध्ये बेसमेंट फ्लोअरला गोडाऊन बांधकामाची परवानगी दिली होती " अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने, करारनाम्यात बेसमेंट फ्लोअरच्या बांधकामास परवानगी नसेल तर नगर परिषदेने बेसमेंट फ्लोअर संबंधित ठेकेदाराने बांधलेल्या दुकानाच्या बांधकामासंदर्भात काय कार्यवाही केली? अशी माहिती विचारली असता, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, "गोदाम बांधकामाची परवानगी होती " असे दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः उत्तर दिले. तदनंतर दि. ०३.११.२००८ रोजी, बेसमेंट फ्लोअर मधील बांधकामाचा वापर स्टोअर म्हणूनच करण्यात यावा, असा ठराव नगर परिषदेने पारित केला असल्याचे अपिलार्थीस कळविले. उर्वरित मुद्दा क्र. ३ व्दारे अपिलार्थीने संबंधित फेरबदलाच्या नगर पालिकेच्या ठरावाची सत्यप्रत मागितली. उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. सभागृहाच्या ठरावाची प्रत जन माहिती अधिकारी त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यामुळे या मुद्यावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही, पूर्णतया जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे पृथःकरण केले असता, असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील माहिती दि. १८.०९.२००८ रोजी अगर दि. ०३.११.२००८ रोजी, स्पष्ट स्वरुपात न दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात वस्तुस्थितीवर आधारित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात वस्तुस्थितीवर आधारित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**लातूर**
**दिनांक : ३१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांढरे बाबूराव ईरप्पा,रा.पारकट्टी गल्ली,उदगीर, ता.उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०९
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

१ श्री. खंडागळे उत्तम श्रीपती, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (म.),
तहसील कार्यालय, रेणापूर, जि.लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, रेणापूर, जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. २२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस नियमाप्रमाणे लागणारी फीस भरणा करुन अभिलेख कक्षात समक्ष उपस्थित राहून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दि. १६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थी हे अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, रेणापूर यांनी अपिलार्थीच्या दि. १६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करणे उचित राहिल, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**लातूर**
**दिनांक : ३१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. खंडागळे उत्तम श्रीपती, रा. अजिंठानगर, एम.आय.डी.सी. रोड, चन्न बसेश्वर प्रा.शा. जवळ, लातूर, ता.जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय,रेणापूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, रेणापूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१०
निर्णय दिनांक ३१-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. महेश सूर्यकांत ढवळे,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, लातूर. | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नगर अभियंता,
नगर परिषद, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, दि. १५.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निष्पक्षपातीपणे व गंभीरपणे सुनावणी न घेतल्यामुळे आणि त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते १२ बाबत अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतेही आदेश न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कशाप्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविण्यात आली याचे सविस्तर विवेचन केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. २५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे लातूर नगर परिषदेतर्फे करण्यात आलेल्या वृक्ष संगोपनाच्या संदर्भात एकूण ३३ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १५.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१४,३१,३२ व ३३ च्या संदर्भातील माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ ते २२ द्वारे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०४.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही, त्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे युक्तिवाद ऐकून घेण्यात आले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णयाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्यांच्या संदर्भात मुद्दा क्र. १४ वगळता उर्वरित १ ते २१ मुद्यांवर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील

निर्णयामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीने हा मुद्दा आयोगाकडे उपस्थित केला आहे. अपिलार्थीचा हा मुद्दा लक्षात घेता, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील १ ते २२ या मुद्यासंदर्भात अपिलार्थीच्या दि. १५.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी परत सुनावणी घेऊन यासंदर्भात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आपले आदेश निर्गमित करावेत..

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जातील मुद्दा क्र.१ ते २२ या मुद्यांवर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय नव्याने पारित करावा.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महेश सूर्यकांत ढवळे, वॉरियर ग्रुप संपर्क कार्यालय, हिरास कॉम्प्लेक्स, कापड लाईन, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.